आमची अभिजात प्रकाशने

वि. वा. शिरवाडकर

विचारधारा

माधवी (काव्यसंग्रह)

एखादे पान एखादे फूल

इरावती कर्वे

परिपूर्ती

युगान्त

भोवरा

स्वर्गीय ठेवा

साने गुरुजी

देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.,

स्वर्गीय ठेवा

परमपूज्य साने गुरुजी
जन्मशताब्दीनिमित्त
विशेष आवृत्ती

संस्थापक :
रा. ज. देशमुख
सुलोचना राम देशमुख

लेखक :
साने गुरुजी

प्रकाशक :
रामचंद्र दत्तात्रय तुळपुळे
देशमुख आणि कंपनी
(पब्लिशर्स) प्रा. लि.
४७३, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

मराठीमधील सर्व हक्क देशमुख आणि कंपनीकडे आहेत.

मुखपृष्ठ :
दीनानाथ दलाल

किंमत : ११० रुपये

अक्षर रचना
श्री. सुरेश माने
एस. एम. एन्टरप्रायझेस
कात्रज, नवीन वसाहत, पुणे ४६.

मुद्रक :
साधना प्रेस
४३१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

अनमोल ठेवा

परमपूज्य साने गुरुजी यांची जन्मशताब्दी आपण या वर्षी साजरी करीत आहोत. गुरुजींच्या कार्याचे, जीवनाचे महत्त्व किती आहे याची जाणीव आपल्या सगळ्यांनाच पुन्हा एकदा या निमित्ताने होईल, यात शंका नाही.

गुरुजींनी विविध प्रकारचे लिखाण त्यांच्या आयुष्यात केले. लहान मुलांसाठी त्यांनी लिहिलेल्या गोष्टी हा आपला एक अनमोल सांस्कृतिक ठेवा आहे. गेली पन्नासहूनही अधिक वर्षे प्रत्येक उमलत्या पिढीच्या हातातून ही पुस्तके गेली आहेत. आजच्या बदलत्या सांस्कृतिक वातावरणात तर या पुस्तकांचे मूल्य अधिकच वाढले आहे.

प्रत्येक सुजाण पालकाने, शिक्षकाने आपल्या मुलांनी या गोष्टी वाचाव्यात, समजून घ्याव्यात यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

साने गुरुजींच्या पवित्र स्मृतीस अभिवान करून आम्ही हा ठेवा आमच्या बाल-वाचकांच्या हातात देत आहोत.

एस्.

दोन शब्द

नगर वाचनालय सातारा

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत मेरी कॉरिली या विख्यात इंग्रज कादंबरी लेखिकेच्या कादंबऱ्या आपल्याकडे अत्यंत प्रिय झाल्या होत्या. तिच्या अनेक कादंबऱ्यांची मराठीत भाषांतरे झालेली आहे. मी ज्या कादंबरीतील गोष्ट सांगत आहे, तिचे नाव 'ट्रेझर ऑफ् हेव्हन' (स्वर्गीय ठेवा) असे आहे. गोष्ट अतिसुंदर आहे. अनेक ठिकाणी मी ती तोंडाने सांगितली आहे. जशी मी ती सांगत असे तशी मी ती लिहून काढली आहे. सर्वांना ती आवडो.

— पां. स. साने

स्वर्गीय ठेवा

परमपूज्य साने गुरुजी
जन्मशताब्दीनिमित्त
विशेष आवृत्ती

१

मध्यरात्र होत आली होती. मुंबई शहरात सर्वत्र शांतता होती. दळवळण जवळ जवळ थांबले होते व ट्रामगाड्यांचा खडखडाट ऐकू येत नव्हता. मोटारींचे पो पो बंद झाले होते. दिवसभर थकले भागलेले सारे जीव झोपी गेले होते. सिनेमाचा शेवटचा खेळ अजून सुरू होता. रात्रपाळीच्या गिरण्यांतून काम चालू होते, तर कोठे क्वचित गाणे चालू होते, तर कोठे नृत्यही सुरू होते. परंतु एकंदरीत पाहिले तर संबंध सामसूमच होते.

वरचे काळेनिळे अनंत आकाशही अत्यंत शांत वाटत होते. अनंत तारे चमचम करीत होते. ते विश्वाच्या विश्वंभराची कल्पना आणून देत होते. ते पृथ्वीकडे शांत बघत होते. ज्या प्रभूला कोणी विचारीत नाही, ज्याच्या इच्छेविरुध्द दुनियेत क्षणाक्षणाला गोष्टी होत आहेत, अपराध केले जात आहेत, त्या प्रभूचे मुके पहारेकरी गंभीरपणे वरून पाहात होते.

मलबार टेकडीवर मोटारी अजूनही जात येत होत्या. बाहेर कोठल्या तरी राजविलासी हॉटेलातून खाऊन पिऊन मजा करून ते चंदुलाल येत होते. आपल्या घरी खाणे त्यांना अरसिकपणाचे वाटत असे. घरे, बंगले, सारे शोभेसाठी, प्रतिष्ठा दाखविण्यासाठी.

त्या बंगल्यांतून खरा आनंद नसे. सुख-समाधान नसे. तेथे पैशांची पूजा होत असे. पैशासाठी तेथे सारी जमलेली. पतीने पत्नी प्रतिष्ठेसाठी केलेली. पत्नीने पती श्रीमंत म्हणून केलेला. मुलाबाळांचे आईबापांवर प्रेम नसून पैशांवर. बाप कधी मरतो याची ती वाट पाहत असत. नोकर-चाकर पैशांसाठी वावरणारे. ते बंगले, ती प्रचंड घरे जणू स्मशानवत् होती. तेथे प्राण नव्हता. प्रेम नव्हते. सारे भूत-बंगले.

तो पहा एक बंगला. त्याच्या आवारात सारे शांत आहे. कृष्णचूडाची झाडे हलत आहेत. नारळी डोलत आहेत. फुलांचे ताटवे शांतपणे सुगंध देत आहेत. त्या आवारात शांती होती. परंतु भीतीही होती. तेथे उदासीनता भासे. विषण्णता अनुभवास येई. तो बंगला असूनही जणू तुरुंगातले वातावरण तेथे होते. श्रीमंती होती; परंतु प्रीतीचे मळे कोठेच नव्हते.

त्या बंगल्यातील एका सुंदर खोलीत ते पाहा, दोन गृहस्थ बोलत बसले आहेत. विजेचा मंद प्रकाश आहे. खिडक्या उघड्या आहेत. वारा येत आहे. पडदे हलत आहेत. नाचत आहेत. त्या दोघांकडे जरा नीट बघा. एक म्हातारा आहे, दुसरा मध्यम वयाचा. त्यांची कसली बोलणी चालली आहेत? ते का कट रचीत आहेत? कारस्थाने करीत आहेत? कोणाविरुध्द कट, कोणाविरुध्द कारस्थाने? ते का कसल्या संकटात आहेत? म्हाताऱ्याच्या तोंडावर खिन्नता आहे आणि तो पोक्त मनुष्यही सचिंत दिसत आहे. काय आहे भानगड? काय आहे प्रकार? व्यापारात का दिवाळे निघाले? का काळ्या बाजारात सापडले? बारा वाजले तरी भुताप्रमाणे ते दोघे जीव तेथे बसले आहेत? पुन्हा त्यांचे बोलणे सुरू झाले. आपण ते ऐकू या, म्हणजे कल्पना येईल.

'मी खरे ते सांगितले. तुम्ही आता फार दिवस जगणार नाही. काही तरी व्यवस्था करून ठेवा. मी तुमचा मित्र म्हणून हे सांगतो. या संपत्तीचे काय करावयाचे? तुम्ही मिळवलीत. परंतु

मरताना ती काही बरोबर येणार नाही. मी असल्या गोष्टी बोलतो म्हणून तुम्ही मला मूर्ख म्हणता. म्हणा. काहीही म्हणा. रास्त ते मी बोलणार पुनः पुन्हा सांगणार. तुमचे जवळ जवळ सत्तर वर्षाचे वय. विचार करा, आनंदराम.

'जगजीवन, वकिली करण्यात तुझे सारे आयुष्य जात आहे, तुझ्या डोळ्यांसमोर नेहमी कायदे, कागदपत्रे, मृत्यू आणि मृत्युपत्रे, खरे ना? मी फार वर्षे आता वाचणार नाही, गोष्ट खरी. अप्रिय असली तरी खरी. परंतु ह्या गोष्टीकडे इतके लक्ष का द्यावे? जे अपरिहार्य आहे ते होईलच. आपण सारे एक दिवस म्हातारे होणार, मरणार. जो जो जगात आला, त्याला जगाला रामराम करून जायचेच आहे. मृत्यूची कल्पना अप्रिय वाटली, तरी तो अटळ आहे. मी मरणार. जी गोष्ट मला हवी आहे, ती मिळण्यापूर्वीच मी मरणार का? दुर्दैव माझे. परंतु, मरण्याचा विचार सारखा मनात का आणावा? अप्रिय वस्तूचे चिंतन कशाला करा? मी नाही एवढ्यात मरणार. अजून मला पुष्कळ जगायचे आहे, पुष्कळ मिळवायचे आहे.'

'आनंदराम, मृत्युपत्र करून ठेवायला हवे, असे तुम्हीच नाही का अनेक वेळा म्हणालात? आज मी मुद्दाम आलो, तर तुम्हीच रागवता!'

'जगजीवन, म्हातारपण आल्यावरच मृत्युपत्र करावे, असे नाही. मी तर म्हणत असतो की, तरुणांनी सुध्दा मृत्यूपत्रे करून ठेवावीत. मृत्यूचा काय नेम? माणूस आज आहे, उद्या नाही, अशी ही दुनिया. जगात कशाचा भरवसा नाही. दो दिनकी दुनिया, केव्हा कोण मरेल काय सांगावे? मृत्युपत्र करून ठेवले नाही, तर मागून लठ्ठालठ्ठी, झोंबाझोंबी होईल; मारामाऱ्या होतील, खून पडतील. आपले प्रिय आप्तजन; ते एकमेकांस पाण्यात पाहू लागतील. मांजराप्रमाणे एकमेकांस ओरबाडतील, चावतील. जो मेला त्याच्याविषयी त्यांना दुःख नसते. तो मेला म्हणून त्यांना जणू

आनंद होतो. गिधाडाप्रमाणे त्या मृतांच्या इस्टेटीचे लचके तोडायला ते झडप घालतात. मला किती मिळेल; कितवा हिस्सा, याशिवाय बेटयांच्या मनात दुसरा विचार नसतो. सारी क्षुद्रता; सारा स्वार्थ. मला मरणाचे वाईट नाही वाटत. मी वृध्द झालो, याचे नाही वाईट वाटत. या बंगल्यात, या जागेत उद्या कोण राहायला येणार, याचा विचार मनात येऊन वाईट वाटते. मला कोणी प्रेम दिले नाही. मी आज एकटा आहे. परंतु येथे येण्यासाठी उद्या शेकडो हक्कदार उभे राहतील.'

आनंदराम बोलता बोलता थांबले. त्यांच्या डोळयांतून पाणी आले. परंतु पुन्हा गंभीर झाले ते. त्यांचे केस पांढरे झाले होते; परंतु त्यांच्या तोंडावर अजून तेजस्विता होती. सामर्थ्य, सत्ता यांची जणू ते मूर्ती होते. सिंह वृध्द झाला तरीही त्याची राजशाही ऐट कायम असते. एक प्रकारचा रुबाब, प्रतिष्ठा ही आनंदरामांच्या ठायी दिसून येते.

'आनंदराम, दुःख कशाला? तुम्ही निश्चित असा. तुमची प्रकृती छान आहे. अजून पुष्कळ वर्षे जगाल. तुम्ही किती श्रीमंत! मला वाटत होते, तुम्ही सुखी असाल; परंतु तुमच्या हृदयात दुःख आहे, शल्य आहे. होय ना? काढून टाका सारी शल्ये. मस्त राहा. उद्याच काही मृत्यू नाही येत. जे तुम्हांला हवे आहे, ते अजूनही मिळवाल नि सुखी व्हाल. तुमच्यासारख्या कोट्याधीशाने अश्रू ढाळावे, याचे मला आश्चर्य वाटते.'

'जगजीवन, राजेमहाराजे, मोठमोठे कोट्याधीश कुबेर, यांना सुखासमाधानाची एखादी खास सनद मिळालेली नसते. पैशाने इतर सारे मिळत असले तरी प्रेम मिळत नाही. निरपेक्ष प्रेम, स्वर्गीय प्रेम. मी चौदा-पंधरा वर्षांचा होतो. तेव्हापासून मी दुःखी आहे, अ-सुखी आहे. अत्यंत परिचय असलेल्या माणसांतही आपले खरे स्वरूप समजत नसते. आपणच आपणांस थोडे फार ओळखतो. जग वरवर पाहणारे. तुम्हा कायदेपंडितांकडे जे लोक

... ग्रंथालय, सातारा

येतात, त्यांची हृदये तुम्हांला थोडीच कळत असतील? यांचे पैसे, खते, पत्रे हे सारे दिसेल; परंतु त्यांची मने, त्याची ती आंतरजीवने, तेथील सुखदुःखे, तेथील प्रश्न यांचे ज्ञान तुम्हांला असते का? जगजीवन, तू मला ओळखणारा; परंतु तुलाही माझे स्वरूप माहीत नाही. परार्धांशानेही नाही. मी तरुणपणापासून दुःखी आहे.'

'तरुणपणापासून? ज्या वेळेस मन बेफिकीर असते, लाथ मारू तेथे पाणी काढू, असे वाटत असते. एक प्रकारचा उन्माद जीवनात असतो, त्या वेळेपासून तुम्ही दुःखी? तारुण्य म्हणजे सुखाचे, उत्साहाचे, आशेचे माहेरघर. त्या वयातही तुम्ही दुःखी होता?'

'जगजीवन, तरुणपणी सुखाला काय तोटा, असे सारे म्हणतात. परंतु कधी कधी वृध्दापेक्षाही तरुण अधिक दुःखी असतात. तसे थोडे सुख मलाही होते. परंतु फारसे नाही. काय सांगू तुम्हांला?'

'सांगा सारे. खरे सांगू का? तुम्हा श्रीमंतांची दुःखे, काल्पनिक असतात. मनाच्या विकृतीची दुःखे, श्रीमंती दुःखे, असली भ्रामक दुःखे मला सांगू नका. त्यांच्याविषयी मला सहानुभूती वाटणार नाही. तुम्ही इतके श्रीमंत आणि असे सचिंत? आश्चर्य आहे हं. सांगा कोणती आहेत दुःखे?'

'जगजीवन, कोणाची सहानुभूती मिळावी म्हणून मी अधीर नाही. मी ती अपेक्षितही वाही. कारण भिक्षा मागून ती मिळत नाही. पतीला पत्नीपासून मिळत नाही, पत्नीला पतीपासून नाही. भावाला भावापासून नाही; मित्राला मित्रापासून नाही. या जगात खरी सहानुभूती दुर्मिळ आहे, मला तिची जरुरीही नाही.' आनंदराम बोलत होता. खिडकीतून आकाशातील ताऱ्यांकडे तो बघत होता. क्षणभर तो स्तब्ध राहिला.

पुन्हा म्हणाला, 'एखादे वेळेस त्या सहानुभूतीची आवश्यकता मात्र वाटते. मी अपरंपार संपत्ती मिळविली. मी अपार कष्ट केले.

मी जगभर गेलो; घामाघूम झालो, परंतु इतक्या श्रमाने मी जे मिळविले ते सारे कोणाला जाणार असे मनात येऊन मला दुःख होते. ज्याला हे सारे देईन, तो दगड निघतो की शहाणा निघतो? तू म्हणतोस की, दत्तक घ्या. हे दत्तक क्वचित्‌च बरे निघतात. कोणाला देऊ हे सारे? आज मला सर्वत्र असत्य दिसत आहे. लहान होतो, मुलगा होतो, तेव्हा सर्वत्र मंगल वस्तूंवर माझी श्रध्दा होती. हे जग चांगले आहे, असे त्यावेळी मला वाटे. मी सर्वांवर विश्वास ठेवीत असे. माझ्या मनात संशय नसे. ईश्वर चांगला आहे असे मला वाटे. जगातील सर्वांना तो सुखी करील असे वाटे. जिवंत राहणे म्हणजे स्वर्ग वाटे. सूर्याचे किरण पाहून नाचावे, फुले पाहून हसावे. जिकडे तिकडे आनंदाची हवा, आरोग्याची हवा. आमचे मळे होते. शेती-भाती होती. आनंद, कशाची वाण नव्हती. पुढे मी ती संपत्ती वाढविली. परंतु माझे समाधान कमी कमीच होत गेले आणि आज संपत्तीच्या शिखरावर असूनही मी अती दुःखी आहे.'

'तुमच्यासारख्या लोकांना कधीच कुठे सुख मिळणार नाही. तुम्हांला स्वर्ग मिळाला तरी तेथेही तुम्ही रडत बसाल. कामधेनू मिळाली तरी निराशेचे सुस्कारे सोडाल.'

'अरे, एखाद्या दरिद्री माणसासही तुझ्या त्या सुखाच्या स्वर्गात बसणे आवडणार नाही. तेथूनही त्याला जगातील सारी दुःखे दिसतील. कारण ती त्याला माहीत असतात. स्वर्गातील ते अमृत त्याला रुचणार नाही. गंधर्वाची गाणी नि अप्सरांचे नाच त्याला विषमय वाटतील. जगजीवन, मी असुखी आहे. कोणाला देऊ ही संपत्ती? एकदा एकाला विचारले, "या इस्टेटीचे काय करू?" तो म्हणाला, "एखाद्या मठाला देऊन टाका." आज का या मठावर माझा भरंवसा आहे? ईश्वरावर भरंवसा शक्य तर ठेवायची माझी इच्छा आहे. परंतु मिळविलेली ही संपत्ती ज्याला द्यावी, असा एकही लायक मनुष्य मला दिसत नाही. सारा फालतू

पसारा, असार पसारा. माझे लग्न दुःखातच झाले. ती एक शोककथाच आहे. पत्नीचे प्रेम मला नाही. ती पुढे मेलीही. मला दोन मुलगे होते. पैशांवर त्यांचा डोळा. चैनी, मिजासी. पुढे तेही मेले. आज सत्तर वर्षांचा मी एकटाच आहे. ना प्रेम, ना सहानुभूती, म्हणून मी दुःखी आहे. प्रेमाने माझी कोणी काळजी घेईल असे कोण आहे? ज्याला मी हे माझे सारे वैभव देईन, अंतःकरण भरून येऊन देईन, असा जगात मला कोणीच दिसत नाही. मी दुर्दैवी आहे, सुख माझ्यासाठी नाही.'

'परंतु तुम्ही ही इस्टेट कोणाच्याच नावे केली नाही तर ती सारी सरकारजमा होईल.'

'दत्तकापेक्षा सरकारच्या ताब्यात गेलेली परवडेल. सरकार तिचा थोडा तरी चांगला उपयोग करील. खरेच, कशासाठी एवढी धडपड करून मी ही संपत्ती मिळविली?'

'आनंदराम, पैसे मिळवावे व सुखी व्हावे, याहून या जगात अधिक काय आहे?'

'जगजीवन, गरीब असूनही सुखासमाधानात राहणारी कुटुंबे मला माहीत आहेत. परंतु श्रीमंताच्या घरांत सदैव आदळआपट, धुसफूस चालू. पैसा. पैशासाठी सारी धावपळ. हे का जीवन? शेअरबाजारातले हे भुक्कड जीवन. भांडवल घेऊन या देशात जावे, त्या देशात जावे. कोणत्याही देशावर यांचे प्रेम म्हणून नाही जात, तर तेथे पिळवणूक करता येईल, कमी पैशांत मजूर मिळतील म्हणूनच जातात. श्रीमंतांचे दिडक्यांवर प्रेम. चाराचे दहा, दहाचे हजार करीत राहणे ही त्यांच्या जीवनाची इतिकर्तव्यता. कागदी नोटांचे भिकारडे, श्रीमंती जीवन. त्या जीवनात उदात्तता नाही, त्याग नाही, ओलावा नाही, कृतज्ञता नाही, सुंदरता नाही. पैशाचे एक वेड. त्या वेडातून तुम्हांला कोण सोडवणार, कोण वाचवणार? परंतु माझ्या बडबडीचा तुम्हांला कंटाळा आला; होय ना?'

'नाही. मुळीच नाही. तुमचे सारे बोलणे तर्कहीन आहे, अर्थहीन आहे. परंतु गंमत वाटत आहे. बोला.'

'माझे बोलणे तर्कहीन?'

'हो, पैशाला अशी नावे नका ठेवू. हा संसार पैशाशिवाय चालत नाही. पैसा मिळविणे, तोही एका पुरुषार्थ आहे. 'प्रपंची पाहिजे सुवर्ण' अशी म्हणच आहे. तुम्हीही शेअरबाजारात होता. पैसे मिळविलेत. सुख भोगलेत. का उगीच त्या पैशाला नावे ठेवता?'

'मी पैसे मिळविले; परंतु त्याच्याशी मी कधीही एकरूप झालो नाही. मी अप्रमाणिकपणाही केला नाही. कोणाची पिळवणूक केली नाही. मला एक बहीण होती. परंतु ती सोळाव्या वर्षीच वारली. विसाव्या वर्षी माझे आईबाप गेले. या जगाला तोंड द्यायला एकटा राहिलो.'

'आणि चांगले दिलेत की तोंड! गडगंज संपत्ती मिळविलीत. संसार केलात.

'कसला संसार? त्या स्मृतीही नकोत. पत्नीने फसविले. मुलांनी फसविले आणि शेवटी सारी मेली. मला ते माझे बाल्य तेवढे आठवावेसे वाटते. ती नदी, ते जंगल, ते पाखरांपाठीमागून पळणे, स्वच्छ सूर्यप्रकाश. बहिणीबरोबर मळ्यात जायचे, फुले तोडायची; फळे खायची; गंमत. निष्पाप आनंद.'

'तुमच्या जीवनात प्रेमकथा आहे की नाही?'

'प्रेमकथा?'

'हो, तुम्हांला प्रेम सहज मिळाले असते.'

'काय बोलतोस, जगजीवन? अरे, प्रेम का विकत मिळते? प्रेम म्हणजे का बाजार? श्रीमंताला क्वचितच प्रेम मिळते. मी गरीब असतो तर एखाद्या स्त्रीचे खरे प्रेम मला मिळाले असते. मी दिसायला वाईट नव्हतो. परंतु वयाच्या तिसाव्या-पस्तिसाव्या वर्षीच मी लक्षाधीश होतो. आणि एका प्रेमात पडलो; परंतु प्रेमात पडणे म्हणजे प्रेम नव्हे. मला वाटे की, तिला आपल्याविषयी काही वाटते. परंतु सारी वंचना. मी फसलो. तिचे प्रेम

नोटांवर होते. मोत्यांच्या हारांवर होते. मी खरे प्रेम अनुभविले ते आईबापांचे, माझ्या बहिणीचे. ते प्रेम किती मधुर, किती गोड, किती सुंदर! परंतु ते टिकले नाही. इतके सुंदर प्रेम टिकणे कठीणच असते. माझी बहीण, माझे आईबाप, ती सारी लवकरच या जगातून गेली. या प्रेमाची स्मृती येते. माझ्या जीवनात ते अमर आहे. त्या प्रेमाकडे पुनः माझे मन धावते. त्या प्रेमाचा अजूनही मला ओलावा मिळतो.'

'तुमचे हे सारे पुराण राहू दे. आपण मुख्य गोष्टींसंबंधी बोलू. इस्टेट कोणाला द्यायची? एखाद्या चांगल्या घराण्यातील मुलगा दत्तक घ्या. त्याला शिकवा. पडतो का माझा सल्ला पसंत? बोला.'

'मुळीच पसंत नाही. आईबाप मूल विकायला तयार होतील; परंतु त्या मुलाचे का प्रेम मिळणार आहे? तो कदाचित् आज्ञाधारक असेल. पैशाने विकत घेतलेली ही आज्ञाधारकता मला नको. असा कोणी आहे का, की ज्यांचे खरे प्रेम मिळेल? असे माणूस मला दे.'

'पुन्हा लग्न करा.'

'आता सत्तराव्या वर्षी? जगजीवन, तू मित्र म्हणून मी रागावलो नाही. अरे, पुन्हा लग्न करायचेच असते तर पहिली बायको मेली तेव्हाच केले असते. आता गोवऱ्या स्मशानात गेल्याप्रमाणेच आहेत. आता का मी लग्न करू? आजही पैशामुळे लग्न शक्य आहे. आईबाप आपली कोवळी मुलगीही मला द्यायला तयार होतील, माझ्या संपत्तीशी सौदा करतील.'

'अहो, सत्तर वर्षांचा म्हणजे म्हातारा? माणसे १४० वर्षे जगू शकतील. १४० वर्षांच्या मानाने तुम्ही तरुणच. पुन्हा लग्न करायला काय हरकत?'

'जाऊ दे हे विचार, मी कोठे तरी दूर जाणार आहे.'

'खरेच?'

'हो.'

‘आणि गुलाबचा वाढदिवस? त्या वाढदिवसाची तुम्हांला आठवण कशी नाही? त्या दिवशी मेजवानी ना देणार आहात?’

‘खरेच की, गुलाबचा वाढदिवस झाल्यावर मी जाईन.’

‘ती आता किती वर्षांची झाली?’

‘एकवीस.’

‘ती तुम्हांला आवडते ना? तिला का नाही देत सारी इस्टेट?’

‘ती एखाद्या मूर्खाशी लग्न करील अशी भीती वाटते. मला गुलाब आवडते, परंतु तिचे आईबाप नाही मला आवडत. समुद्र किनाऱ्यावर ही गुलाब रडत होती. चुकली होती. मी तिला पोचविले. असेल त्या वेळेस सात-आठ वर्षांची. तेव्हापासून मी तिला खेळणी, खाऊ पाठवीत आलो. तिच्या त्या त्या वेळच्या वयाला अनुरूप अशा देणग्या मी तिला देत आलो. ती मला आवडते इतकेच. त्यापेक्षा अधिक भावना नाही.’

‘गुलाबच्या आईला वाईट वाटेल. तुम्ही अजून लग्नाच्या बाजारात उभे आहात असे तिला वाटते.’

‘गरीब बिचारी गुलाब! तिची आई चांगली नाही. तिचा बापही तसाच. जीवनाचा जुगार करणारी ती आहेत. परंतु मुलगी गोड आहे. तिने स्वतःचा नवरा शोधावा. आई-बापांच्या तंत्रानुसार तिने काही करू नये. आईबाप केवळ पैशाचे लोभी आहेत.’

एकाचा ठोका पडला. जगजीवन उठला.

‘पुन्हा भेटाल ना, आनंदराम?’

‘मी दूर जाणार आहे. तुम्हांला कळवीन.’

‘माझा सल्ला नाही मानीत? नाही करीत मृत्युपत्र?’

‘नाही. मी अकस्मात् कोठे मेलो तर सारे सरकारजमा होईल. होऊ दे. नाही मेलो तर काय ते पुढे बघू.’

‘आनंदराम, तुम्ही मला आवडता. परंतु तुम्ही जणू कवी आहात; कल्पनासृष्टीत तुम्ही रमता.’

'माझे काव्य कधीच मेले. माझी कल्पनासृष्टी कधीच नष्ट झाली. माझी सारी सुंदर स्वप्ने कधीच भंगली.'

'परंतु अद्याप प्रेम करणारे माणूस तुम्हांला हवे आहे. निरपेक्ष प्रेम करणारे! परंतु या जगात तसे कोणी नसते. या जगात प्रेम नाही; व्यवहार आहे. अच्छा, जे हवे आहे ते तुम्हांला मिळो. सुखी व्हा.'

असे म्हणून वकीलसाहेब गेले. आनंदराम एकटेच बसले होते. उठून ते खिडकीजवळ आले. आकाशाकडे बघत होते. पुन्हा ते टेबलाजवळ आले. त्यांनी बरीच पत्रे लिहिली. आता पहाट होत आली. तिकडे शुक्राचा तारा उगवला. आनंदरामांनी खिडकीतून तो पाहिला आणि म्हणाले, 'तो पाहा शुक्र, प्रेमाचा मंगल तारा. माझ्या जीवनप्रकाशात कधी नाहीच का तो उगवणार? खऱ्या प्रेमाचा तारा, निरपेक्ष प्रेमाचा मंगल दिव्य तारा!'

❖

२

आनंदरामांच्या बंगल्यात आज कोण धावपळ! किती गर्दी! बंगल्याचे सारे आवार श्रृंगारलेले होते. तेथल्या त्या झाडांमधून चित्रविचित्र तोरणे लावली होती. ठायी ठायी फुलांच्या माळा बांधण्यात आल्या होत्या. बंगलाही सजलेला होता. गडीमाणसे, नोकरचाकर कामात दंग होती. घरातील रसोड्यामध्ये नाना प्रकारचे खाद्यपदार्थ तयार होत होते. चहा, कॉफी, कोको सारी पेये तेथे होती. चिवडा, खाद्यपेय पदार्थ, बिस्किटे, पाव, केक, सारे होते. गाणेबजावणे ऐकू येत होते. सर्वत्र आनंद होता.

बंगल्याजवळ किती तरी मोटारी होत्या. किती तरी घोड्यांच्या गाड्या होत्या. बडेबडे पाहुणे आले होते. विलायती पोषाखातील पंचरंगी पाखरे तेथे कितीतरी जमली होती. त्यांना हिंदुस्थानची जाणीव नव्हती. देशातील उपासमार, दारिद्य, दुःख यांची त्यांना कल्पना नव्हती. खावे प्यावे, मजा करावी, हे जणू त्यांचे ध्येय. श्रीमंत बंगल्यातील विलासी जीवन. आनंदरामांकडे आज त्या सर्वांना आमंत्रण होते.

परंतु आनंदराम कोठे आहेत? त्या उत्सव समारंभात भाग घेताना ते दिसत नव्हते. त्या मेजवानीत ते दिसले नाहीत. गाणे

ऐकायला आले नाहीत. कोठे आहेत ते? गुलाबचा आज वाढदिवस. खरे म्हणजे त्यांना आज आनंद वाटायचा, परंतु ते वरती एका खोलीत दुःखीकष्टी असे बसले होते. ते विचारमग्न होते. ते मनात म्हणाले, "आज येथे आनंद आहे, प्रकाश आहे, परंतु पुढे काय? येथे सारा अंधार होईल. हे घर, हा बंगला, यांत कोणीही पुढे राहात नसेल. उंदीर येथे नाचतील. घुशी पोखरतील. या घरात दिवा लावायला कोणी नसेल! खरेच, कशासाठी मी धडपड केली? कशासाठी हे बंगले बांधले? मला प्रेम हवे आहे. गुणांचा गौरव करणारे, दोषांना पोटात घेणारे थोर प्रेम! स्वार्थाचा थोडाही वास ज्याला नाही असे दिव्य, स्वर्गीय प्रेम! त्या प्रेमासाठी मी अधीर झालो आहे. ते प्रेम मिळेपर्यंत मला मरण न येवो, ते प्रेम मिळो नि मग हे डोळे मिटोत. त्या प्रेमाचे स्वप्न मी इतकी वर्षे मनात खेळवीत आहे. ते स्वप्न होईल का खरे?"

इतक्यात कोणीतरी तेथे आले.

'तुम्ही आज थकलेले दिसता, आनंदराम.'

'होय, मला जरा बरे वाटत नाही.'

'मग थोडे पडत का नाही? नाही तर डॉक्टरांना बोलवा.'

'नर्मदाबाई, डॉक्टर कशाला? मला जे औषध हवे आहे ते डॉक्टरांजवळ नाही.'

'बाकी आमच्या गुलाबसाठी तुम्ही किती करता! प्रियकरही इतके करणार नाही. तुम्ही म्हातारपणीही किती कष्ट करता! आणि सारे माझ्या मुलीसाठी. तुम्ही आज दमून गेलात.'

'मी थकलो नाही, दमलो नाही. तसा मी ठीक आहे.'

'थकल्यासारखे तुम्हांला नाही वाटत? आश्चर्य. परंतु आपण जपले पाहिजे. आपण आता झालो पिकली पाने.'

'तुम्ही का म्हाताऱ्या झालात? बोलता काय, नर्मदाबाई? तुम्ही काही तशा दिसत नाही.'

'दिसत नसले तरी म्हातारी आहे. माझे लग्न झाले तेव्हा मी

सतरा-अठरा वर्षाची होते. पहिली एक-दोन मुले गेली. पुढे ही गुलाब झाली. गुलाबाचेच आज वीस वर्षांचे वय झाले. आज तिला एकविसावे वर्ष लागले. माझी चाळिशी कधीच उलटली. पन्नाशीची आता झुळूक लागेल. बाकी गुलाबवर तुमचे फार प्रेम. किती तुमच्यावर तिचा लोभ! तुम्ही जरा पडा. विश्रांती घ्या. मी जाते. गुलाबला पाठवू तुमच्याकडे? ती आली होती का? तिला पाहून तुम्हांला बरे वाटेल. मी पाठवते हो.' असे म्हणून नर्मदाबाई गेल्या. आनंदरामांच्या मुखावर खिन्न असे स्मित उमटले. परंतु पुन्हा ते गंभीर झाले.

'कोणाबरोबर वरती बोलत होता, नर्मदाताई?' दिवाण-खान्यातील एका बाईने विचारले.

'कोणाशी नाही.'

'वर गेला होता. आनंदरामांशी बोलत होता. बाकी तुमची मुलगी आज फारच सुंदर दिसत आहे. स्वर्गातील अप्सरा. खरे की नाही नर्मदाबाई?' दुसरी लठ्ठ बाई म्हणाली.

'मी अप्सरा पाहिली नाही. मेल्यावर पाहीन.'

'परंतु मेल्यावर स्वर्गात गेलात तर बघाल!'

'म्हणजे मी का नरकात पडणार आहे? काय बोलता?'

'तसे नाही, नर्मदाताई. सहज बोलले. तुमची गुलाब सुंदर आहे की नाही?'

'मला तर ती सुंदर दिसते. ती आहेच सुरेख. आजचा पोषाखही तिला किती शोभतो! ते अस्मानी पातळ किती सुंदर दिसते!'

'तिला चांगला नवरा सहज मिळेल.'

'आजकाल चांगला नवरा मिळणे कठीण. सगळ्यांना पैसा पाहिजे. हुंडा पाहिजे. मुलगी चांगली असून भागत नाही. आपल्या वेळेस असे नव्हते.'

'हल्ली प्रेमावर भर आहे.'

'प्रेमबीम सारे कथांत नि काव्यात. जीवनात नाही. मी प्रेम करून फसले. शेवटी प्रेमाचा नाद दिला सोडून.'

'सुखी आहात ना पण.'

'राहायला बंगला आहे. कशाचा तोटा नाही. ठीक आहे.'

बायकांची अशी बोलणी चालली होती. नर्मदाबाई आपल्या मुलीला आनंदरामांच्या गळ्यात बांधणार असा जमलेल्या बायकांचा तर्क होता. आपसांत त्यांची हीच कुजबूज चालली होती. इतक्यात गुलाब तेथे आली.

'गुलाब, जा वर. आनंदराम जरा दुःखी आहेत.' तिची आई म्हणाली.

गुलाब वरती गेली. आनंदराम येरझारा घालीत होते.

'काय गुलाब, नाचून खेळून दमलीस; नाही का?'

'मी कधी दमत नाही, श्रमत नाही. तुम्ही मात्र कंटाळल्यासारखे दिसता. खरे ना?'

'मी तुमचा खेळ वरून बघत होतो. मी आता म्हातारा झालो. माझ्यासारख्यांनी मुलांचे खेळ आता दुरूनच बघायचे.'

'तुम्ही येता खेळायला? मी तुम्हांला पकडीन. तुम्ही पळा.'

'नको. लोक हसतील. म्हणतील, म्हाताऱ्याला वेड लागले. म्हातारचळ लागला.'

'तुम्हांला असे कोण म्हणेल? तुम्ही लक्षाधीश, आजच्या समारंभाचे तुम्ही मुख्य यजमान.'

'आजचा समारंभ नीट पार पडू दे. समारंभाला विसंगत काही नको.'

'आनंदराम, तुम्ही मला किती आवडता! येथल्या जमलेल्या सर्वांपेक्षा तुम्ही मला आवडता.'

'लबाड पोरी, म्हाताऱ्याची खुशामत करतेस! पुष्कळ वर्षांपूर्वी तू त्या समुद्रतीरावर रडत होतीस. अकरा-बारा वर्षे त्या गोष्टीला झाली. तुला जवळ घेऊन मी तुझे डोळे पुसले. तुझे मोजे सापडत नव्हते, बूट सापडत नव्हते. मी ते शोधले. कोणा वात्रट पोराने वाळूत लपवून ठेवले होते. आठवते तुला? आणि मी तुला

तुझ्या आईबापांकडे पोचविले. त्या वेळेस तू लहान होतीस. आता वाढलीस. गुलाबाच्या कळीप्रमाणे तू वाढलीस. त्या वेळचे तुझे तोंड अजून माझ्या डोळ्यांसमोर आहे. मी तुला उगी केले. तुझे सुंदर केस तुझ्या तोंडाभोवती भुरुभुरु उडत होते. मी मनात म्हटले, 'किती सुरेख, सुंदर मुलगी! किती गोड तोंड!'

'मी आज तशी नाही का?'

'तशी आहेस; पण थोडी लबाड झाली आहेस.'

'मी तुमचे आभार मानले नाहीत म्हणून ना?'

'आभार कशाचे? आभारांचा भार मला सहन होत नाही. लहानपणी तू आभाराची भाषा बोलत नसस. आज आभारांची भाषा काढलीस. म्हणून तर मी म्हटले की आता तू लबाड झालीस.'

'तुम्ही किती उदार! किती प्रेमळ! तुम्हांला आभार आवडणार नाहीत. परंतु जे आनंद, जी सुखे मी आज भोगीत आहे ती तुमच्याशिवाय मला मिळतील का? माझे वैभव तुमच्या आधारावर. आज सकाळी तुम्ही मोत्याचा कंठा वाढदिवसाची देणगी म्हणून पाठविलात. किती सुंदर मोती! टपोरी. पाणीदार. त्या मोत्यांना मी पात्र आहे का?'

'तुझ्या गळ्यात तो हार खरेच सुंदर दिसतो.'

'का करता माझ्यावर लोभ? कशाला हे प्रेम? मी कुठली कोण? का देता हे हार? का ही वस्त्रे-भूषणे?'

'तू वेडी आहेस. मुलींनाच मोती शोभतात. मुली आणि मोती; त्या तारुण्याच्या खुणा आहेत. त्या मोत्यांप्रमाणेच निर्मळ, निष्पाप, धवल अशी राहा. मुलींचे तारुण्य या मोत्यांप्रमाणे विशुध्द असते.'

'तुमचा विश्वास आहे?'

'मी विश्वास ठेवणारा आहे. साधेपणा आणि सुंदरता एकत्र का नसतात? निष्पापता नि सुंदरता एकत्र का आढळत नाहीत?'

ते बोलायचे थांबले. त्यांनी गुलाबकडे पाहिले. तिच्या बालपणाच्या सौंदर्यात काही तरी अधिक होते असे त्यांना वाटले.

त्या वेळच्या सौंदर्यात गोड प्रेम होते, कोवळीक होती, स्वर्गीय मोकळेपणा होता. गुलाबच्या बाळपणाची ती वृत्ती आज तिच्या-जवळ नव्हती.

'गुलाब, काल म्हणे त्या श्रीमंत महाराजांकडे तू गेली होतीस. तुला बोलावण्यात आले होते.'

'मी तेथे गेले. परंतु मला तेथले वातावरण आवडले नाही. माझे राजे तुम्ही. तुम्ही सुखी असा.'

'परंतु मी सुखी नाही. हातातील त्या निष्पाप गुलाबाच्या फुलाच्या तू पाकळ्या तोडीत आहेस; त्या फुलाप्रमाणे मी दुःखी आहे.'

'आज मला कितीतरी गुलाबाची फुले मिळाली. त्यांचे करायचे तरी काय? म्हणून तोडीत होते पाकळ्या. चूक झाली माजी.'

'चूक तुझी नाही, तुला ती फुले देणारांची. तुला थोडीशीच गुलाबाची फुले देण्यात आली असती, तर तू त्यांचे कौतुक केले असतेस, त्यांना प्रेमाने जवळ ठेवले असतेस. गुलाब, माझी एकच इच्छा आहे. माझे डोळे मिटण्यापूर्वी प्रेमाचा गुलाब तुला मिळू दे. ज्या प्रेमाच्या गुलाबामुळे सारे जीवन सुगंधी होते, सुंदर होते, तो तुला मिळो.'

'प्रेम? प्रेमाबिमावर माझा मुळीच विश्वास नाही.'

'मग पोरी, कशावर आहे तुझा विश्वास?'

आनंदरामांनी रागावून विचारले. त्यांना जणू दुःख वाटले. आशेवर निखारे पडले. त्या पोरीचे ते शब्द ऐकून त्यांना धक्का बसला, आश्चर्य वाटले.

'सुखी होण्यावर माझा विश्वास आहे. प्रेम म्हणजे सुख नव्हे. प्रेम करणारे झुरत बसतात, रडत बसतात, प्रेम फसवते. एक दिवस तरी आपले प्रेम टिकेल की नाही, अशी प्रेमी जोडप्यांना सदैव भीती वाटत असते. माझ्या आईबापांनी प्रेमविवाह केलेला

होता. परंतु त्यांच्यासारखी भांडखोर माणसे जगात नसतील. रोज कटकटी. म्हणून प्रेमावर माझा विश्वास नाही. प्रेमापेक्षा मैत्रीवर माझे अधिक विश्वास आहे. ते रडणारे प्रेम मला नको.'

'तू व्यवहारी मुलगी आहेस. उगीचच्या उगीच हृदयाला दुःख का द्या असे तुझे म्हणणे. प्रेम करा नि रडत बसा. कुणी सांगितले आहे असे करायला? खरेच, तू फार शहाणी मुलगी आहेस. तुझ्यासारखे सारे लोक झाले तर ते अधिक वर्षे जगतील. परंतु काय ग गुलाब, प्रेमापेक्षा मैत्री बरी तू म्हणतेस. मैत्रीतही प्रेमातल्याप्रमाणे निःस्वार्थता नको का? आणि निःस्वार्थता तर दुर्मिळ आहे.'

'फार दुर्मिळ, फार दुर्मिळ.'

'गुलाब, तू केव्हा तरी लग्न करशील. नवऱ्याची नुसती मैत्री, त्याचे सहकार्य, याने तुला समाधान वाटेल? तेवढे पुरे, आणखी काही नको, असे तुझे हृदय म्हणेल का! खरे सांग.'

'मला आणखी काही नको. कल्पनांची, भ्रामक भावनांची जाळी गुंफून रडत बसणारी मी मुलगी नाही.'

'तुला प्रेम नको तर! ती स्वर्गीय दिव्यता तुला पूजार्ह वाटत नाही? ज्या प्रेमासाठी लोक वेडे होतात, वाटेल तो त्याग करतात, ते प्रेम तुला नको? ज्या प्रेमामुळे कवींना, कलावतांना स्फूर्ती मिळते, ते प्रेम तुला नको? ज्या प्रेमामुळे या जगाचा सारा इतिहास बनला, ही संस्कृती फुलली, ते प्रेम, ती दिव्य प्रेरणा तुला नको?

'कशाला प्रेमाची स्तुतिस्तोत्रे गाता? ती प्रेमे फोल आहेत. प्रेमाचे पूर ओसरतात आणि नंदनवनांची वाळवंटे बनतात. सारा मृगजळाचा खेळ. कवींचे, कलावंतांचे तोंडही पाहू नये असे मला वाटते. कवी म्हणजे वेडबंबू. माझ्या घरात कवींना मी कधीही येऊ देणार नाही. त्यांना बाहेर हाकलीन. या कवींनी जग बिघडविले आहे.'

आनंदराम तंद्रीत होता. तो काही तरी गुणूगुणू लागला

"सारे विचार, सर्व भावना
सारे आनंद, सर्व कामना
ज्यांच्यामुळे वाजे हृदय-तंत्री
ते ते प्रेम-प्रभूचे मंत्री
प्रेमराजाला प्रदक्षिणा घालिती
पवित्र ज्योती तेथे पाजळिती."

'काय म्हणता आहांत?'

'एक कविता. प्रेमाचे काव्य.'

'काव्य?'

'हो. एका कवीचे काव्य. जे व्यवहारात रमत नाहीत, व्यवहार ज्यांना कळत नाही, अशांपैकी एकाचे हे काव्य आहे. एका वेड्या कवीची ही कविता आहे.'

'खरेच; तो वेडा असला पाहिजे.'

'होय. वेडाच होता तो. परंतु सारेच असे असतात. कारण सर्वांचा प्रेमावर विश्वास असतो.'

'प्रेमावर विश्वास?'

'हो, प्रेमाशिवाय सारे शून्य, असे ते सगळे म्हणतात. जगात आपण इतके कष्ट भोगतो, श्रम करतो; कशासाठी? प्रेमासाठी. प्रेमामुळे सारे सुसह्य वाटते. याला कोणी अपवाद असतील, प्रेमाशिवाय ज्यांना सारे आहे असे वाटते, असे कोणी हरीचे लाल असतीलही आणि असेलच तर ठीक; ते दैवाचे, असे म्हणावे लागेल.'

'मलाही वाटते की तेच खरे दैववान. त्यांना मनस्ताप नाही. वेदना नाही. झुरणे नाही.'

'खरे बोललीस. त्यांना कधी अस्वस्थ वाटणार नाही. जीवन निःसार वाटणार नाही. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू कधी येणार नाहीत. त्यांना सुस्कारे कधी सोडावे लागणार नाहीत. परंतु

गुलाब, म्हातारपणी अशा लोकांना निराळे वाटेल. "जीवनात ज्यांनी प्रेम केले, तेच खरे सुखी नि कृतार्थ" असे त्या वेळेस ते म्हणतील. ते धन्य, ज्यांनी प्रेम अनुभवले, प्रेम केले, प्रेम दिले. ते धन्य, जे प्रेमासाठी रडले, प्रेमामुळे नाचले. असे व्यवहारी लोकच पुढे म्हातारपणी म्हणतील– त्यांनी प्रेम अनुभवले नसेल, दुसऱ्याच्या जीवनात मिळून जाण्यातील आनंद त्यांनी कधी अनुभवला नसेल– ज्याच्यावर प्रेम करावे किंवा ज्यांनी आपणांवर करावे असे कोणीही त्यांच्याजवळ त्या वेळेस नसेल. तरीही ते म्हणतील की, "ज्यांना प्रेम मिळाले ते धन्य, ते कृतार्थ!" त्यांना स्वतःच्या जीवनातील ओसाड भाग त्या वेळेस दिसतील. मोठा खळगा त्यांना दिसेल. काही तरी मूल्यवान आपण गमावून बसलो असे त्यांना वाटेल. प्रेम! त्याचा आनंद निराळाच आहे. ज्याच्यावर आपण प्रेम करतो तो जणू आपले सारे अंतर्बाह्य जीवन ओढून घेतो. आपला सारा जीवनप्रवाह त्याच्याकडे ओढ घेतो. प्रेम म्हणजे एका आत्म्याला दुसऱ्याने खेचून घेणे. दोन प्रेमी जीवांचे मीलन म्हणजे परस्परांतील उत्कृष्टतेचे मीलन. ज्यांच्यावर आपण प्रेम करतो त्याला आपल्याजवळचे सर्वोत्तम असे सारे आपण देऊन टाकीत असतो. प्रेम! प्रेम म्हणजे जीवनाची परिपूर्णता!'

'तुम्ही काय बोलत आहात? प्रेम करणे वगैरे सारे ठीक; परंतु जग तुमच्या प्रेमाला हसत असते. प्रेमी माणसांना जग पागल म्हणते. प्रेमामुळे तुमची टिंगल होते. प्रेम केल्याने असा फजितवाडा पदरात पडणार असेल तर त्या प्रेमात काय अर्थ?'

'बरोबर बोललीस. तू शहाणी मुलगी आहेस. व्यवहारी आहेस. प्रेम करून काय उपयोग? खरे आहे. एखाद्या धंदेवाईकाची तू छान बायको शोभशील.' असे म्हणून त्यांनी घड्याळाकडे पाहिले.

'गुलाब, जेवायची वेळ झाली. मंडळी बसली की काय? चल, आणि जेवल्यावर आपण पुन्हा दहा मिनिटे बोलू. मी लवकरच

परगावी जाणार आहे.' आपणास आनंदरामांनी पुन्हा बोलावले म्हणून गुलाब हसतमुखाने, विजय मिळाल्याप्रमाणे खाली निघून गेली. ती आनंदी होती. परंतु आनंदराम दुःखी होता. तो सत्तर वर्षांचा होता आणि एकाकी होता.

खाली जेवायला जावे असे त्याला वाटेना. ते पंक्तीतले भोजन, गप्पा मारीत जेवणे, मचमच आवाज करीत, भुरके मारीत जेवणे अशा जेवणात कलात्मकता नसते. ते ओंगळ, घामट वाढपी आणि जेवणारेही घामाघूम झालेले. ते ओंगळ आग्रह आणि ते पानातील फुकट जाणारे अन्न! सारे ओंगळ नि विद्रूप. खरे म्हणजे शांतपणे एकट्याने जेवावे. परंतु गप्पा मारीत हसत हसत जेवण्याची वैद्य लोक तारीफ करतात. वैद्यांना विरोध कोणी करायचा?

आनंदराम खरेच दुःखी होते. आज त्यांच्या दुःखात अधिकच भर पडली. गुलाबवर त्यांचा लोभ होता. परंतु तिची भावनाशून्य स्वार्थी वृत्ती पाहून त्यांच्या मनाला धक्का बसला. गुलाबविषयीचे त्यांचे स्वप्न भंगले. आणखी एक बुडबुडा फुटला. जगात प्रेम नाहीच का? सत्यं शिवं नाहीच का? स्त्रीच्या हृदयात सत्य, सुंदरता, प्रीती, पावित्र्य ही का आढळणार नाहीत? तो मनात शेवटी म्हणाला, 'आढळतील. माझी अजून श्रध्दा आहे. परंतु कोठे आढळतील? खरेच कोठे आढळणार? ही गुलाब एकवीस वर्षांची झाली. या पृथ्वीवर एकवीस पावसाळे तिने दवडले. परंतु एवढ्यातच ती अशी भावनाशून्य कशी? आणि सत्तर वर्षांचा झालो तरीही मी अजून दिव्य प्रेमाची स्वप्ने खेळवीत आहे. गुलाब, तुझ्या पात्रतेप्रमाणे तुला सुख मिळो. तुला लवकर नवरा मिळो. मांड संसार, खा, पी, सुखी हो. स्वस्त आहे तुझे सुख.'

असे मनात म्हणत तो खाली येत होता. जिन्याच्या तोंडाच्या दाराजवळ गुलाब आणि तिची आई काही तरी बोलत होती.

'सारे बिघडवलेस ना, पोरी? नीट नाही बोललीस? तुला

सतरांदा सांगितले होते की, त्याचा कल पाहून बोल. काय झाले?'

'त्या बाबतीत तो काही बोललाच नाही. वेळही नव्हता. परंतु बोलायची त्याला इच्छा आहे. "जेवणे आटोपल्यावर ये. तुझ्याशी मला दहा मिनिटे बोलायचे आहे." असे म्हणाला.'

'देव करो नि सारे नीट होवो. त्या म्हाताऱ्याला मोह पाड. त्याची राणी हो. या धनदौलतीची मालकीण हो. दहा मिनिटे. या दहा मिनिटांत तुझ्या जन्माचे बरेवाईट ठरायचे आहे. समजलीस? मी जाते. त्या बायका कुजबूज करीत आहेत. मत्सरी बायका.'

नर्मदाबाई तणतणत गेली. गुलाबही गोड हसत हळूहळू भोजनाकडे गेली. मायलेकींचे बोलणे आनंदरामाने ऐकले. ते शब्द त्याला विषासमान वाटले. त्या दोघींचा त्याला संताप आला, तिटकारा आला. सारे जग त्याला घाणेरडे दिसू लागले. आजूबाजूची फुले, फुलांचे गुच्छ, फुलांच्या माळा, तोरणे, सारे त्याला विद्रूप वाटले. आनंदराम खाली गेलाच नाही. तो परत वर गेला. ग्रंथालयात गेला. तो दिवाणखाना फार सुंदर होता. ग्रंथांनी भरलेली कपाटे तेथे होती. मोठमोठ्या तसबीरी भिंतींवर होत्या. तो तेथे उभा राहिला नि म्हणाला, 'पुस्तकांनो, मृतांच्या आत्म्यांनो, तुम्ही एकच गोष्ट खरोखर शिकवीत असता की 'अती विश्वास ठेवणे मूर्खपणाचे आहे. आपली वंचना होईल, असे माहीत असूनही आपण विश्वास टाकतो." मी आज सत्तर वर्षांचा आहे. तरीही ईश्वरावर माझी श्रध्दा आहे. जग चांगले आहे, असेच अजूनही मला म्हणावेसे वाटते. ही आस्तिकता माझ्या रोमारोमांत जणू आहे. मी ती सोडू शकत नाही. हृदयात तर वेदना आहेत. हे प्रेमहीन जीवन मी का जगलो? हृदयाला सुख नाही, मनात आनंद नाही. खरेच, का बरे मी जगलो? या जीवनाचा अर्थ तरी काय? लोक सहज म्हणतात की, जो जो जन्मला तो मरायचाच आहे. परंतु मनुष्य जन्माला येतो तरी कशाला? जन्मायचे कशासाठी तर मरायसाठी. मरण हा का जन्माचा हेतू? या सर्व

खटाटोपाचे पर्यवसान कशात तर चिमूटभर राख होण्यात. शेवटी भुरी व्हायची. सगळे विसरले जायचे. मेल्यावर सारा खेळ खलास होतो का? जीवनाचे सातत्य आहे की नाही? आत्मा म्हणजे का बुडबुडा? का मग त्या मनात प्रेरणा, ह्या आशाआकांक्षा? का ही श्रध्दा? का ही मांगल्यावर निष्ठा? काय आहे हे सारे?'

तो अशा विचारतंद्रीत होता नि ती आत आली.

'मी आले आहे.' ती म्हणाली.

'कोण? गुलाब? ये. झाले का जेवणखाण? मी खाली आलो नाही. बरे नाही वाटत मला. तुला जेवल्यानंतर ये म्हटले होते, तुझ्या आनंदाच्या आड तर मी नाही ना आलो? तुझा विडा छान रंगला आहे. तू म्हटलेस तरी तुझ्याजवळही प्रेम आहे.'

'प्रेम मला माहीत नाही. चुना नि कात असले म्हणजे सारे रंगते. तुम्ही बोलावलेत म्हणून माझा आनंद कमी न होता उलट वाढला. केव्हा एकदा जेवण होते नि तुमच्याकडे येते, असे मला झाले होते. तुमच्याजवळ बोलायला मिळावे याहून दुसरा आनंद तरी कोणता? माझा तरी हाच आनंद आहे.'

'खोटे बोलतेस तू, आणि आपण खोटे बोलत आहोत हे तुझ्या हृदयाला माहीतही आहे. माझ्याजवळ बसण्यात, बोलण्यात तुला खरोखरच आनंद वाटतो? गुलाब, जाऊ दे या गोष्टी. मी तुला फार वेळ येथे थांबविणार नाही. बस. उभी नको राहू. पित्याने मुलीजवळ बोलावे त्याप्रमाणे मी तुझ्याजवळ बोलणार आहे. तुझ्या भविष्याविषयी बोलणार आहे.'

'माझे भविष्य?'

'हो. तू आपल्या भविष्याचा कधी विचार नाही केलास? भावी जीवनाचे चित्र तू कधी मनात रंगविले नाहीस? स्वप्ने तू कधी खेळविली नाहीस?'

'कधीही नाही.'

'नसला कधी विचार केलास, तर आता कर. पाच मिनिटे

तरी आपल्या भवितव्याचा विचार कर. हे बघ, मी येथून जाणार आहे. लवकर आता परत येणार नाही.'

'तुम्ही येथून जाणार?'

'हो. मनांत आली आहे लहर. कदाचित् वर्षभरही मी दूर राहीन. जगात हिंडावे, फिरावे असे मला वाटत आहे. गुलाब, तू लहान होतीस तेव्हा मला तू फार आवडायचीस. आज जाताना तुझी काय व्यवस्था करावी असे माझ्या मनात आले. दोन गोष्टी तुझ्याजवळ बोलाव्या, विचाराव्या असे माझ्या मनांत आहे.'

'तुम्ही जाणार; मग मला कोठला आनंद?'

'माझे आयुष्य संपत आले. माझी आता सत्तरी झाली. येथे राहायचा कंटाळा आला.'

'कंटाळा? इतकी संपत्ती, हे बंगले, या बागा, हे वैभव आणि कंटाळा?'

'होय. कंटाळा आला. गुलाब, पैसा म्हणजे सुख नव्हे. पैसा म्हणजे सुख असे पुष्कळांना वाटते; परंतु मला तसे वाटत नाही. जाऊ दे. माझे पुराण नको. मला तुझ्याविषयी बोलायचे आहे. तू तुझ्या जीवनाचे काय करणार? लग्न करणारच असशील होय ना?'

'हो.'

'मग कोणी तुझ्या डोळ्यांसमोर आहे? जो तुझ्यावर प्रेम करतो आणि ज्याच्यावर तू प्रेम करतेस, असा कोणी आहे का कोणी तरुण? तुझ्यावर प्रेम करणारा, जगांत पुढे यावे अशी महत्त्वाकांक्षा बाळगणारा कोणी आहे का तरुण? ज्याची मूर्ती तुझ्या मनात आहे असा कोणी?'

'कोणी नाही. मी प्रेमाच्या फंदात कधीही पडले नाही.'

'कधीही नाही?'

'नाही. प्रेमावर माझा विश्वास नाही. तिळभरही नाही आणि मला तुमचे काही नकोही. माझे आईबाप गरीब आहेत. मी लग्न

नाही केले तर कोठे नोकरी करीन. मी शिकले आहे . तुमच्या मदतीमुळे शिक्षण तरी झाले.'

'पुष्कळ बायका अलीकडे नोकरी करतात. कोवळ्या कोवळ्या मुलीही पोटासाठी नोकरी-चाकरी करतात. परंतु तेथेही आता जीवनस्पर्धा सुरू झाली आहे. स्त्रियांना नोकरी मिळतेच असे नाही. आणि अशा नोकरी करणाऱ्या स्त्रियांना सुख असतेच असे नाही. त्याही दुःखीच असतात. कोणाच्या तरी प्रेमळ संरक्षणाखाली राहावे असेच स्त्रियांना वाटत असते. जगात एकाकी राहण्यात काय आनंद? तुला का त्यात सुख वाटेल? म्हणून म्हणतो लग्न कर. कोणी तरुण तुझ्या डोळ्यांसमोर नाही?'

'लग्न कर म्हणून तुम्ही मला सांगता, परंतु कोणी नवरा पुढे नसेल तर कसे करावयाचे लग्न? कोणाला काय धरून आणायचे आहे?'

'मी काय सांगू? तुला एक विचारू? हसू नकोस. तू माझी बायको होशील? सांग.'

'होईन.'

'कशासाठी?'

'ते काय सांगू?'

'पैसा भरपूर आहे म्हणून ना?'

'मला सुखाची इच्छा आहे. पैसा असला म्हणजे कशाची ददात नसते.'

'गुलाब, तू मला नाही म्हटले असतेस तरी ही माझी सारी संपत्ती मी तुला आज देऊन टाकली असती. परंतु माझ्याशीही लग्न लावायला तू तयार झालीस! जा, पोरी कुठेही जा. सुखी हो. नीघ. तुझे तोंडही बघू नये असे मला वाटते.'

'तुम्हीही दुष्ट आहांत. मला प्रश्न विचारलात आणि असे फशी पाडिलेत.'

'मी तुझी सत्त्वपरीक्षा केली. रागावू नकोस. जा. तुझ्याजवळ

चांगुलपणा असेल, काही थोर भावना असतील, अशी माझी कल्पना होती. जा. तुझ्या आईबापांना शोभेशीच तू आहेस.'

'आणि मला "काळे तोंड कर" असे तुम्ही म्हणता, हेच का तुमचेही माझ्यावरील निरपेक्ष प्रेम? मी कशीही असले तरी तुमचे निर्मल, वत्सल प्रेम का संपावे? तुमच्याजवळ तरी ते दिव्य प्रेम कोठे आहे? मी जाते. बसा तुम्ही एकटे अंधारात.'

ती खिन्नपणे खाली गेली. जिन्याच्या तोंडाजवळ तिची आई उत्सुकतेने उभी होती.

'काय झाले गुलाब?'

'सारे आटोपले. मी त्याला नाकारले असते तर सारी संपत्ती मिळाली असती. मी हो म्हटले आणि सारे गमावून बसले!'

'आज तो निराळ्या विचारांत होता. नैतिक, आध्यात्मिक वृत्तीत होता. मीच चुकले. माझा सल्ला निरुपयोगी ठरला. पुढे पाहू.'

'पुढे केव्हा? तो आज येथून कोठे तरी जाणार आहे. आणि लौकर परत येणारही नाही.'

इतक्यात दुसऱ्या बायका आल्या. कुजबूज सुरू झाली.

'ठरले का हो, नर्मदाबाई?'

'अहो, काय ठरायचे आहे! सारे मुसळ केरात! त्याचे कोठे दूर जायचे तेवढे ठरले.'

'गुलाबचे काय झाले?'

'जे व्हायचे ते. तुम्हांला कशाला चांभारचौकशा? भारीच बाई! चल, गुलाब, घरीच जाऊ.'

बायका पांगल्या. त्या बंगल्यातील उत्सव संपला. मोटारी, गाड्या निघून जाऊ लागल्या. गर्दी ओसरली. सारे साफसूफ झाले. तो बंगला जणू पुन्हा भूतबंगला झाला.

दिवस संपला. आता रात्र सुरू झाली. आनंदराम लिहीत होते. त्यांनी जगजीवन वकिलास एक पत्र लिहिले.

प्रिय जगजीवन,

प्रणाम.

मी अज्ञात ठिकाणी जात आहे. नोकरचाकर आता येथे नकोत. एक नोकर असू दे. तो बागेची झाडलोट करील. बाहेरच्या खोलीत तो राहील. मी योग्य वेळी शक्य झाले तर लिहीन. माझा पूसतपास नको. माझा शोध लावण्याच्या भानगडीत तुम्ही पडू नका. जे मला हवे आहे त्याच्या शोधासाठी मी जात आहे. तुम्ही सुखी असा.

तुमचा
आनंदराम

त्याने आपल्या भय्यास बोलावले. भय्या आला. आनंदराम म्हणाला, 'भैय्या, तू आता एकटा येथे राहा. बाहेरची खोली आहे, तीत राहा. इतर सर्वांना मी कायमची रजा देत आहे. ही चिट्ठी सकाळी वकीलसाहेबांस नेऊन दे. जगजीवन. ते माहीत आहेत ना? त्यांना दे. त्यांच्या सल्ल्याप्रमाणे वागत जा. काही लागलेसवरले तर त्यांच्याजवळ माग. ते पगार देतील. सारे करतील. मी लांबच्या गावी जाणार आहे. लवकर परत येणार नाही. समजलास ना? सुखी हो. जा.' भैय्या गेला. आनंदरामांनी चामड्याचा एक कसा काढला. त्यात त्यांनी पुष्कळशा नोटा भरल्या. तात्पुरत्या खर्चासाठी त्यांनी पाकिटात पैसे ठेवले. थोडा वेळ ते येरझारा घालीत होते. मध्येच खिडकीशी जाऊन दूर शून्य दृष्टीने ते बघत. शेवटी त्यांच्या तोंडावर निश्चयाचे तेज चमकले. त्यांनी पोषाख केला. त्यांनी कमरेला तो कसा बांधला आणि सर्वत्र कुलुपे लावून शांतपणे बाहेर पडले.

ते स्टेशनवर गेले. दूरच्या एका गावचे तिकीट काढून ते गाडीत बसले. आपणास कोणी पाहू नये, कोणी ओळखू नये म्हणून ते जपत होते. ते जगाचे यात्रेकरू झाले होते. निरपेक्ष

प्रेमाचा शोध करायला ते बाहेर पडले होते. पुण्याला त्यांनी गाडी बदलली. ते कोल्हापूरला आले. एका खाणावळीत उतरले. जेवण करून ते एका दुकानात गेले. त्या दुकानात जुने कपडे विकत मिळत असत. आनंदरामांनी काही जुने कपडे खरीदले. ते त्या खाणावळीत परत आले. रात्री खोलीत एकटे बसले होते. त्यांनी दार लावून घेतले. त्यांनी विकत घेतलेले जुने कपडे अंगावर घातले. डोक्याला त्यांनी फेटा गुंडाळला. स्वतःच्या झकपक पोषाखाचे त्यांनी एक गाठोडे बांधले.

आता पहाट झाली. ते उठले. खाणावळीचे पैसे त्यांनी चुकते केले होते. ते गाठोडे घेऊन ते निघाले. हातात एक भलीमोठी काठी होती. तिच्या आधाराने तो सत्तर वर्षांचा वृध्द चालू लागला. त्याचे आजूबाजूस लक्ष नव्हते. तो मध्येच डोळे मिटी, उघडी. एखाद्या वेळेस रस्त्यातच तो उभा राही. परंतु पुन्हा चालू लागे. आता दुपार झाली. तो थकला होता. विसाव्यासाठी तो जागा पाहू लागला. शेतात त्याला छाया दिसली. आंब्याची छाया. तेथे विहीरही होती. परंतु तेथे माणसे होती. तो तिकडे जात होता. परंतु पुन्हा तो मागे वळला नि रस्ता चालू लागला. चालता चालता रस्त्याच्या कडेला त्याला एक पडकी विहीर दिसली. तिच्याजवळ तो गेला. त्याने जवळच्या गाठोड्यात मोठमोठे दगड भरले आणि शेवटी ते गाठोडे त्या विहिरीत त्याने फेकले. ते गाठोडे विहिरीच्या तळाशी जाऊ लागले. त्याने आणखी दगड वरून फेकले.

'जा तळाशी जा. पुन्हा वर येऊ नको. जुना आनंदराम आता जणू मेला. जुना संसार संपला. धनाच्या राशी मिळवणारा आनंदराम मेला. आता निरपेक्ष अशा स्वर्गीय प्रेमाचा शेध करीत फिरणारा नवा आनंदराम तेवढा जिवंत आहे-' असे तो म्हणाला. त्या गाठोड्याकडे तो किती तरी तो पहात होता. हे कपडे कोणाला सापडले तर? ते का ओळखले जातील? आनंदरामाने आत्महत्या केली असे मग वृत्तपत्रांतून येईल! परंतु कपडे वर येणार नाहीत,

ते कायमचे तळाशी बसतील. त्यांचा चिखल होईल. असे विचार करीत तो तेथे उभा होता.

शेवटी तो निघाला. आता जंगल लागले. गर्द झाडी. त्याला बरे वाटले. रस्त्याच्या बाजूला झुळझुळ वाहणारा एक ओढा त्याला आढळला. तेथे जाऊन तो पोटभर पाणी प्यायला. तो भुकेला होता. परंतु पुन्हा त्याची यात्रा सुरू झाली आणि आता चढण लागली. ती टेकडी होती. सर्वत्र दाट झाडी. लता वेली. पाखरे किलबिल करीत होती. झाडांच्या पानांचा मर्मर ध्वनी होत होता. सळसळ करीत वारा वाहात होता. अनेक ध्वनींचे संमिश्र संगीत तेथे सुरू होते. विश्वसंगीत. आनंदराम जात होता. तो निराश होता. त्याची सारी स्वप्ने धुळीस मिळाली होती. मध्येच त्याच्या हृदयात आशेची कोकिळा कुहू कुहू करू लागे. परंतु पुन्हा ते बंद होई. आकाशातून एखादा पक्षी आनंदाने गात उडत असावा आणि कोणाचा तरी बाण लागून मरून पडावा तसे त्यांच्या हृदयातील आशेचे होत होते. परमेश्वर आपला जणू उपहास करीत आहे असे त्याला वाटले. पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे आपण आहोत, असे त्याला वाटले.

एका झाडाखाली तो बसला. त्याचे डोळे मिटू लागले. तो आडवा झाला. सृष्टीमाता त्याला अंगाईगीत म्हणत होती. मित्रहीन, घरदारहीन, प्रेमहीन, आधारहीन असा तो वृध्द आनंदराम त्या जंगलात दगडाची उशी करून झोपला. भूमातेच्या मांडीवर झोपला आणि तिकडे सूर्य अस्तास गेला. आकाशात सुंदर रंग पसरले. ते शेवटचे किरण झाडांतून खेळत होते. शेवटचा निरोप घेऊन घुटमळत जात होते.

ही कोणाची पावले? कोणाच्या पावलांचा हा आवाज? कोण येत आहे? तो पहा एक माणूस. चाळीस-पन्नास वर्षांचा असावा. त्याच्या जवळ एक टोपली आहे. काय आहे त्या टोपलीत? नाना प्रकारचे कंद, नाना प्रकारची मुळे, नाना प्रकारचा पाला. सारे

तिच्यात आहे. कशाला त्याने ते सारे गोळा केले होते? तो का वैद्यराज होता? ग्रामीण वैद्य? कोण होता तो?

झाडाखाली झोपलेल्या त्या वृध्दाकडे त्याचे लक्ष गेले. त्याने आपली टोपली खाली ठेवली. त्या वृध्दाकडे तो पहात होता. तेथे कसले तरी एक पुस्तक पडलेले होते. त्याने ते उचलले, उघडले.

'काव्य दिसते! रद्दी कविता. काही तरी चावटपणा असेल झाले.' असे म्हणून त्याने पुस्तक फेकले. आनंदरामाला जाग आली. त्याने डोळे उघडले.

'उठा. कोण तुम्ही? सायंकाळ झाली. उठा.'

आनंदराम उठून बसला. शून्य दृष्टीने तो सभोवती पाहात होता.

'तुम्ही कोठून आला? परकी दिसता.'

'हो. मी या मुलखातला नाही. फार लांबून आलो. या बाजूला कोठे माझी ओळख ना देख.'

'तुम्ही सभ्य दिसता. नोकरी-चाकरी नाही वाटते?'

'नाही.'

'काढून टाकले नोकरीवरून?'

'हो.'

'तुम्ही म्हातारे दिसता. फार दिवस नाही वाचणार. हल्लीच्या जगात चाळिशीच्यावर जगणे म्हणजे पाप. हातपाय धट्टेकट्टे आहेत तो मरण यावे. मी पहिल्यापासूनच स्वावलंबनाचा मार्ग धरला. आज मी साठ वर्षांचा आहे. कोणी मला काढून टाकणार नाही, हाकलून देणार नाही. मी दैववान आहे. माझे सारे भाग्य म्हणजे ही टोपली.'

'काय आहे तिच्यात?'

'तिच्यात काय नाही हे विचारा. नाना औषधी तिच्यात आहेत. तुमचे नाव काय.'

'आनंदराम, आणि तुमचे?'

'माझे नाव धनू. मी धन्वंतरी आहे. म्हणून मला धनू म्हणतात.'

'रोगावर धनुष्यबाण घेऊन हल्ला करणारे?'

'बरोबर. तुम्ही शिकलेले दिसता.'

'थोडे शिकलो होतो.'

'आता कोठे जायचे आहे तुम्हांला?'

'आजच्या रात्रीपुरता मला विसावा हवा आहे.'

'राजाची चित्रे आहेत का पण जवळ?'

'राजाची चित्रे? हं. आले लक्षात. आहेत, थोडी फार आहेत.' असे म्हणून वर राजा असलेली नाणी त्याने खिशातून काढून दाखविली.

'पांढरी चित्रे फार नाहीत वाटते?'

'मी गरीब आहे. एवढ्या चित्रांवर रात्रीचा आश्रय मिळेल का?'

'मिळेल. आहे एक जागा. तेथे तुमचे स्वागत होईल. तुम्ही जरा प्रतिष्ठित दिसता. स्वाभिमानी दिसता. तोंडावर जरा रुबाब आहे, तेज आहे, ऐट आहे.'

'कसले तेज नि कसली ऐट? मला कशाचाही अभिमान नाही. ज्याचा गर्व करावा असे माझ्याजवळ काही नाही. जगातील अती दुःखी, हताश, निराश असा मी एक प्राणी आहे. मी जगलो काय किंवा मेलो काय, कोणीही पर्वा करायला नाही. कशाचा करू गर्व? कशाचा बाळगू अभिमान?'

'परंतु मी तुम्हांला घेऊन जातो. माझ्यामुळे तुम्हांला प्रतिष्ठा मिळेल. माझ्याबरोबर चालल्यामुळे तुम्ही अब्रूदार ठराल. चला. उठा.'

'मी तुमचा आभारी आहे.' 'उठा, माझा हात धरा.' धनुर्वैद्याने आनंदरामाचा हात धरला. हा मनुष्य कीव करीत आहे याचे आनंदरामला वाईट वाटले. औषधी गोळा करणाऱ्या त्या धन्वंतऱ्याच्या पावलांपेक्षा त्याचीच पावले नीट पडत होती. ते दोघे जंगलातून बाहेर पडले. आकाशातील तारे आता दिसू लागले.'

'तो पहा प्रेमाचा तारा.' धनू म्हणाला.

'शुक्र ना?'

'आम्ही त्याला प्रेमाचा तारा म्हणतो.....'

प्रेम! आनंदरामांच्या हृदयात प्रेमाची ज्योत पुन्हा प्रज्वलित झाली. त्याला शक्ती आली. प्रेमाच्या शोधार्थ आपण जात आहोत. थकून कसे चालेल? असे त्याच्या मनांत आले. त्याच्या तोंडावर तेज आले.

आणि तिकडे दूर समुद्र गर्जत होता. आनंदराम जरा थांबला. दुरून कोणी हाक मारीत आहे असे त्याला वाटले. ती प्रेमाची हाक की मृत्यूची हाक? अनंताची हाक की अंतकाची?

'थकलेत, खरे ना? कंबरडे मोडून गेले ना? हे घ्या, सुपारीचे खांड चघळा. खा, दात आहेत ना?'

प्रेमाने दिलेले खांड त्याने घेतले.

'आणि हा रस घ्या. एका वनस्पतीचा हा रस आहे. दिव्य रस. या रसामुळे म्हातारे तरुण होतील. राजे लोक जर हा रस रोज पितील तर ते अमर होतील. परंतु ते अमर होणे म्हणजे जगाला शापच, नाही का? घ्या, घ्या ही बाटली.'

'किती पिऊ?"

'सारी घ्या. या जंगलात भरपूर पाला आहे. मी पुन्हा रस काढीन. मी माझ्या खिशात हा रस नेहमी ठेवतो. दोन घोट घेताच सारा थकवा जातो. जंगलातून अशा दिव्य वनस्पती असतात, परंतु आपले लोक मूर्ख. देव देतो नि कर्म नेते. त्यांना डॉक्टरांची औषधे हवीत. सुया टोचून घेणे त्यांना आवडते, मूर्खांचा बाजार!'

आनंदरामाचे लक्ष धनूच्या बोलण्याकडे नसून दुरून येणाऱ्या सागरसंगीताकडे होते. सर्वत्र अंधार होता. वरती अनंत तारे शांतपणे चमचम करीत होते आणि ती सागराची गंभीर गर्जना, त्या सागरसंगीताचा काय अर्थ? तो अनंत सागर पृथ्वीची प्रार्थना का करीत होता? तिच्या चरणांवर अनंत काळापासून तो आपले

हृदय ओतीत आहे. निराशेने मागे जातो. परंतु पुन्हा प्रेमाची फुले उधळीत, उचंबळून तो पृथ्वीकडे धाव घेतो. पृथ्वीचे पाषाणी हृदय द्रवत नाही. सागरसंगीत? काय आहे त्याचा अर्थ? ते का अनंताचे आत्म्याला आमंत्रण आहे? परमात्म्याचे जीवात्म्याला बोलावणे? ती सनातन हाक आहे. 'मी येऊ? तू येतेस?' असे जणू अपार सागर पृथ्वीला सारखे विचारीत आहे. आनंदराम विचारांच्या समाधीत होता. आपण जणू मृत्यूच्याजवळ आहोत असे त्याला वाटले. सभोवती अनंत विश्व होते. आपण सिंधूतील एक बिंदू असे त्याला वाटले. मानवी जीवन म्हणजे बुडबुडा! जगात दोनच सार्वभौम सत्ये आहेत. जीवन आणि मरण! ती दोन्ही आनंदरामासमोर जणू मूर्तिमंत उभी होती. जीवन विचारीत होते, ' काय मिळवलेस? पैशाहून अधिक शाश्वत असे काय मिळवलेस? पैशाने जी सत्ता मिळते. तिच्याहून अधिक मोलाचे काही मिळवलेस का?' मृत्यूही विचारीत होता, 'हिशोब दे. काय मिळवलेस? काय आणलेस? चिंध्या गोळा करून आणल्यास? भिकारड्या, पै किमतीच्या वस्तू मोलाच्या समजून तू गोळा करून आणल्यास? हा घे मोबदला. जे आणले आहेस त्याच्या किंमतीचाच मोबदला मिळेल. अधिक नाही.'

आनंदरामाजवळ काय होते? शून्य होते? शून्य होते, त्याला शून्य मिळणार. परंतु अजून तो जिवंत आहे; शोधीत आहे. मूल्यवान वस्तूच्या शोधार्थ म्हातारपणीही सर्वत्यागाने तो निघाला आहे. त्याला ते थोर सत्य तरी सापडेल, नाही तर सारे शून्य होईल.

आनंदराम चालत होता. ती समुद्रगर्जना त्याला शांती नव्हती देत. समुद्र आपला तिरस्कार करीत आहे, आपल्याला टोमणे मारीत आहे असे त्याला वाटले. अंधार होता. रस्त्यात दगडधोंडे होते. एका ठिकाणी अडखळून तो पडणारच होता; परंतु कसाबसा सावरला.

'जरा जपून चाला. माझ्या मागोमाग या.'

'कोणाच्या मागून जाणे मला आवडत नाही.'

'तर मग पडा, धडपडा.'

'धडपड करण्यासाठीच मी निघालो आहे.'

'करा धडपड. मी शांत वृत्तीचा मनुष्य. मला समाधान आहे. मी एक पुस्तक वाचले होते. 'दीर्घायुषी कसे व्हावे?' माझे वडील शंभर वर्षांचे होऊन गेले. आजोबा एकशे-दहा वर्षे जगले होते. मी नव्वद वर्षे तरी जगेन अशी मला उमेद आहे.'

'तुमच्याजवळ रस देणारी ती पाने आहेत. तो रस विकून मनांत आणाल तर तुम्ही लक्षाधीश व्हाल.'

'परंतु मला तशी इच्छा नाही. आम्ही औषधी वनस्पती शहरात नेऊन दिल्या, तर आम्हांला देतील पाच दिडक्या; आणि स्वतः विकून पाच रुपये करतील! शहरे म्हणजे लुबाडणारी; खेड्यांना भरपूर मोबदला ती कधीही देणार नाहीत. मी आहे तो बरा आहे. लक्षाधीश होऊन काय करू? लक्षाधीश का सुखी असतो? कशासाठी जगतात असे लोक, हरीला माहीत! त्यांना सृष्टीचा आनंद नाही. फुले, पक्षी, झाडेमाडे, डोंगर, दरीखोरी, हे अगणित तारे, हे थंड वारे, सूर्योदय, सूर्यास्त, कोणता आनंद आहे त्यांच्याजवळ? भिकारडे बेटे! कधी नदी बघणार नाहीत, ओढ्याचा खळखळ आवाज ऐकणार नाहीत. ओढे, नाले! त्यांचे किती आवाज! तुम्ही कधी ऐकले आहेत? तुम्हांला या सृष्टीची विविध भाषा आहे माहीत? अनंत ध्वनींचा निसर्गाचा अखंड रेडिओ येतो का तुम्हांला ऐकायला? लक्षाधीश! भिकारडे सारे. मागे एक लक्षाधीश मोटार उडवीत इकडे आला. जिकडे तिकडे धूळच धूळ! हे का मोटारीचे रस्ते आहेत? कशाला इकडे मरायला येतात? पेट्रोलची ती घाण. आणि ती मोटार एके ठिकाणी बसली. चालेच ना. ती रुसली. शेवटी बैल लावून ते धूड ओढीत न्यावे लागले!'

धनूचे प्रवचन चालू होते. पाले गोळा करणारा, कंदमुळे गोळा

करणारा हा वैदू किती सुखी, समाधानी असे आनंदरामाला वाटले. पाले गोळा करून याने समाधान मिळविले आहे. ते लाखो रुपये मिळवूनही मला मिळाले नाही, असे तो मनात म्हणाला.

आणि तिकडे कोकिळा कुहू कुहू करीत होती.

'हा कोणता पक्षी ओरडत आहे? टाहो फोडीत आहे?'

'हा पक्षी? अहो, हा कोकिळेचा आवाज. कोकिळ आणि कोकिळा एकमेकांस साद घालीत असतात. हल्ली वसंत ऋतू आहे. झाडांना नवीन पल्लव फुटले आहेत. जणू सर्वत्र नवजीवन आहे. तुम्ही पळसाची झाडे पाहिलीत का येताना? कशी लाल लाल झाली आहेत! आता कोवळी पाने त्यांना येत आहेत. झाडावर पान नाही; परंतु लाल फुलांनी सारे भरलेले. मौज आहे, नाही? मनुष्याजवळ धनदौलत नसली तरी भावनांना काय तोटा? असे जणू ते झाड सांगत असते. कोकिळा हो ही. अंधार पडला तरी कुहू करीत आहे.'

'कोकिळा! मी लहान होतो तेव्हा हा आवाज ऐकला होता. साठ वर्षांनी आज हा कुहूऽ आवाज मी ऐकत आहे.'

'खरे की काय?'

'खरेच. मी मोटारीतून तसा सर्वत्र हिंडलो, फिरलो. परंतु कोकिळा कधी पाहिली नाही, कुहू कधी ऐकले नाही. ही कोकिळा. तुमचा मी आभारी आहे.'

'तुला कोकिळा माहीत नाही? मूर्ख. तुम्हा शहारातल्या लोकांना काही माहीत नसते. हल्लीचे शहरी डॉक्टर. अपेंडिसायटिसचे शस्त्रकर्म करतात. ते एक पोटात उजव्या बाजूस शेपूट असते. ते कापून टाकतात. आणि म्हणतात, 'देवाने हे कशासाठी ठेवले कळत नाही. या शेपटाचा उपयोग काय?' असे विचारतात. देवाला म्हणावे आता धडे घे या डॉक्टरांजवळ. उठल्याबसल्या कापाकापी. आणि कापाकापीसाठी पैसे! मरण येण्याच्या आधीच देवाकडे देतात पाठवून. शहरातून डॉक्टरांचा,

औषधांचा किती सुळसुळाट! आणि जरा काही झाले की औषध हवे. पडसे, खोकला जरा होताच घाबरतात. थोडे अंग गरम होताच घाबरतात. सारी माणसे भितूरडी झाली आहेत. अरे, मर्दासारखे मर्द तुम्ही. तुम्ही का किडे, उंदीर? इतके घाबरायला काय झाले? आणि पुरुषांपेक्षा त्या बायका अधिक शूर असतात, सहनशील असतात. स्वयंपाक करताना भाजले तरी बोलणार नाहीत. भाजी चिरताना कापले तर कोळिष्टक लावतील. खरेच; बायका फार सहनशील. तापातही त्या काम करतील. चालतच नाहीसे झाले म्हणजे मग त्या औषध घेतील.'

'परंतु बायका स्वार्थीही असतात. तुम्हांला नाही वाटत?'

'स्वार्थी? काय, बोलतोस काय? कोठे जन्मलास तू? कोणत्या बायका पाहिल्यास? कोणत्या आहेत तुझ्या ओळखीच्या? शहरांतील की खेड्यांतील? तू त्या शहरांतील पोषाखी बाया बघितल्या असशील. परंतु त्या बायकाच नव्हेत. मुलांना पाजण्यातही त्यांना कमीपणा वाटतो. बायका म्हणे स्वार्थी! अरे, त्या रात्रंदिवस काम करतात. क्षणभर त्यांना विसावा नसतो. रात्रभर मुलांना आंदुळत बसतील. त्यांना सगळ्यांची काळजी. नवऱ्याची, मुलाबाळांची. म्हणे त्या स्वार्थी असतात! अरे, स्वार्थाचा विचार करायला क्षण तरी त्यांना मिळतो का? कोंबड्याबरोबर उठतात. चूल सारवतात. भांडी घासतात. केर काढतात. सडा घालतात. गाईम्हशींचे दूधही त्या काढतात. शेण काढतात, शेण्या घालतात. मुलाबाळांच्या आंघोळी. मोटभर धुणी धुवायची, भाजी चिरायची, भाकर भाजायची, धान्य निवडून, वाळवून ठेवायचे. किती कामे! मसाला हवा; लोणचे हवे! आज पापड, उद्या शेवया. त्यातच मुलांची आजारपणे. आज दात येत आहेत. आज डोळे आले आहेत. आज देवी, उद्या गोवर; आज कांजण्या, उद्या खोकला. कधी नवरा दारू पिऊन येतो. मारतो. जवळ असलेले सारे लुबाडतो. परंतु त्यालाच ती प्रेमाने अंथरुणावर निजवते. ती त्याची काळजी घेते. तिच्या मुलाबाळांचा तो पिता

असतो. अरे, हजारो, लाखो बाया खेड्यांतून, शहरांतूनही याप्रमाणे रात्रंदिवस राबत आहेत, सेवा करीत आहेत. त्या निःस्वार्थी आहेत. तुझी आई होती की नाही? ती का चांगली नव्हती?'

'तुमचे म्हणणे बरोबर आहे. मी चुकलो. काही तरी मी बोलतो. स्त्रियांचे स्वरूप तुम्हीच अधिक नीट ओळखले आहे. तुम्ही मला धडा दिलात. मनुष्याने नेहमी शिकत असावे. मी म्हातारा झालो असलो, तरी मला शिकायची इच्छा आहे. मला वाईट अनुभव आला म्हणून मी स्त्रियांसंबंधी तसे बोललो.'

'अरे, तुझा अनुभव म्हणजे का साऱ्या जगाचा? ताटात एक माशी पडली म्हणजे का सारे ताट माश्यांनी भरले? जगात वाईट बायकांपेक्षा चांगल्या अधिक आहेत. ध्यानात धर.'

आणि गाव जवळ आला.

'तुम्ही मला कोठे नेणार? रात्रीचा विसावा कोठे देणार?'

'एका खाणावळीत. त्या खाणावळीचे नाव विश्राम-आश्रम असे आहे. खरेच; विश्वासाने तेथे जावे. तेथे कधी फसवणूक होणार नाही. आणि विश्वासू गिऱ्हाइकांनीच तेथे जावे, इतरांना तेथे मज्जाव आहे. विश्वास द्यावा नि विश्वास घ्यावा. एक बाई चालविते ती खाणावळ. तिचा नवरा मेला. ती एकटी आहे. सारे तिलाच पाहावे लागते. मोठी शूर आहे बाई. भीती तिला माहीत नाही. कोणी तरी तिला विचारले, 'भुते आली तर?' ती म्हणाली, 'केरसुणीने त्यांना घालवून देईन.' एकदा मी म्हटले, 'आजीबाई, आकाश वरून कोसळले तर?' ती म्हणाली, 'त्याच्या पायऱ्या करून वर चढू लागेन.' मोठी धीराची बाई. हिमतीची. तो बघा मिणमिणा दिवा. तीच खाणावळ. विश्वासू माणसांची खाणावळ.'

'ती मला देईल का आश्रय? घेईल का आत?'

'तुम्ही माझे मित्र म्हणून ती नक्कीच तुम्हांला आश्रय देईल.'

'तुमचा मी मित्र?'

[faint library stamp]

'हो, जो रस्त्यात विश्वास टाकतो तो मित्र नाही का? माझी तुम्हांला भीती वाटती तर माझ्याबरोबर तुम्ही आला असता का?'

'खरे आहे. आपण मित्र आहोत. तुम्ही दयाळू आहात. का बरे असे तुम्ही दयाळू, असे प्रेमळ, असे सहानुभूती दाखविणारे?'

'का म्हणून काय विचारता? याला का काही कारण लागते? एखाद्याला हात देणे, मदत करणे, हा सहज धर्म आहे. तुम्ही दुःखीकष्टी दिसलात; त्रस्त झालेले दिसलात. तुम्हांला मदत करायला नको? त्याला कारणे कशाला? ही बघा आली खाणावळ. ही पाटी. पाटीवरचे विश्वासू माणसाचे चित्र पहा.'

आतून आवाज येत होते. माणसे होती.

'जागा आहे का?' धनूने विचारले.

'मनुष्य कसा आहे त्यावर अवलंबून आहे.' उत्तर मिळाले.

'ठीक. बरोबर; अगदी बरोबर! परंतु माणूस माझ्याबरोबर आलेला आहे.'

'मी तुम्हांला ओळखते. परंतु तुमच्याबरोबरच्या माणसास नाही ओळखीत. परक्यांना मी आत घेत नसते.'

'परंतु हा तसा परका नाही. माझा जणू मित्र. मी त्याला वाटेत सांगितले की, भल्या माणसांनाच तेथे जागा मिळते. आजीबाई, हा म्हातारा आहे, थकलेला आहे. त्याला नाही म्हणू नका. उघड्यावर कोठे झोपेल बिचारा? भुकेलाही आहे.'

'कोठून हो आलेत?' तिने विचारले.

'तिकडून-लांबून आलो; कोल्हापूरकडून.'

'जाणार कोठे?'

'तिकडे गुहागरकडे.'

'पायी आलात?'

'हो.'

'आणि पायी जाणार?'

'हो.'

‘कसे जाणार? आता रस्ता वाईट आहे. आणि वाटोवाट घाट. चढउतार. तुम्ही थकलेले दिसता. भूक लागली का?’

‘असे वाटते.’

‘वाटते काय? चांगलेच भुकेलेले दिसता. पडा त्या खोलीत, कपडे काढा. हातपाय धुवा. मी ताट आणते वाढून. तुम्ही म्हातारे आहात; नुसती चटणीभाकरी तुम्हांला कशी चालेल.’

‘खाणावळीणबाई चांगली आहे म्हणाले ते खरे की नाही? हा म्हातारा अगदी गरीब नाही. आठबारा आणे देईल. काही राजाची चित्रे त्याच्या खिशात आहेत-?’ धनूने म्हटले.

‘रुपया पडला तरी देईन.’ आनंदराम म्हणाला.

‘म्हातारबाबा, एक वेळ जेवणाचे सहा आणे; रात्री अंथरुण हवे असेल तर तीन आणे; सकाळच्या चहाचे दोन आणे; सकाळी आंघोळ करायची असली तर आणखी एक आणा; असे दर आहेत. कॉफी, दूध वगैरे काही लागले तर निराळे पैसे द्यावे लागतील.’ खाणावळीण-बाई सांगत होती.

‘जो दर असेल त्याप्रमाणे मी देईन.’

खाणावळीणबाई आत गेली. इतर मंडळी तेथे होती. ते सारे धनुवैद्याच्या ओळखीचे होते. तो तेथे बसला.

‘रामराम, दादांनो. सारे बरे आहात ना?’ त्याने विचारले.

‘सारे बरे आहोत. हे कोण आणलेस? तुझे वडील की काय?’

‘मी मृतांना उठवून आणत नाही. औषधी वनस्पतीत ते कधीच मिळून गेले असतील. हा एक बेकार म्हातारा आहे.’

‘माझीसुध्दा नोकरी नाही का गेली? मी प्रामाणिक म्हणून माझी नोकरी गेली! त्या एका जमीनदाराकडे कामाला होतो. त्याला अप्रामाणिकपणे वागणारे, जमीनदार सांगेल त्याप्रमाणे खोटे बोलणारे नोकर हवे होते. जगात सरळपणाने वागणे म्हणजे पाप आहे.’ तेथील एकजण म्हणाला.

'हा तर चांगला सुशिक्षित दिसतो.' दुसरा कोणी बोलला.

'सुशिक्षित आणि बेकार.'

'अहो, शिकणे म्हणजे अधिक नालायक होणे. शिकलेल्यांना दुसरे काही करता येत नाही.'

'म्हातारबाबा, कोणता धंदा करीत असा?'

'धंदा नाही. कचेरीत काम करीत असे.'

'म्हणजे लिहिणे, वाचणे, हिशेब, कचेरी झाडणे, निरोप घेऊन जाणे, टपाल नेणे; असे काम ना?'

'बरोबर.'

'तुम्हांला का बरे काढून टाकले?'

'म्हातारा म्हणून.'

'किती वय?'

'सत्तर.'

त्या सर्वांना त्यांच्याविषयी करुणा वाटली. खेड्यातील मंडळी ती. शिकलीसवरलेली नव्हती. परंतु त्यांच्या भावना मेलेल्या नव्हत्या. वयाविषयी त्यांना आदर वाटे. कशाला म्हाताऱ्याची अडगळ, असे त्यांना वाटत नसे.

इतक्यात एका मोलकरणीने ताट वाढून आणले. आनंदरामाने तिला दोन आणे दिले.

'मला कशाला?'

'घे.'

ती त्याच्याकडे भक्तिप्रेमाने पहात निघून गेली.

'बसला का तो जेवायला?' मालकिणीने तिला विचारले.

'बसला. हळूहळू जेवत आहे. कोणी तरी भला माणूस दिसतो.'

'तुला काही दिले असेल. किती दिले पैसे?'

'दोन आणे.'

'तुला सकाळपासून अशी चिरीमिरी किती मिळाली?'

‘हे दोन आणे धरले तर सहा आणे होतील?’

‘आण ते दोन आणे इकडे. चार आण्यांच्यावर जी चिरीमिरी होईल ती माझ्या पेटीत टाकीत जा म्हणून सांगितले आहे की नाही?’

‘परंतु हे दोन आणे असू दे.’

‘बरे तर, ठेव. रोज देवाची प्रार्थना करतेस की नाही?’

‘करते.’

‘खाणावळीत येणाऱ्यांबद्दल काय म्हणतेस?’

‘जे जे या खाणावळीत येतील ते सुखी, समाधानी असोत. त्यांना संकटे न येवोत, असे मी म्हणते.’

‘आज या म्हाताऱ्याविषयीही प्रार्थना कर. समजलीस ना? जा आता.’

म्हातारबाबांचे जेवण झाले. दहा वाजले तरी गप्पा मारायला लोक येतच होते. ती खाणावळ म्हणजे सर्वांच्या बैठकीची जागा. आणि धनुवैद्यासारखा गप्पाड्या कधी मिळायचा नाही. धर्म, तत्त्वज्ञान, ज्ञानविज्ञान, वैद्यक-सर्व विषयांचे ग्रामीण ज्ञान त्याच्याजवळ होते. तो आपल्या बोलण्याने सगळ्यांचे लक्ष ओढून घेई. तो मधून मधून त्या खाणावळीत येत असे. श्रीपतीची बायको भांडखोर म्हणून तोही कधी खाणावळीच्या अंगणात येऊन झोपे. हरीचे घरचे नव्हते. म्हणून तोही इथे विसाव्याला येई. अशी माणसे तेथे जमायची. त्यांच्या गप्पा चालायच्या. आजही त्यांच्या गप्पा सुरू होत्याच.

‘म्हणे सक्तीचे शिक्षण करा. कशाला? अहो, शिकून अधिक नालायक होतात. मुलगा चौदा वर्षांचा होईपर्यंत म्हणे शिकत राहिलाच पाहिजे! मग शेण कोण गोळा करील, गुरे कोण चारील? आणि ते नालायक शिक्षण! कोणता राजा कधी जन्मला नि कधी मेला हे घोकायचे. शेत नांगरायला येत नाही; पीक काढता येत नाही; दूध काढता येत नाही; भाजीपाला तयार करता येत नाही; काय करायचे शिक्षण? मुलींनाही तेच शिक्षण, मुलांना तेच. मुली कशा हव्यात

धट्ट्याकट्ट्या, कामाला जसा वाघ. परंतु या शिकलेल्या मुली. त्या अळुबाई हळुबाई होतात. रोगट नि फिक्कट. पाठी वाकलेल्या. मुले होतात, तीही चिरीमिरी, रोगी. असल्या शिक्षणाने राष्ट्र उद्या मरेल.'

'आधी नांगर धरायला शिकवा म्हणावे! हातात नांगर न घ्याल तर खाल काय, माती? आणि या शिकलेल्यांना ना देव ना धर्म.'

'हवा कशाला देव-धर्म. देवदेव करणारे सारे दांभिक असतात. बोवाबाजीचा प्रकार. मंदिरात भ्रष्टाचार.'

'असतील कोणी वाईट; म्हणून धर्माला नावे ठेवावी? मनुष्याने चांगले व्हावे म्हणून धर्म असतो.'

'भले वागणे हा माझा धर्म.'

तेथे वाद सुरू झाला. खाणावळीणबाई रागाने बाहेर आली. एकदम ते सारे शांत झाले. इतक्यात आणखी कोणी तरी तेथे आले. तो सर्वांच्या ओळखीचा होता. त्याचा जाडाभरडा पोषाख होता. तेजस्वी होता, उंच धिप्पाड होता.

'ये, ये; बळिरामदादा. आज बरोबर मुलगा नाही? एकटाच आलास?'

'बाळाला निजवून आलो. आणि हा कोण नवीन माणूस? आपल्यातील नाही दिसत. मित्र आहे की शत्रू?'

'मित्र.' धनू म्हणाला.

'म्हातारा आहे; गरीब आहे.' श्रीपत बोलला.

'म्हातारा नि दरिद्री? तरी अजून जगावेसे वाटते त्याला? कंटाळला नाहीस का रे?' बळिरामाने विचारले.

'कंटाळलो तर आहे; परंतु पुरा नाही.' आनंदराम म्हणाला.

'गरीब असणे बरे; परंतु म्हातारा होणे नको. मी जर असा म्हातारा झालो तर समुद्रात जीव देईन. शरीर दुबळे आणि हृदयही प्रेमशून्य. कशाला मग जगायचे?' बळिराम बोलला.

'पुनःपुन्हा लग्ने करावी. एक बायको मेली की दुसरी. मरेपर्यंत प्रेम करीत राहावे.' हरी हसून म्हणाला.

‘लग्न म्हणजे प्रेम नव्हे. मी एकदाच लग्न केले. ती देवाघरी गेली आणि आता मुलगा चार वर्षांचा आहे. त्याच्याकडे बघतो नि समाधान मानतो.’ बळिराम गंभीरपणे बोलला.

‘बळिरामदादा, तुमचा मुलगा किती सुंदर दिसतो! त्याला शाळेत घालाल?’ धनूने विचारले.

‘छट्. कधी नाही. तो शेतातील फुलाप्रमाणे वाढेल. निसर्गाच्या, सृष्टीच्या सहवासात वाढेल.’

‘बळिराम, तुझे बोलणे ऐकत राहावेसे वाटते. तू वडारांच्या संगतीत राहतोस; परंतु तू वडार नाहीस.’ श्रीपत बोलला.

‘मी कोण? जाऊ दे.’

इतक्यात गोविंदबोवा तेथे आले.

‘या गोविंदबोवा.’ धनू म्हणाला.

‘बळिरामाला अजून पोलिसांनी पकडले नाही का? फार म्हणे मारामाऱ्या करतो.’ गोविंदबोवा रागाने, तिरस्काराने म्हणाले.

‘गरिबांना न्याय मिळावा म्हणून, गोविंदबोवा.’ श्रीपतीने उत्तर दिले.

‘न्याय परमेश्वर देईल.’

‘परमेश्वर का आपल्या हृदयात नाही? तो कोठे कोपऱ्यात खुर्ची-टेबल मांडून बसला आहे? गोविंदबोवा, तुमच्या गळ्यात माळा असतात; परंतु खरे लफंगे तुम्हीच आहात की नाही? तुम्ही का आम्हांला धर्म शिकवावा? तुमची सारी कुलंगडी आम्हांला माहीत आहे.’

‘जाऊ दे, बळिराम, जाऊ दे.’ धनू म्हणाला.

‘आणि म्हातारा कोण? कोठून रे आलास?’ गोविंदबोवांनी विचारले.’

‘आलो कोल्हापूरकडून; जायचे दाभोळ-गुहागरकडे.’

‘चालत आलास? चालत जाणार?’

‘हो.’

संग्रहालय

'भीक मागत असशील.'

'कधी कधी.'

'आज नाही वाटते तुम्हांला भीक मागायची? येथे परिश्रमालय आहे. त्यात काम करा. या गावात भीक मागायची बंदी आहे. भीक मागाल तर पाटील चावडीवर बोलावील.'

'मी वृध्द आहे.'

'म्हणजे आळशी. होय ना?'

'अहो गोविंदबोवा, त्याला असे बोलणे का तुम्हांला शोभते? अनाथाला असे बोलणे हा का धर्म?'

'तू नको मला शिकवायला. कोणी आळशी असता कामा नये.'

'आणि तू रे कोणते काम करतोस?'

'भजन पूजन. मी का रिकामा असतो?'

'कोणाला टाकून बोलू नये म्हणून साधुसंत सांगतात. अनाथ अपंगांची दया करावी असे सांगतात. तू तर ह्या दुर्दैवी म्हाताऱ्याला शिव्या देत आहेस. तुला ना धर्म, ना काही. तू एक गावगुंड आहेस.' धनू म्हणाला.

'मी गावगुंड?'

'हो. एका मुलाने घरी बहिणीचा वाढदिवस होता, म्हणून तुमच्या मंदिराच्या आवारातील चार फुले तोडली, तर त्याला चोर म्हणून तुम्ही तुरुंगात पाठविले. दहा वर्षांचा तो मुलगा. तुरुंगात तो अधिकच बिघडेल. हा तुमचा धर्म! दुष्ट बेटे!'

'चोरी ती चोरी. ती फुलांची असो वा हजारो रुपयांची असो.'

'गप्प बैस. पुरे तुझे प्रवचन. आनंदराम, मी जातो.' धनूने सांगितले.

'तुमचा मी आभारी आहे. मी तुम्हांला विसरणार नाही.'

'सकाळी भेट झाली तर ठीक. नाही तर ही बाटली घेऊन ठेवा. वाटेत थकलात तर तिच्यातील रस प्या. परंतु पायी जाऊच नका. तुम्ही थकाल.'

'बघेन.'

'मी जातो. तुम्हांला या प्रदेशातील लोक मदत करतील. सारे भले लोक आहेत. त्यांनी प्रजाराज्य जणू स्थापिले आहे. ते राजा मानीत नाहीत; सरकार मानीत नाहीत. पिकवतात, खातात. ते वाऱ्याप्रमाणे मोकळे आहेत. ते कधी अर्ज-विनंत्या करणार नाहीत.'

'येथले सारे लोक भामटे आहेत, दरोडेखोर आहेत.'

'गोविंदबोवा, तोंड सांभाळून बोला. खरे डाकू तुम्ही.'

'मी डाकू? मी तर धर्ममार्तंड.'

'तुमचे तोंडही पाहू नये. म्हणे धर्ममार्तंड! तुमच्यासारखा दुष्ट, भ्रष्ट कोणी नाही. बोवा पाहिला की ठोकावे असे मला वाटते. तुझ्या पापांची सांगू का यादी?' धनू रागाने बोलत होता.

'बाबा, चला ना घरी!' श्रीपतीची मुलगी तेथे येऊन म्हणाली.

'जा घरी; पोरगी आली बोलवायला. तुझ्या बायकोला भरवसा कोठे आहे?' गोविंदबोवा म्हणाला.

'धनू, या गोविंदबाबाला प्रेमाचा नवीन रोग जडला आहे. एका मुलीवर तो प्रेम करू लागला आहे. त्या मुलीला तुझा तो प्रेमाचा पाला दे मूठभर! म्हणजे ती या बोवांवर प्रेम करू लागेल. मला सारे माहीत आहेत याचे चाळे. त्यांच्यासाठी निराळा नरक करावा लागेल. पहिला नरक याला घ्यायला तयार होणार नाही.' खाणावळीण बाई म्हणाली.

'म्हातारबाई पुरे बडबड.' असे म्हणून गोविंदबोवा तेथून पळाला.

'अहो पाहुणे, तुम्ही आता निजा. अंथरुण तयार आहे.' खाणावळीण बाईने सांगितले.

'जा म्हातारबोवा जा.' सारे म्हणाले.

आनंदराम उठला. माडीवर एका खाटेवर त्याचे स्वच्छ अंथरुण घालण्यात आले होते. तेथे मेणबत्ती होती. काड्यांची पेटी होती.

'तुमचे काम झाले म्हणजे मेणबत्तीला निरोप द्या. ही पेटी येथे आहे. जरूर पडली तर लावा मेणबत्ती. काही लागले सवरले तर

... वाचनालय, सातारा
... योजना

मला हाक मारा. माझे नाव सावित्रीआजी. माझी झोप फार सावध असते. पटकन मी जागी होते. निजा हं...'

असे म्हणून खाणावळीणबाई गेली. आनंदराम अंथरुणावर पडला. तो अनेक विचारांत मग्न होता. त्याला झोप येईना. या कुशीवरून त्या कुशीवर तो होत होता.

इकडे खाली श्रीपती, हरी, बळीराम वगैरे बोलत बसले होते. आजीबाई दुसऱ्या दिवशीची भाजी निवडीत होती. मध्येच ती काही कामाला आत गेली. दूध वगैरे विरजायचे होते. इकडे या मित्रमंडळात निराळाच विषय निघाला.

'तो दुर्दैवी मनुष्य दिसतो. तो पायी कोठे कसा जाईल? कोठे जायचे आहे त्याला? आपण त्याला थोडी वर्गणी करून देऊ या. एक दिवस तरी धर्मात्मा त्याला भेटेल. तो करील मदत. आपण आपले कर्तव्य करू या.' बळिराम म्हणाला.

'माझा एक रुपया.' श्रीपतीने आकडा घातला.

'माझे तीन रुपये.' बळिरामने सांगितले.

'माझे आठ आणे.' हरी म्हणाला.

'माझे आठ आणे.' तारा मोलकरीण पुढे येऊन म्हणाली.

'तुझ्या मालकिणीला तिचा आकडा विचार.' बळिराम तिला म्हणाला.

'कसला रे आकडा? काय भानगड?' सावित्रीआजी बाहेर येऊन म्हणाली.

'सावित्रीआजी, तो वाटसरू दुर्दैवी मनुष्य दिसतो. तो थोर घराण्यातील असावा. बिचारा दुःखीकष्टी आहे. तो जगाला विटलेला दिसतो. कोठे जाणार तो पायी? आम्ही त्याच्यासाठी वर्गणी गोळा करीत आहोत. हे पहा आकडे. तुमच्या मोलकरणीच्या मुलीनेही आठ आणे दिले.'

'तिला द्यायला काय होते? घरी आईला कळले तर लाकूड घालील पाठीत!' खाणावळीणबाई बोलली.

'माझी आई गरीब असली, तरी गरिबाला द्यायला ती कधी नाही म्हणणार नाही. ती पाठीत लाकूड तर नाहीच मारणार, उलट माझी पाठ ती थोपटील.' तारा म्हणाली.

'त्या पाहुण्याने तुला बरेच पैसे दिले वाटते?'

'तो कोठून देईल? त्याने दोन आणे दिले, तर तुम्ही तेही घेणार होता. तो बिचारा गरीब आहे.'

'आजीबाई, बळिरामाने तीन रुपये दिले. हरीनेसुध्दा आठ आणे दिले. पाच रुपये झाले आहेत. तुमचे पाच रुपये घाला. दहा रुपये आपण त्याला देऊ.'

'दहा रुपये त्याला कितीसे पुरणार?'

'पुढची काळजी देवाला; आपण आपले कर्तव्य करावे.' बळिराम गंभीरपणे बोलला.

'बरे तर. माझे पाच रुपये घाला. माझ्याजवळ फार पैसे नाहीत हो, नाही तर डांगोरा पिटाल. चोर, डाकू, यायचे.'

'हा बळिराम या पंचक्रोशीत हिंडत आहे तोवर चोर, डाकू येणार नाहीत. तुमच्याविषयी सर्वांना आदर वाटतो. सावित्री-आजी तुम्हांला कोण आहे? मूल ना बाळ. शिल्लक ठेवून करायचे तरी काय?'

'मला त्या रानात धर्मशाळा नि विहीर बांधायची आहे. त्या रस्त्याला पाणी नाही. मला कोणी नाही हे खरे; परंतु उद्या हातपाय चालतनासे झाल्यावर, जवळ चार दिडक्या असतील तरच कोणी भाकर देईल.'

'तुम्हांला मी पोशीन.' बळिराम म्हणाला.

'तू एका जागेवर असशील तर! तू सर्वत्र भटकणारा. जाऊ दे त्या गोष्टी. आणा ते सारे पैसे माझ्याजवळ. मी त्याला ते सकाळी देईन.'

'मीच त्याला ते आता नेऊन देतो. तो झोपला असेल. त्याच्या उशीजवळ पुडी करून ठेवतो. वरती त्याचे नाव घालतो.' बळिरामाने सुचविले.

... ग्रंथालय ... योजना

'हेच बरे.'

बळिरामाने कागद घेतला. त्याने नाववार सर्वांची वर्गणी लिहिली. 'तुमच्या प्रवासाला मदत' असे लिहून त्याने ते पैसे त्या पुडीत नीट बांधले. ती पुडी घेऊन तो आत गेला. हळूहळू तो जिना चढू लागला. आनंदराम अर्धवट झोपेत होता. तो जागा झाला. कोण येत आहे? कोणाची पावले? तो घाबरला. पावले जवळ जवळ आली. हे खुनी, दरोडेखोर आहेत की काय? तो भटजी म्हणाला की सारे डाकू आहेत. माझा खून करणार की काय हे? आनंदराम कावराबावरा झाला. त्याला जीवनात राम वाटत नव्हता. ज्या वस्तूच्या शोधार्थ बाहेर पडला होता, ती वस्तू मिळायच्या आधी मरण येऊ नये असे त्याला वाटत होते. तो खोटेखोटे घोरू लागला. आपण शांत निजलो आहोत असे दाखवत होता. ते पहा, हळूच दार उघडण्यात आले. बळिराम आत आला. मारणार की काय सुरा? कापणार का गळा? आनंदरामाची छाती धडधडू पाहात होती. तरी तो शांती ठेवीत होता. बळिराम पुढे आला. आणखी एक पाऊल त्याने टाकले. तो खाली वाकला. आनंदरामाला त्याचा श्वासोच्छ्वास प्रखर भासला. तो डोळे घट्ट मिटून पडला होता. बळिरामाने पटकन उशाखाली पुडी ठेवली. तो हळूच माघारा गेला. पाहुण्यांची झोपमोड तर नाही ना झाली? त्याने पाहिले. तो दारात गेला. हळूच बाहेर पडून त्याने हळूच दार लोटले. हलक्या पावलांनी तो खाली आला.

'ठेवून दिली पुडी.' त्याने सांगितले.

'तो जागा झाला नाही ना?'

'नाही. शांत झोपला आहे. थकलेला आहे.'

'बळिराम, आता तुम्ही सारे येथेच झोपा. रात्र बरीच झाली आहे. ते तरट पसरा नि पडा. तारा, तू जा झोप. माझीही वळकटी घाल जा.'

६ ९७७ ...

तारेने आजीबाईची वळकटी घातली. सारीजण झोपली. बळिराम, श्रीपत वगैरे मांडवात झोपले. आता सारे शांत होते. दूर शेतात कुत्रा भुंकत होता. आणि आनंदराम उठला. त्याने मेणबत्ती लावली. त्याने उशाखाली हात घातला तो तेथे पुडी! त्याने ती सोडून पाहिली. आत दहा रुपये नि यादी. 'तुम्हांला मदत.' असे ते शब्द. त्याच्या डोळ्यांतून अश्रू आले. मी एक अनाथ वाटसरू. माझी या गरीब, खेडवळांना कीव आली. हे सारे श्रमणारे जीव. ना कोणी श्रीमंत, ना लक्षाधीश; परंतु त्यांनी माझ्यासाठी जवळचे पैसे दिले. माझी कोट्यावधी इस्टेट आहे; परंतु हे दहा रुपये तिच्याहून अधिक मोलाचे आहेत. या दहा रुपयांत निरपेक्ष प्रेम आहे; निरपेक्ष सहानुभूती आहे. त्याने ती पुडी घट्ट हृदयाशी धरली. त्याच्या अश्रूंचा तिच्यावर अभिषेक झाला. जणू ते ज्योतिर्लिंग होते! आणि अशा उदार, निर्मळ जीवांना मी मनात डाकू समजलो. आम्हा श्रीमंतांना सर्वत्र चोरांचीच शंका. आम्ही जगाला लुबाडीत असतो. आम्हांला सर्वत्र शत्रूच दिसतात. जगात प्रेम, मैत्री, आपलेपणा, सहानुभूती, निष्कपटीपणा इत्यादी वस्तू आहेत याची आम्हांला आमच्या कृत्रिम शेअरबाजारी जीवनात कल्पनाच नसते या लोकांना तो गोविंदबोवा धर्महीन म्हणाला आणि मीही यांच्याविषयी शंका घेतली.

त्याला स्वतःची लाज वाटली. त्याने मनांत सर्वांची क्षमा मागितली. त्याने प्रभूजवळ क्षमा मागितली. ती पुडी हृदयाशी धरून मेणबत्ती मालवून तो पडून राहिला. बराच वेळ झाला तरी त्याला झोप येईना. शेवटी केव्हा डोळा लागला ते त्याला कळलेही नाही.

३

पहाटेचा कोंबडा कधीच आरवला होता. आकाशात कृत्तिका नक्षत्राचा पुंजका फार सुंदर दिसत होता. रात्रभर पहारे करून कुत्री आता धुळीत पोटात डोकी खुपसून पायांजवळ घेत ऊब घेत झोपली होती. आपापल्या झोपड्यांतून शेतकरी उठत होते. कोणी चिलीम पीत होते. काही कामसू बायका झाडलोट करून पाणी आणायलाही गेल्या. आमची सावित्रीआजीही उठली. तिने ताराला उठविले. अंगणातील सारी मंडळी उठली. आता चांगलेच उजाडले. गाईगुरे रानात जाऊ लागली. झाडांवरची किलबिल करणारी पाखरे इकडे तिकडे हिंडू उडू लागली. कोंबड्या नि त्यांची पिल्ले दाणे शोधायला बाहेर पडली. श्रीपत, हरी, बळिराम, धनू सारे जायला निघाले.

'आजीबाई, जातो. त्या मुशाफराला माझ्या बाटलीची आठवण द्या. रसाची बाटली त्याला दिली आहे. वाटेत थकलास तर म्हणावे घेत जा. त्याला माझा रामराम सांगा. अजून तो उठला नाही; निजू दे.' असे म्हणून धनुवैद्य निघून गेला.

'बळिराम, मी जातो. बायको रागे भरेल. हरी, तू चल माझ्याबरोबर म्हणजे सकाळच्या रामप्रहरी ती शिव्या नाही

मोजायची. आजीबाई, त्या पाहुण्यांना आमचा रामराम सांगा. मी त्या पाहुण्याला माझ्या घरी ठेवले असते. लहानसहान काम मी त्याला दिले असते. खंडाने घेतलेल्या मळ्याला त्याने पाणी लावले असते. परंतु येथे राहायचे त्याच्या मनात नाही. बघा आजी, त्याला सांगून. मी सांजचा पुन्हा येऊन जाईन. बसा बळिरामदादा.'

'श्रीपत, हरी सारे गेले. बळिराम अजून घुटमळत होता. त्याच्या तोंडावर रोजची कांती नव्हती. त्याची झोप का पुरी नव्हती झाली?'

'बळिराम, तुला काही होते का आहे? चेहरा उतरलेला का?'

'मला अस्वस्थ वाटत आहे खरे. मी रात्री सुखी होतो. परंतु आता काय झाले कळत नाही. जिवाला रुखरुख वाटते आहे.'

'कारणाशिवायच?'

'कारण कळत नाही.'

'काही तरीच. तू लपवीत आहेस. सांग.'

'मी माझ्या बाळाला पाहीन तेव्हा मला बरे वाटेल. तेव्हा मन फुलेल, जीव आनंदेल.'

'बळिराम, तू आपल्या मुलाचे फारच कौतुक करतोस. इतके काय मेले वेड त्या पोराचे! अति प्रेम करणे बरे नव्हे. जगात फार आसक्ती नसावी. नाही तर ती वस्तू गेली, ते माणूस गेले, तर मग दुःख संपता संपत नाही.'

'आजीबाई, प्रेम करायला दुसरे आहे तरी कोण? मला जगात कोणी नाही. हा लहान बाळ हाच माझा आधार. हाच तेवढा माझा आनंद. प्रेम करून नये म्हणता? का करू नये? आणि प्रेमठेवा देव का नेईल? माझे प्रेम म्हणजे तो का आसक्ती मानील? देव का सैतान आहे? त्याने आमचे प्रेम ओळखले पाहिजे. या जगात जर आमचा कशावरच जीव नसेल, कोणासाठीही आम्ही रडणार नसू, कोणासाठीही हसणार नसू तर परलोकात तरी काय

आहे? परलोकात का प्रेम नाही? देवाच्या राज्यात का सारे स्थितप्रज्ञ दगड आहेत?'

'देवाच्या राज्यात तुझी पत्नी आहे.'

'पत्नी! ती पत्नीहूनही अधिक होती. भटाभिक्षुकांनी मंत्र म्हणून, टाळी वाजवून गळ्यात बांधलेली, अशी ती नव्हती. ती प्रेममूर्ती होती, ती गेली नि बाळ राहिला.'

'बळिराम, मुलावर प्रेम करू नको असे नाही हो मी सांगत; परंतु त्याची पूजा करीत नको बसू. ते मूल म्हणजेच सर्वस्व, असे म्हणत नको जाऊ. एखादे वेळेस समज ते मूल देवाने नेले तर?'

'आजीबाई, सकाळच्या प्रहरी असे अशुभ नका बोलू, माझा बाळ शतायुषी होवो, उदंड आयुष्याचा होवो.'

'बळिराम, माझ्या बोलण्याचा हेतू तसा नाही रे, मी का दुष्ट आहे? रागावू नकोस. चुकले हो. नको होते असे बोलायला. मनुष्य भरात आला म्हणजे एकदम काही तरी बोलतो, वाईट नको वाटून घेऊ. माझ्या मनात काही नाही. तुझा बाळ सुखी होवो.'

'आजीबाई मला वाईट स्वप्न पडले म्हणून काही तरी संकट येणार असे वाटत आहे आणि माझ्यावर दुसरे कोणते संकट येणार? बाळाची रुखरुख वाटते. त्याला पाहीन तेव्हा माझा जीव खाली पडेल. दुसरे कोणतेही संकट मला रडविणार नाही. शिवणार नाही. बाळाचे बरेवाईट न होवो म्हणजे झाले. येतो मी.'

असे म्हणून बळीराम हातात मोठा सोटा घेऊन निघाला. परंतु चार पावले जाऊन तो पुन्हा माघार आला नि म्हणाला,

'आजीबाई, रागावू नका हं. मी वाईट आहे असे नका समजू. मी कधी रागावतो. तुम्ही फार चांगल्या आहांत. आणि तो माणूस उठला तर त्याला पत्ता सांगा. तो दिसतो नसा नसावा.'

'मलाही असेच वाटले. तो कुणी तरी मोठा माणूस आहे. परंतु दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडला असावा.'

'परंतु तो लोकांना पिळून काढणारा मोठा नसावा. मोठा

मनुष्य म्हटला म्हणजे मला चीड येते. मोठे तेवढे खोटे. लोकांच्या संसाराची राखरांगोळी करून हे मोठे झालेले असतात. ज्यांची भरपूर इस्टेट, ज्यांचे कारखाने, ज्यांचे बंगले, ज्यांच्या मोटारी, त्यांच्याजवळ सारे असते परंतु हृदय नसते, ज्यांच्याजवळ न्याय नसतो, दुसऱ्यांचे अश्रू, दुसऱ्यांची उपासमार, दुसऱ्यांची मरणे ज्यांना दिसत नाही, अशांना हल्लीच्या जगात मोठे म्हणण्यात येते. वर्तमानपत्रांत त्यांचे फोटे देतील, त्यांच्यावर मृत्युलेख लिहीत असतील आणि प्रभू या सर्वांना पै किंमतीचे समजून मेल्यावर नरकात लोटीत असेल. परंतु हा पाहुणा अशा मोठ्यांपैकी दिसत नाही. याचे डोळे निराळे आहेत. कोणी तरी शापभ्रष्ट पुण्यात्मा असावा हा.'

'अनेकांची अशी जीवने असतील. आपणास काय कळे? प्रत्येकाचे आयुष्य म्हणजे रामायण-भारतच आहे; नाही?'

'लाखाचे बोलतात, आजी. मी जातो. बाळाला केव्हा पाहीन असे मला झाले आहे.'

'जा, बाळाला भेट. असाचं मधून मधून येत जा. तू आलास म्हणजे मला बरे वाटते. बळीराम तूसुद्धा वडार नाहीस. तूही कोणी तरी शापभ्रष्ट आहेस. खरे ना? तू सामान्य माणूस नाहीस. दिसतोस तसा तू नाहीस. तुझेही रामायण-भारत काही तरी आहे. जा, मनाला लावून नको घेऊ. मी सहज बोलले हो. अरे, मीच बघ. सारी मला सोडून गेली. मुलीचा एक नातू होता. माझा त्याच्यावर किती जीव! तोही गेला. माझ्या अनुभवामुळे मी तुला तसे म्हटले. ये हो.'

बळीराम गेला. आजीबाई कामाला लागली. आनंदरामाची आता झोप झाली होती. ते उठून खाली आहे.

'आजीबाई, उठायला उशीर झाला.'

'काही हरकत नाही. बरे वाटते ना आता? उशाशी तुम्हाला पुडी सापडली का?'

'हो, तिच्यात पैसे आहेत. माझ्यासाठी जमवलेले.'

'त्या बळीरामाच्या डोक्यात आले की, तुम्हांला काही मदत करावी. बळीराम दिसतो धटिंगण, वाटते कोणाला उद्धट; परंतु तो मनाचा मऊ आहे. हृदयाचा मऊ आहे.'

'तुम्ही सारीजण चांगली आहांत. ही वर्गणी करायचा त्रास तुम्ही कशाला घेतलात.'

'तुम्ही वृद्ध आहांत. दोन-चार दिवस भाड्याची गाडी करून तुम्ही जा. पुढे आणखी कोण भेटतील. तुम्ही या वयात पायी कसे जाणार? ठेवा ते पैसे जवळ. आता तोंड धुवा. मग न्याहारी करा, चहा घ्या. मी जाते तिकडे कामाला. तारा आहे. तिच्याजवळ मागा लागेल ते.'

तो अंगणातील खाटेवर बसला. समोर सर्वत्र सुंदर सूर्यप्रकाश पडला होता. तो शहरातले जीवन आठवू लागला. 'काय ती धावपळ! काय ती ओढाताण! आणि आम्ही पुंजीपती! आम्ही बडे लोक. काय आमचा उपयोग? आम्ही जगात अडचणीच अधिक निर्माण करीत असतो. आमच्यासाठी लढाया, आमच्यामुळे स्पर्धा, साम्राज्ये. हे गरीब लोक किती सुखी! साधे, निष्कपट, प्रेमळ नि मोकळे! यांना स्वतःचेकोडकौतुक करायची, स्वतःची दुःखे, कृत्रिम चिंता उगाळीत बसायची सवय नाही. आम्हांला जे काम स्वतः करता येईल त्यासाठीही आम्ही नोकरचाकर ठेवू. चहाचा कप आम्ही विसळणार नाही. केर कधी काढणार नाही. स्वतःचा कपडा कधी धुणार नाही. टेबल साफ करणार नाही, अंथरूण घालणार नाही; गुंडाळून ठेवणार नाही. आम्हांला वेळ नसतो असे नाही, आम्ही चेकवर नुसत्या सह्या करतो. असाच सारा वेळ आमचा चाललेला असतो. नि अशा विलासात, आळसात लोळत असूनही आम्ही अंतरी रडत असतो. धिक् आमचे जीवन! ते उंच बंगले, त्या मोटारी, त्या फुलबागा, ते रेडिओ, ते जलसे, सारी वरची सोंगे. खाली मनाची रडारड. मी आयुष्यात काय केले? लहानसे घर, छोटे अंगण यांतही जो आनंद

मी मिळवू शकलो असतो, तो त्या प्रचंड बंगल्यांतून मी मिळवू शकलो नाही. माझे बंगले म्हणजे भूतबंगले. जे अती मधूर आहे, परम उदात्त आहे, परम सुंदर आहे, मंगलमय आहे, ते पैशांच्या राशीने कधीही मिळणार नाही.'

तो अशा विचारात होता. तारा त्याच्या विचारशील, चिंतनशील तोंडाकडे पाहात होती.

'तुम्हांला न्याहारी करायची आहे ना? तोंड वगैरे धुतलेत का?'

'मुली, तू एकटी आहेस? तुझे घर कोठे आहे?'

'दोन मैलांवर आहे. मी मधून मधून आईकडे जाते.'

'तुझे वडील काय करतात?'

'माझे बाबा देवाकडे कधीच गेले. माझा धाकटा भाऊ जन्मला त्या वेळेस बाबा गेले. दारू पिऊन मेले. आता आईच सारे बघते.'

'तुझा भाऊ काय करतो? तो आईला मदत करतो का?'

'हो. तो शाळेत जातो. सुट्टीच्या दिवशी रानातून फुले आणून ती विकतो. कधी माळाही तो आणतो. शेण गोळा करतो. आईला महिन्याची दोन-चार रुपयांची मदत करतो. आम्ही सुखी आहोत.'

'तुझे लग्न कधी होणार?'

'आई करील तेव्हा. तुमची न्याहारी आणते हो.'

चपळ तारा पटकन् निघून गेली. आनंदराम मनात म्हणाला, 'हिच्या भावाच्या नावे करू का सारी इस्टेट? परंतु पुढे तो कसा तरी निघेल कोणास माहीत? लहानपणी सारी चांगली असतात. ती गुलाब नव्हती का लहानपणी चांगली? परंतु आता किती निराळी! पैशासाठी माझ्यासारख्या म्हाताऱ्याशी लग्न करायला तयार झाली!' आनंदराम उठला. तो न्याहारी करायला बसला. ही न्याहारी कसली? ते जणू जेवण होते. दोन-तीन भाकरी त्याने खाल्ल्या. तो दूध प्याला.

'झोप लागल्यामुळे तुम्हांला भूक चांगली लागलेली दिसते.' आजीबाई हसून म्हणाली.

'बऱ्याच भाकरी मी मटकावल्या. होय ना?'

'जेवा. पोटभर जेवा. चांगले जेवणारा माणूस भेटला म्हणजे बायकांना आनंद होतो.'

'परंतु खानावळीच्या मालकांना वाटेल का आनंद?'

'मी तशी खानावळवाली नाही आणि तुम्हांला एक विचारू? तुम्ही येथेच राहता का? माझ्याकडे राहा. मीही अशी एकटी. तुम्ही झाडलोट करा, फुलांना पाणी घाला. खरेच राहा येथे. नाही तर त्या श्रीपतीच्या मळ्यात राहा. त्यानेही जाताना सांगून ठेविले आहे. कोठे जाता एकटे वणवण करीत?'

'आजीबाई, मला जाऊ दे. मला यात्रा करायची आहे. हरवलेले मला शोधायचे आहे. तुम्हा सर्वांचे प्रेम मी विसरणार नाही. तुमचे प्रेम मला बळ देईल. ते मला वाटेत तारील.' असे म्हणून तो उठला. त्याने कपडे घातले. खानावळीणबाईंचे पैसे तो देऊ लागला.

'नको पैसे. तुम्ही साधे माणूस नाहीत. पैसे तुमच्याजवळ असू देत. ते वाटेत कामाला येतील. राहत नाहीच म्हणता? जपून जा. थकलेत तर बसा. गाडी करा. पुढे आणखी कोणी भेटेल.'

'येतो, आजीबाई. सर्वांना नमस्कार सांगा. येतो तारा. तू सुध्दा या म्हाताऱ्याला आठ आणे दिलेस. धन्य तुझी! तुझ्या आईला माझे नमस्कार. तुझ्या भावाला आशीर्वाद. सुखी व्हा.'

तो निघाला. हातात ती उंच काठी घेऊन तो निघाला. सावित्रीबाई नि तारा त्याच्याकडे बघत होत्या. त्याने एकदा मागे वळून पाहिले. येतो, बसा, अशा अर्थाची त्याने हाताने खूण केली. आता त्याने मागे वळून पाहिले नाही.

'गेला बिचारा!' असे म्हणून आजीबाई घरात गेली.

'देव त्याला सुखी ठेवो!' असे म्हणून तारा भांडी घासायला गेली.

० ० ०

गावाची सीमा आली. लहानसा नाला ओलांडून आनंदराम पलीकडे गेला. त्याने वळून पाहिले. 'किती सुखी, समाधानी गाव' असे त्याला वाटले. परंतु येथेही भांडणे असतील, कर्जेदलाली असेल; तेथे त्या गोविंदबोवासारखे दंभमूर्ती आहेतच. आणि येथे दारू आहे. गरिबांचे संसार धुळीत मिळवणारी दारू; बायकांना मुलाबाळांना रडविणारी दारू. ताराचा बाप दारूपायी मेला. मुलगा जन्मत आहे नि बाप अती दारू पिऊन मरत आहे! त्या मातेची काय मनःस्थिती असेल?

या गावातही दुःख आहे एकूण? जगात सुख आहे तर कोठे?

जगाच्या बंदिशाळेला
सुखाचा कोठला वारा

जगात सर्वत्र कलह, स्पर्धा, व्यसने, झगडे. या जगात शांती नाही. शांती फक्त स्मशानात. तेथे तरी आहे की नाही प्रभूला ठाऊक! कारण जो मरतो, तो निराळ्या देहात जन्मत असेल आणि कोठे तरी पुन्हा स्पर्धेत, कलहात तो भागीदार होत असेल. शांती शांती म्हणून लोक उगीच ओरडतात आणि ही नदी, हे पर्वत, हे दगड, धोंडे यांना तरी शांती आहे का? तेथेही सारखी चळवळ, वळवळ आहे. तेथे तरी कोठली स्थिरता? दगड झिजून वाळू होत आहे. वाळूची माती होत आहे. मातीचे दगड. पुन्हा डोंगर! जगात स्वरूपे बदलतात. नाश कशाचाच नाही. सारे आहे नि सारे सारखे बदलत आहे. विश्वाचा काय अर्थ? अर्थहीन आहे का हे सारे!' असे विचार करीत तो जात होता. इतक्यात कोणी तरी धावत आले, कोण होते? श्रीपत होता.

'म्हातारबाबा, येथे का नाही तुम्ही राहात राहा, माझे ऐका. मी तुम्हांला रोज बारा आणे मजुरी देईन. स्वतंत्रपणे राहा; तुम्हांला झेपेल ते काम करा.'

'मला कामाचा कंटाळा नाही. परंतु माझे आयुष्य आता थोडे

राहिले आहे नि जे काय करायचे ते मला केलेच पाहिजे आणि म्हणून मला गेलेच पाहिजे.'

'कोठे जाणार?'

'जातो तिकडे चिपळूण-गुहागरकडे?'

'सारखे का तुम्ही भटकणार?'

'मला एका माणसाचा शोध लावायचा आहे. तो सापडेपर्यंत भटकणार.

'तुमचा मित्र आहे वाटते?'

'तो सापडल्यावर मग सुखी व्हाल?'

'हो. मला आणखी काही नको. मग मी सुखाने मरेन.'

'मरायचे सर्वांना आहे. संतंष्ट असा वा असंतुष्ट असा, सुखी असा वा दुःखी असा, तयार असा वा नसा, बोलावणे आले की निघायला हवे. मी या जगात कायमचाही राहायला तयार आहे. छान आहे हे जग. मला कधीही कंटाळा येत नाही. असे जग कोठे मिळणार? या जगात राहून आपण सूर्य, चंद्र, तारे पाहतो. मेघ पाणी देतात. झाडे फुलेफळे देतात. शेतात खपले की भरपूर खायला. जरा पहसे, खोकला झाला की झाडपाला आहेच. मला आनंद वाटतो. गाई, वासरे, पाखरे गंमत. काही लोक या जगाला उगीचच नावे ठेवीत असतात. तुमचा मित्र भेटल्यावर राहा या जगात चार दिवस. कंटाळू नका. जो मित्र तुम्ही शोधीत आहात, त्याला तुम्हांला पाहून होईल का पण आनंद? नाही तर तो कपाळाला आठ्या घालायचा! तुमचे सारे श्रम वाया जायचे.'

'नाही. तसे होणार नाही. मला त्या मित्राला बघायचे आहे, त्याला मदत करायची आहे, त्याच्यावर प्रेम करायचे आहे. मी प्रेम द्यायला चाललो आहे.'

'ही मुशाफिरी पत्करून किती दिवस झाले?'

'नुकताच मी या यात्रेवर निघालो आहे.'

'पूर्वीचे तुमचे जीवन सुखी होते का?'

'काही दिवस मी सुखात दवडिले. परंतु पूर्वी सुख अनुभवलेल्या माणसाला वार्धक्यात सुखहीन जीवन कंठणे कठीण जाते. खरे ना?'

'ठीक. जा. तुमचा निर्धार अभंग दिसतो. जा. मित्र मिळवा नि सुखी व्हा. आणखी पैसे हवेत?'

'नकोत. मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे. कृतज्ञ राहीन. नमस्कार.' आनंदराम चालू लागला. श्रीपतीही गेला. दोघांनी एकदा वळून पाहिले नि पुन्हा ते चालू लागले.

० ० ०

आनंदराम आता एकटाच जात होता. बाजूला रानफुले होती. त्याने काही फुले तोडून घेतली. त्या गांवाच्या पंचक्रोशीची आठवण म्हणून ती त्याने खिशात ठेवली. तो विचारमग्न होता. 'श्रीमंत लोक अनेक संस्थांना देणगी देतात, अनेक भूतदयेच्या संस्था ते चालवितात; परंतु गरीब लोक रोजच्या जीवनात जे प्रेम, जी दया, जी माणुसकी दाखवितात, त्यात किती गोडी! ही गोडी कोठून येते?श्रीमंतांच्या देणग्यांत, त्यांच्या दानात भावना नसते. तेथे उलट आढ्यता असते. परंतु गरिबाच्या देण्यात हृदय असते. ते सजीव सहृदय देणे असते आणि ज्या देण्यात हृदय आहे, त्यात अपार गोडी असणारच. ती पैशांची पुडी त्याने हृदयाशी धरली. त्याला खानावळ, तेथे भेटलेली माणसे, सारे स्वर्गीय वाटू लागले. तेथे निःस्वार्थ दया होती, माणुसकी होती. सहानुभूती होती. एक तरी सुंदर जागा त्याला आढळली. ती जागा जणू त्याला तीर्थाप्रमाणे वाटली. त्याने मागे वळून पुन्हा प्रणाम केला. हे जग केवळ वाईट नाही तर? ते केवळ वाईट असते तर कसे टिकते? प्रेमस्नेहाचे अनंत झरे असे ठायी ठायी असतील; ते जगाला ओलावा देत असतील. तुम्हांला संपत्तीच्या दगडांत गुंतल्यामुळे हे झरे आढळत नाहीत.' अशा विचारात तो जात होता. त्याला मध्येच तो धनुवैद्य आठवला. खिशातून त्याने ती रसाची कुपी

काढली. दोन थेंब त्याने तोंडात ओतले. कोणी तरी मनुष्य त्या गावाकडे जात होता. आनंदराम त्याला म्हणाला,

'तुम्ही त्या गावी जाता ना? धनुवैद्याला माझे नमस्कार सांगा. म्हणावे, तो म्हातारा मुशाफर तुला विसरणार नाही.'

'सांगेन हा. आमच्या धनूला झाडपाल्याची फार माहिती. नाडीचे ज्ञानही त्याला फार चांगले.'

'मी ह्याच रस्त्याने जाऊ का?'

'याच रस्त्याने जा.'

'पुढच्या गावी खानावळी आहेत का? तुमच्या गावची तर चांगली होती.'

'सावित्रीआजींची खानावळ फार चांगली. ती गरिबांची खानावळ आहे. गरिबांची ती हयगय नाही करीत. पुढच्या गांवीही आहेत, परंतु इतक्या चांगल्या नाहीत. गरिबांकडे तेथे नीट लक्ष देत नाहीत.'

'गरिबांकडे आधी लक्ष द्यायला हवे. श्रीमंतांकडे किती लक्ष दिले, तरी त्यांची रडकथा संपत नसते. सारखी त्यांची कुरकुर, कुरबूर चाललेलीच असते.'

'श्रीमंत असणे का चांगले नाही?'

'सारेच मिळाले म्हणजे मग काही नकोसे होते.'

'काही नको असणे का चांगले नाही?'

'नाही, माणसाला काही तरी उणीव असावी. काही तरी अजून मिळायचे आहे असे त्याला वाटत असावे. म्हणजे त्याचे शरीर, मन, बुध्दी ही तरतरीत राहतात. उत्साह म्हणजे जीवन. उत्साहशक्ती म्हणजे जीवनाची नाडी. ज्या जीवनात उल्हास नाही, स्फूर्ती नाही, प्रेरणा नाही ते जीवन म्हणजे चोथा, कोंडा. ते निःसत्व, नीरस जीवन. ते जीवनच नव्हे. ते जिवंतपणीच मरण. मीच पाहा ना! म्हातारा असलो, तरी उत्साहाने चाललो आहे. असो. सांगा हां निरोप धनूला. म्हणावे, पुन्हा भेटू. भेटलो नाही तरी मी आठवीन. पाठ फिरल्याबरोबर विसरणाऱ्यांपैकी मी नाही.'

तो मनुष्य गेला. आनंदराम पुन्हा चालू लागला. त्याला जणू नवजीवन मिळाले होते. शहरातील सुखोपभोगांनी, साऱ्या कृत्रिमतेने त्याला जणू ग्लानी आलेली होती. परंतु ग्लानी दूर झाली. मोकळ्या मैदानातील हवा, खेड्यातील निरागस, निर्मळ जीवनाचा आनंद. यामुळे त्याला नवचैतन्य मिळाले. तो झपझप पावले टाकीत होता. तो गाऊ लागला. शीळ घालू लागला. आठ वर्षांचा तो अल्लड बाळ झाला. इतक्यात त्याला काय दिसले तेथे? एक लहानसे कुत्र्याचे पिल्लू तेथे होते. ते दीनवाणे ओरडत गवतातून पुढे आले. त्या पिल्लाच्या गळ्यात रेशमी पट्टा होता. 'माझे नाव मोत्या. माझी काळजी घ्या.' असे शब्द त्या पट्ट्यावर होते. परंतु त्याची काळजी घ्यायला तेथे कोणी नव्हते. त्या रानात ते एकटे पिल्लू कोठून आले? कोणा श्रीमंताचे ते कुलुंगी कुत्रे असावे. छान होते गुबगुबीत. त्याच्या पायाला लागले होते. कोणा श्रीमंताच्या मोटारीतून का ते पडले होते? मोटार वेगाने गेली असेल, आतल्या मडमिणीचे लक्ष नसेल. कोणा तरी श्रीमंताची ती राणी स्वतः मोटार हाकीत असेल आणि मोत्या पडला असेल. त्याला शोधायला मोटार मागे कशाला फिरेल? दुसरी कुत्री विकत मिळतील. आनंदरामाने ते पिलू उचलले. ते त्याला बिलगले. पुढे एक झरा होता. त्या झऱ्याच्या पाण्यात त्याने त्या कुत्र्याला नीट धुतले. त्याची जखम नीट धुऊन हाताची बाही फाडून त्याने ती बांधली. त्या कुत्र्याने आपल्या ऊबदार जिभेने आनंदरामाचे पाय चाटले. ते आपली कृतज्ञता दाखवित होते. त्याने ते स्वच्छ पिल्लू हृदयाशी धरले. जणू स्वतःचे मूलच. आता तो एकटा नव्हता. त्याला एक सोबती मिळाला. कृतज्ञता दाखविणारा प्रेमळ सोबती. त्या मित्राजवळ त्याला आता बोलावे लागेल, त्याची काळजी घ्यावी लागेल. त्याला आंजारागोंजारावे लागेल. कशासाठी हे जग देवाने निर्माण केले? काय या जगाचा हेतू? आनंदराम जणू आता कवी झाला होता, तत्त्वज्ञानी झाला होता. का हे जग? प्राण्यांच्या

संगणकीकृत

संमतीशिवाय त्यांना जन्माला घालायचे नि शेवटी त्यांना मातीत मिळवायचे. का ही भेसूर लीला? मरणानंतर काही आहे का? ही सृष्टी म्हणजे का निरर्थक खेळ? तसे असेल तर ही सृष्टी चालविणारा महान अपराधी आहे. जीवांना निरर्थक जगवण्यात काय आनंद? दुःख, रोग, वेदना... जीवांनी हे सारे का सोसावे? शेवटी चिमूटभर राखच व्हायची असेल तर का हे सारे दुःख? का या धडपडी, हे कलह, हे मारणे, मरणे? कोणा ईश्वराची ही कठोर विचित्र लीला? काय आहे हे सारे? अशा विचारांत तो जात होता. तो पुढील शब्द त्याच्या कानांवर आले.

'म्हातारेबाबा, टांग्यात बसता का?

त्याने वर पाहिले.

'या, टांग्यात या. फार ऊन आहे. दमला असाल.'

'तुम्ही दयाळू दिसता.'

'अहो, दया कसली? टांग्यात मी एकटा आहे. सामान-सुमानही नाही; या...'

तो टांग्यात बसला. टांगा चालू लागला.

'छान आहे कुत्रा. खरेच सुंदर आहे.'

'त्याचा पाय चाकात सापडला. जखम झाली आहे.'

'या बाजूला चाप फार लावून ठेवतात. ज्यांच्या त्यांच्या खाजगी जमिनी. कोणी ढोर येता कामा नये. पाय सापडतात त्या चापांतून. तुटतात पाय. हे लोक उद्या हवेतसुध्दा जाळी लावतील चाप लावतील आणि हे सारे पुन्हा धर्ममार्तंड असतात, धर्माच्या गप्पा मारणारे असतात. गोपूजक म्हणवतील नि गाय शेतात दिसली तर पाठीत सोटा घालतील. तिचे पाय चापात अडकवून तोडतील. सारा दंभ!'

'समाजात प्रतिष्ठा हवी, लोकांनी चांगले म्हणायला हवे म्हणून यांची धर्माची सोंगे!'

'म्हातारेबाबा, मी कधी देवळात जात नाही. शनिवार,

गुरुवार करीत नाही. माझ्या आत्म्याचे काय होईल याची मला चिंता नाही. कारण शेजाऱ्याजवळ मी चांगला वागतो. मी कधी कोणाला फसविले नाही.'

'या बाजूला श्रीमंत लोक फार आहेत वाटते?'

'तसे फार नाहीत. तिकडे शहरात फार असतात. तुम्ही कोठे चाललात?'

'तिकडे चिपळूण-गुहागरकडे जायचे आहे.'

'अरे बापरे! सारी मजल पायी मारणार?'

'हो.'

'थकून जाल.'

'तुमच्यासारखा कोणी दयाळू धर्मात्मा भेटेल.'

'पुन्हा दयाळू वगैरे म्हटलेत! ही स्तुती बाजूला ठेवा. मी माणसाप्रमाणे वागलो. रिकाम्या टांग्यात तुम्हांला कोणीही घेतले असते. स्तुती करू नका. या टापूत मी तिखट जिभेचा म्हणून प्रसिध्द आहे. मला सोंगढोंग बिलकूल खपत नाही. मी आहे स्पष्टवक्ता. मी कोणाचा मिंधा नसल्यामुळे मला कोणाचे भय नाही. तो पहा गांव आलाच. मला येथे थोडे काम आहे. अर्ध्या तासाने परत येथे या. मी आणखी थोडे अंतर तुम्हांला टांग्यातून नेईन. तुम्ही येथे थांबणार की लगेच निघणार?'

'एखाद्या दुकानात या कुत्र्याच्या पायाला लावायला औषध मिळते का बघतो. एखाद्या हॉटेलात थोडे दूध, पाव मिळाला तर बघतो.'

'तुम्हांला जेवण नाही करायचे?'

'नाही, दूध नि पाव पुरे. मोत्यालाही होईल.'

'बरे, मी जातो. वेळेवर आलात तर मी पुढेही थोडे नेईन तुम्हांला.'

तो टांगेवाला गेला. आनंदराम एका औषधविक्याच्या दुकानात गेला. दुकानाच्या मालकाला ते कुत्रे फार आवडले.

'फार चांगला आहे कुत्रा. मला देता का? या प्राण्याला भावना असतात. कुत्रा म्हणजे विश्वास.'

'तो आता माझ्याजवळ राहील. पाय बरा होईल ना?'

'हो. हे औषध लावा. या श्रीमंत बाया खूप पैसे देऊन कुत्री विकत घेतात नि निष्काळजीपणामुळे गमवतात.'

'मी काळजी घेईन.'

औषध घेऊन आनंदराम गेला. तो एक हॉटेलात शिरला. त्याने बिस्किटे घेतली. मोत्याला भूक लागली होती. त्याने त्याला बिस्किटे देऊन दूधही पाजले. स्वतःही बिस्किटे खाऊन वर दूध घेतले. थोडी बिस्किटे पुडी करून त्याने खिशात ठेवली. इतक्यात तो टांगेवाला आला.'

'वा! तुम्ही आलेतच.'

'बसा टांग्यात. झाले ना सारे?'

'भाडे किती देऊ?'

'मी भाडे कधी घेत नाही. तुमच्याजवळ किती आहेत पैसे?'

'आहेत थोडेसे.'

'ते तुमच्याजवळ असू देत. प्रवासाला लागतील. बसा लवकर. घोडा फार थांबत नाही.'

तो टांगा निघाला. थोड्या वेळाने टांगा वळवायची जागा आली.

'म्हातारेबाबा, उतरा आता. मला आता इकडे जायचे.'

'मी आभारी आहे.' आनंदराम उतरून म्हणाले.

'असे म्हणू नका. मघा सांगितले ना? म्हाताऱ्यांवर मी प्रेम करतो. म्हातारे मला आवडतात, पुढे गाव लागेल, खानावळ भेटेल. जवळच वडारांचा तेथे तळ दिसेल. तो बळिराम असेल तेथे.'

'बळिराम? तो माझा मित्र आहे!'

'तुमचा मित्र? मला आधी कळते तर तुम्हांला टांग्यात घेतले नसते.'

'बळिराम का वाईट आहे?'

'बळिराम चांगला आहे. मी थट्टा केली. बडे लोक, दांभिक लोक त्याला नांवे ठेवतात. बळिराम सर्वांची जिरवतो. त्याला अन्याय सहन होत नाही. कोणा गरिबावर अन्याय झाला तर तो बळिरामकडेच येतो; की बळिराम निघालाच सोटा घेऊन. सावकार त्याला भितात. बळिराम मला आवडतो. त्याच्या मुलाला मी दूध दिले आहे.'

'कसा दिसतो हो त्याला मुलगा?'

'तुम्ही त्याचे मित्र ना? तुम्हांला माहीत नाही? त्याचा मुलगा नक्षत्रासारखा आहे. खरेच सुंदर आहे. मी लग्न केले तर असा मुलगा मला देवाने मला द्यावा म्हणून मी म्हटले असते, परंतु या मुलाची आई नाही. काय करायचे?'

'मूल जन्मताच आई मेली की काय?'

'मुलगा दीड वर्षांचा झाला तेव्हा ती गेली. ती फारच सुंदर होती. जणू अप्संरा. त्या दोघांच्या लग्नाला भटजीबिटजी कोणी नाही. त्यांचे खरे लग्न होते; शाब्दिक नव्हते. तिचे बळिरामवर, या मुलावर फार प्रेम आणि ती मेली. बळिराम वेडा झाला. हातात बाळ घेऊन तिला हाका मारीत तो सर्वत्र हिंडे, फिरे. कोणी जवळ आला तर खून करीन म्हणे. पुढे या मुलाचा त्याला अपार ळळा लागला. आता तो शांत झाला आहे. बरे, जातो मी. उशीर झाला आहे.'

तो टांगा गेला. आनंदराम पाहात होता. श्रीमंत व गरीब यांच्या वागणुकीची तो मनांत तुलना करू लागला. श्रीमंत मनुष्य आपल्या रिकाम्या गाडीत कोणाला घेईल का? त्याची ऐट, प्रतिष्ठा कमी होईल. मीच एकदा माझ्या गाडीत नोकराला घेणार होतो. परंतु मुनीम म्हणाला, 'त्याला घेऊ नका. उद्या ते हक्काने गाडी मागू लागतील. बसू लागतील. मालक आम्हांला बसवतो. तुम्हीही बसवा म्हणून भांडतील. हे लोक कृतघ्न असतात.' असे ते म्हणणे

मी ऐकले आणि नोकराला त्या वेळेस गाडीत घेतले नाही. वास्तविक त्याच्या घरावरून मी जाणार होतो. त्याला घरी लवकर जायची आवश्यकता होती. परंतु मी त्याला न घेता गेलो आणि हा खेड्यातील शेतकरी! मुनीम म्हणाला, हे कृतघ्न असतात. कृतघ्न मी का हे? आणि झाला असता कृतघ्न, तरी माझे कर्तव्य नको होते का करायला? या माणसाने मला का घेतले गाडीत? त्याला वृध्दाविषयी साहजिक दया वाटली. त्याने मला निरपेक्ष दया शिकवली. तुम्ही आपले कर्तव्य करा. जग फसवो, काही करो. परिणाम पुढे काहीही होवो. तुम्ही माणसुकीला सोडून वागू नका. दुसरा माणुसकी दाखवतो की नाही याची तुम्हांला नको फिकीर; तू माणुसकी असणारा मनुष्य हो. तू पशू होऊ नको. दुष्ट होऊ नको. त्या गाडीवानाच्या ठिकाणी ही सुंदर माणुसकी मला दिसली. विलासात बरबरटलेल्या श्रीमंत डुकरांमध्ये अशी सुंदर माणुसकी मला कधीही दिसली नाही.

अशा विचारांत तो जात होता. तो एकदम एक मोटार अत्यंत वेगाने पाठीमागून आली नि गेली. दचकून तो बाजूला झाला. ते कुत्रे चिरडलेच जायचे; परंतु नशीब म्हणून वाचले. हळूहळू तो आता चालत होता. शेवटी सायंकाळी एका गावात आला. खानावळीचा पत्ता काढीत तो आला. ही खानावळही एका बाईचीच होती. तीही विधवा होती. तिला दोन मुली होत्या. त्या आईला मदत करीत. त्यांची अद्याप लग्ने झालेली नव्हती. तो तेथे ओसरीवर बाजूला बसला. आपल्याला कोणी ओळखू नये असे त्याला वाटत होते. कारण कोणी तरी बडे पाहुणे त्या खानावळीत उतरले होते. बाहेरच्या बाजूला एक मोटार मोडून पडलेली होती. तेथे मांडवात शेतकरी जमले होते. गप्पागोष्टी चालल्या होत्या.

'बरे झाले; मोटार बिघडली, मोडली. फार वेगाने जायला हवे बेट्यांना.'

'हे श्रीमंत लोक म्हणजे खुनी असतात. समोर कधी पाहणार नाहीत. भरधाव तश्शी गाडी नेतील. माणूस, शेळी, बकरी, कुत्रा, कोंबडी मरो वा जगो, त्यांना काय पर्वा? या आमच्या रस्त्याने आणतात कशाला आपल्या मोटारी? आमचे रस्तेही हे लोक खराब करतात. धूळ उडवतात.'

'परवा नाही का; एक बाई नि तिचे मूल, दोघेही मेली. त्या मोटारवाल्या नबाबांना त्याचे काही वाटले नाही. जणू चिंध्यांचे गाठोडे चिरडले गेले.'

'आणि चौकशीत काय ठरले, आहे माहीत? भीतीने धक्का बसून मृत्यू!'

'त्याने पैसे चारले. सुटला. गरीब तुरुंगात जातात. श्रीमंत नेहमी सुटतात. न्याय जगात उरलाच नाही.'

'अरे, न्याय आहे! ती मोटार बिघडली बघा ना आणि ती न बिघडती तर मला असे श्रीमंत गिऱ्हाईक आज मिळाले असते का? अरे, एकाचे नाव कुबेर आणि दुसऱ्याचे लक्ष्मीकांत!' खानावळीणबाई म्हणाली.

'काय नावे?' आनंदरामांनी विचारले.

'म्हातारबाबा, तुमच्या ओळखीचे आहेत काय ते? तुम्ही बसा ते कुत्रे घेऊन जवळ. तुम्ही आहात अवधूत निरंजन. ते आहेत कोट्याधीश. त्यांच्या मुंबईला गिरण्या आहेत.'

'मोटार हाकायला कोणी नाही वाटते?'

'अहो, तो तरुण आहे ना, तो स्वतःच हाकतो. त्याची ऐटच फार. देवाची कृपा म्हणून ते वाचले. दोघे मरायचे होते आज. गेली असती खाली खड्ड्यात मोटार. थोडक्यात निभावले!'

'बैल लावून मोटार येथे आणावी लागली...'

'शेवटी बैल खरे; यंत्र फुकट. वळले तर सूत, नाही तर भूत!'

'खरे म्हणजे यांच्या मोटारी आमच्या रस्त्याने जाता कामा नये. गाईगुरे जात असतात. मालाने भरलेल्या भरतीच्या आमच्या

गाड्या जात असतात आणि या मोटारी भरधाव येतात. बैल बुजतात, काय आमची त्रेधा उडते! आणि यांचे पों पों चाललेले. जरा बाजू चुकली तर खाली उतरून शिव्या देऊ लागतात. यांच्या मोटारीसाठी निराळे रस्ते करा म्हणावे. आमच्या रस्त्यांवर यांची वर्दळ नको.'

'मी दिवाण झालो तर करीन कायदा!'

'तू कधी होणार दिवाण?'

'आता शेतकरी-कामकरी लोकांचे राज्य करायचे ना?

'अरे हसू नको. मी दिवाण होणे अशक्य नाही.'

'पुरे करा रे गडबड. ते पाहुणे आले. ते रागावतील तुमची बोलणी ऐकून. गप्प बसा!' खानावळीणबाई म्हणाली, ते राजबिंडे पुरुष आले. तोंडात सिगारेट होती. तेथे ते खुर्चीत येऊन बसले. आनंदरामाने त्यांना ओळखले. परंतु त्यांची आपणास ओळखू नये म्हणून अंधाराकडे तोंड करून बसला. आता रात्र झाली होती.

इतक्यात बळिराम तेथे आला. त्याच्या हातात काही तरी गुंडाळलेले होते. ते त्याने बाजूला ठेवले. तो तेथे उभा राहिला.

'बळिराम, बाहेर का उभा? रोजच्याप्रमाणे आत ये. पाणी पी. भूक का लागली आहे?' खानावळीणबाईने विचारले.

'मला आज काही नको.'

'तुला बरे नाही वाटत?'

'हो.'

'थोडे पाणी तरी पी. गंगू, बळिरामाला पाणी दे ग आणून.'

गंगूने त्याला पाणी आणून दिले. पाणी पिऊन तो तेथेच उभा होता.

'हा प्रदेश बाकी फार छान आहे!' कुबेर म्हणाला.

'परंतु मोटार बिघडली.' लक्ष्मीकान्त म्हणाला.

'तुम्ही इकडे का गंमतीने फिरायला आला होता?' बळिरामाने त्यांना विचारले.

'आम्हांला मोटारीच्या वेगाचा उच्चांक काढायचा होता.' तरुण कुबेर म्हणाला.

'वेगाने मोटार हाकताना कधी अपघात नाही होत?'

'मला तर कधी झाला नाही.'

'मलाही.'

'तुम्ही दोघे जिवंत आहात यावरून तुम्हांला कधी झाला नाही हे दिसतेच आहे, परंतु वाटेत मोटारखाली कधी कोणी सापडले नाही? कोणी मेले नाही?' बळिरामाने विचारले.

'एकदा एक कोंबडी मेल्याचे आठवते. पिल्लांना घेऊन जात होती.'

'पिले मेली का?'

'कधी मूल वगैरे नाही का मोटारखाली सापडले?'

'मूल? पूर्वी कधी नाही. परंतु आज मात्र एक पोरटे सापडले. फुले नाचवीत होते. त्याला गाडीचा धक्का लागला. ते दूर फेकले गेले.'

'तुम्ही मोटार थांबवून खाली उतरून पाहिलेत का?'

'खाली उतरून काय पाहायचे? अशी पदोपदी मोटार थांबवायची? आधीच रस्ता चुकल्यामुळे उशीर झाला होता आणि ते मूल आडवे आले नाचत नाचत. ते फेकले गेले. बाजूला गवतावर पडले. त्या मुलालाही गंमत वाटली असेल.'

'परंतु उतरून ते मूल जिवंत आहे का मेले, हे तुम्ही पाहिलेत नाही ना?'

'जिवंत असेल असे वाटते; आणि नसले जिवंत म्हणून काय बिघडले? जगाचा त्रास कमी झाला. हे भिकारी लोक पोरे खंडीभर पैदा करीत असतात. त्यांना नसतो उद्योग. मेले एखादे पोर म्हणून काय झाले? अरे, असा पुढे काय येतोस? कोण तू? असे काय करतोस? अरे, दूर राहा. अरे ए, हात लावू नकोस मला. अरे.'

परंतु बळिरामाने रानातल्या वाघाप्रमाणे त्या कुबेराला

पकडले. त्याला खाली पाडून तो त्याच्या छातीवर बसला.

'अरे धावा, याला सोडवा. पकडा या खुनीला, डाकूला.' लक्ष्मीकान्त ओरडत पळत सुटला.

परंतु बळिराम पेटलेल्या डोळ्यांनी कुबेराकडे बघत होता. त्याने आपल्या कमरेचा लखलखीत पाजळलेला सुरा काढला. त्याने श्रीमंत तरुणाची मान चरचर कापून फेकून दिली! ते मुंडके तेथे पडले. तेथे रक्ताचे थारोळे साचले. कढत श्रीमंत रक्त!

लक्ष्मीकान्त बाहेर ओरडत जात होता. 'धावा! खून! पोलिसांनो, धावा! खून! खून!' असे ओरडत होता. खानावळीणबाईच्या मुलींनी डोळे मिटून किंकाळ्या फोडल्या. खानावळीणबाई मटकन् तेथे घेरी आल्याप्रमाणे बसली. इतरांनी बळिरामाला बाजूला गेले. इतक्यात शेजारीपाजारी तेथे आले आणि पोलिसही आले. बळिरामचे हात रक्ताने भरले होते. तो सुरा तेथे होता.

'मला पकडा. मी तयार आहे.' तो पोलिसांना म्हणाला. पोलिसांनी त्या मुडद्यावर आच्छादन घातले. हे सारे कसे घडले म्हणून ते विचारू लागले. पंचनामा होऊ लागला. खानावळीणबाई म्हणाली, हे दोघे श्रीमंत मित्र या खानावळीत उतरले. त्यांची मोटार बिघडली. येथे मोटारीविषयी संवाद चालले होते आणि इतक्यात हा बळिराम आला, तो रोजच्याप्रमाणे दिसत नव्हता. जरा प्रक्षुब्ध दिसत होता. तो थोडे पाणी प्याला. अती दुःखी दिसला. त्याने त्यांना वाटेत मोटारीचे अपघात वगैरे होतात का म्हणून विचारले. ते दोघे अनुभव सांगत होते. एकदा एक कोंबडे मेले आणि आज एका मुलाला धक्का लागला, असे हे म्हणाले. बळिरामाने मूल जिवंत आहे का, पाहिलेत का उतरून, म्हणून विचारले. हा

पडलेला मनुष्य म्हणाला, त्यात काय बघायचे? मेले असले म्हणून काय बिघडले? जगाचा त्रास कमी झाला. असे तो बोलत आहे तो बळिरामाने त्याला खाली ओढले आणि हा सारा प्रकार झाला.'

पोलिसांनी लक्ष्मीकान्ताचे, आणखी काही जणांचे म्हणणे टिपून घेतले. अधिकारी बळिरामाला म्हणाला, 'शांतपणाने आमच्या बरोबर येता की आम्हांला त्रास द्यायची तुमची इच्छा आहे?'

'मला कोणासही त्रास द्यायची इच्छा नाही. तुम्ही न्याल तिकडे मी शांतपणे येईन. परंतु मला काही सांगायचे आहे–'

'ते न्यायाधीशांसमोर सांग. तुझी चौकशी होईल तेव्हा ते सांग.'

'मला ते इथेच सांगितले पाहिजे. मी कोणी भ्रमिष्ट, वेडा आहे, असे तुम्हां सर्वांना वाटत असेल. या माणसाचा गळा कापायला मला काहीच कारण नव्हते, अशी तुमची समजूत असेल. परंतु कारण होते. अती दुःखाची ती गोष्ट आहे. मी उगाच नाही संतापाने वेडा झालो. मला न्याय हवा होता, मी खुनी असेन. परंतु हाही खुनी होता...'

असे म्हणून बळिराम थांबला. त्याच्या हातात हातकड्या होत्या. त्याने ते हात वर करून म्हटले, 'ते पलिकडे तेथे गुंडाळून ठेवलेले काय आहे बघा जा, बघा कोणी- -'

अंमलदाराने जाऊन काय गुंडाळलेले आहे म्हणून पाहिले. त्या चादरीत काय होते? ते मूल होते. बळिरामाचा तो आवडता मुलगा! अजून त्याच्या तोंडावर हास्य होते. हातात फुले होती. तो बाळ जणू झोपला होता. तो मुलगा पाहताच गंगूने व तिच्या बहिणीने 'आईग! बाळ का मेला...'- म्हणून एकदम हंबरडा फोडला. सर्व मंडळी स्तब्ध होती. खानावळीणबाईंच्या डोळ्यांतून पाणी आले.

'बाबुल्या, बळिरामाचा बाबुल्या. असे कसे झाले?' ती रडत म्हणाली.

त्या मृत बाळाकडे कोणालाही बघवेना. तो बाबुल्या सर्वांच्या परिचयाचा होता. नेहमी बळिरामाच्या कडेवर, खाद्यांवर तो असायचा. बळिराम त्याला कधी विसंबत नसे. गंगू नि तिची बहीण बाबुल्यावर किती प्रेम करीत. बळिराम त्याला घेऊन आला म्हणजे त्या त्याला जवळ घेत, त्याचे केस विंचरीत. भांग पाडीत. बळीराम म्हणायचा, 'भांग नको. असे मोकळेच केस चांगले दिसतात.' बाबुल्या सर्वांना आवडे. तो होताच सुंदर. फुलासारखे, चंद्रासारखा, ताऱ्यासारखा, हसरा, खेळकर, गोड; जणू देवाचे छोटे रूप.

बळीराम करुण गंभीर वाणीने म्हणाला, 'कळले सर्वांना कारण? नाही ना मी वेडा? त्यांच्या मोटारने माझा बाळ मारला. रस्त्यावर बाळ खेळत होता. प्रचंड वेगाने यांची मोटार येत होती. मी बाळाला उचलायला धावून आलो. परंतु क्षणाचा उशीर झाला. आणि सारे संपले! त्याने एक किंकाळी मारली... आणि तो गेला. मला सोडून गेला. एका क्षणात सारा खेळ खलास. मोटारीच्या पाठोपाठ बाळाला गुंडाळून घेऊन मी आलो. ती मोडलेली मोटार मी पाहिली. खुनी सापडले म्हणून मी देवाचे आभार मानले आणि हे कृत्य मी केले. मला खुशाल घेऊन जा. परंतु माझे शेवटचे मागणे आहे. त्या बाळाला पुन्हा एकदा हातात मला घेऊ दे. पुन्हा त्याला एकदा हृदयाशी धरू दे. त्याचा मुका घेऊ दे. देता का बाळ या हातात? जरा काढता का या हातकड्या! मी पळून जाणार नाही. आता कशासाठी जगायचे आहे मला? जगण्यासारखे काही उरले नाही. द्या. देता का माझे बाळ माझ्याजवळ?

अधिकाऱ्याने होकारार्थी मान हलविली. तेथे कोणासही आता बोलवत नव्हते. बळिरामाच्या बेड्या काढण्यात आल्या.

सारी मंडळी उभी राहिली. बळिरामाने तो बाळ हातात घेतला. त्याने त्यांच्याकडे पाहिले. तो म्हणाला, 'तुम्हा सर्वांना

हृदय आहे. तुम्ही प्रेम जाणता, तुम्हांला भावना असतील. मुलावर प्रेम करणे म्हणजे काय, ते तुम्ही जाणता. कसा होता माझा बाळ! ...सुदृढ, धट्टाकट्टा, नेहमी निरोगी, आनंदी आणि किती सुंदर! आणि त्याचे प्राण गेले. थंडगार आहे त्याचे अंग. सकाळी तो माझ्या हातात खेळत होता. सूर्यप्रकाशात मी त्याला नाचविले आणि तो खेळत होता. आम्ही गरीब माणसे, आम्ही वडार. आम्ही रस्ते दुरुस्त करीत असतो. खडी फोडून ढीग करतो. आम्ही भटकी माणसे. आम्ही कोठे जावे कोर्टात न्याय मिळवायला? आणि गरिबाला का कधी न्याय मिळतो? श्रीमंत गुन्हेगार शेवटी निरपराधी म्हणून सुटायचेच. यांनी खून पाडावे, परंतु आम्हांलाही खून पाडता येतो. अशा खुनी माणसांचा तरी पाडता येतो. मला फासावर लटकावे लागले तरी हरकत नाही. मी न्याय मिळवला.'

कोणी बोलत नव्हते. बाया हुंदके देत होत्या. त्याच्या हातात तो मृत बाळ होता. त्याने आपले हात पुढे केले नि तो म्हणाला, 'बघा, बघा माझा बाळ. कसा शांत दिसतो, नाही? थंडगार पडला, माझा कोवळा प्रेमळ, अल्लड बाळ! हसरा, नाचरा बाबुल्या! माझा आवडता, सर्वांचा आवडता. माझ्या बाळाला फुले नि पाखरे फार आवडायची. चिमण्या येऊन त्याच्या खांद्यावर बसत, कुहू करून तो कोकिळेला साद घालायचा. हातात भाकर घेऊन कावळ्याच्या पाठीमागून काव काव करीत तो पळायचा. फुलपाखरांच्या पाठीमागे तो धावायचा. गवतावर तो पडून राहायचा नि आकाशातील चंडोलाकडे बघायचा नि गायचा. आणि साळुंकी तर त्याला फार आवडायची. साऱ्या गोष्टीत त्याला आनंद वाटे. तो आनंदमूर्ती होता. रंगीत खडे जमवून तो खेळे. फुले घेऊन तो नाचे. पानांचे पल्लव त्याला फार आवडत. रात्री झाडाखाली लहानशा पलंगडीवर तो झोपायचा. तो ताऱ्यांकडे बघत

... वाचनालय, सातारा
... योजना

राहायचा आणि विचारायचा, 'तेथे माझी आई आहे. होय ना? नमस्कार, माझ्या आईला नमस्कार.' मला म्हणायचा, 'निजा, माझ्याजवळ निजा.' त्या तेथल्या झाडांना आज सुने सुने वाटेल. कोण निजेल आज त्यांच्याखाली? आणि झाडाला दोर बांधून मी त्याचा पाळणा टांगला होता. त्या पाळण्यात तो बसायचा, गाणी म्हणायचा. परंतु सारे संपले. त्या दुष्टाने मारले माझे बाळ.'

बळीराम थांबला. त्याने डोळे मिटले. पुन्हा उघडून त्याने बाळाकडे पाहिले. त्याने बाळाचा मुका घेतला नि तो पुन्हा बोलू लागला, 'काल रात्री मला स्वप्न पडले. सकाळी उठल्यावर मला रुखरुख लागली होती आणि सावित्री आजी म्हणाली, 'फार प्रेम नको करू, एखादे वेळेस बाळ जायचा.' मागून म्हणाली, 'माझ्या मनात नाही हो वाईट.' परंतु माझ्याही मनाला असे काही तरी होणार असे वाटत होते. मी बाळाला अधिकच जपले पाहिजे होते. त्याला क्षणभरही डोळयांआड मी करायला नको होते आणि जपत होतोही. परंतु मनात येई, देव तारी त्याला कोण मारी? परंतु गेला बाळ. याची मोटार बाळाच्या मृत्यूला घेऊन आली. फुले हातात घेऊन खेळणाऱ्या बाळाला तिने कुस्करले. बाळ, जागा हो रे. किती निजलास तू? हस, खेळ, बोल. का रे आज असा तू मुका? उघड डोळे. याचे डोळे की नाही, हूबेहूब त्याच्या आईच्या डोळयांसारखे. तसाच तोंडावळा. बाबुल्या, ऊठ राजा. झोपू नको. ऊठ, माझा पापा घे. एकदा तरी बोल...'

तो रडू लागला.

'बळिराम, नको रडू.' खानावळीणबाई म्हणाली.

'गरीब बिचारा बळिराम!' एक पोलिस म्हणाला.

'मी गरीब? हो गरीब. परंतु मी कोण ते तुम्हांला माहीत नाही. मी स्वेच्छेने वडार झालो. मी घर सोडले, जमीनजुमला,

६७५५
७४४८२
साधो-५८७५
कि ७/००

सारे सोडले. ती नि मी जगाचे यात्रेकरू झालो. आमचे एकमेकांवर फार प्रेम. मोकळ्या, जगात झाडाखाली, आकाशाखाली, नदीतीरी आम्ही हिंडत असू. प्रेम लुटीत असू. मी मुरली वाजवी आणि गाणे गाई, नाचे. स्वर्गीय प्रेमाची गाणी. ती सुंदर होती, प्रेममूर्ती होती. तिला प्रेम हवे असे. बाकी तिला काही नको असे. तिचे ते डोळे! माझा आत्मा त्यात बुडे.अनंत प्रेमाचे ते मधुर दिवस! आणि हा बाळ जन्माला आला. आमच्या प्रेमात वाढला. परंतु ती देवाघरी गेली. ते दिवस गेले. प्रकाशाचे, प्रेमाचे, आनंदाचे दिवस, परंतु माझ्या बाळात तीच होती. त्याच्या डोळ्यांत ती होती. बाळाकडे पाहून मी जगलो नि मला जगायला हवेही होते. कारण, नाही तर बाळाला कोण? निजला आहे... नाही? बाबुल्या, ऊठ राजा. किती झोपायचे तरी. चल आपण जाऊ. तिकडे तळावर सारी वाट पहात असतील. तुला घ्यायला सर्वांचे हात अधीर झाले असतील. कोकरे घरी आली असतील. झाप्यात जाऊन झोपली असतील. चल, आपण जाऊ. तुझी पलंगडी वाट पाहात असेल, बसा मंडळी. राम राम. नमस्कार.' असे म्हणून त्याने तो बाळ घट्ट हृदयाशी धरला. तो त्याला अधिकाधिक हृदयाशी धरू लागला. तो बसला, पडला; छातीशी, हृदयाशी तो बाळ होता.

'बळिराम, ऊठ मी घेतो तो बाळ. धीर सोडू नको.'

'कोणी नका घेऊ माझा बाळ. देव त्याची माझी ताटातूट करणार नाही. मी त्याला घट्ट धरून ठेवीन.'

असे म्हणून तो पडला. तो आता बोलेनासा झाला. एक धीट शेतकरी पुढे आला. तो खाली वाकून म्हणाला, 'बळिराम, तू आम्हांला सोडून जाऊ नकोस. आम्ही तुला खुनी म्हणणार नाही. आम्ही तुला नावे ठेवणार नाही. तुला कदाचित जन्मठेप होईल. परंतु आम्ही तुला आमचा कैवारीच समजू. श्रीमंत लोक उपकार

विसरतात, गरीब नाही विसरत. ऊठ, आम्हांला मदत करीत जा; आम्हांला न्याय मिळवून देत जा. तू आमचा आनंद. तू गंमत करायचास, सर्वांना हसवायचास. तू आमचे जीवन, आमचे अमृत, ऊठ. डोळे उघड.'

आणि बळिरामाने डोळे उघडले. 'काय म्हणतोस, गोविंदा? ऊठू? नाही. आता उठवत नाही. बाळ थंडगार आहे. मीही थंड होत चाललो. बाळाला ऊब तर मला ऊब. आता तुम्हांला कोण मदत करील? आज धुके पडेल, कडाक्याची थंडी पडेल. कोकरांची काळजी कोण घेईल? मी आता नाही मदत करायचा. तुम्हांला आनंद हवा. होय ना? गंमत हवी, करमणूक हवी. सर्वांनाच आनंद हवा असतो. परंतु आता मी नाही तो द्यायला. मी चाललो. माझे बाळ! मीच जणू त्याला मारले. का त्याला घेऊन बसलो नाही? सकाळपासून जर मला अशुभ वाटत होते तर मी त्याला का खाली ठेवले? प्रभूची इच्छा. आता मलाही हे प्राण नकोत. जिकडे माझे बाळ तिकडे मी. कशाला जगू? जगलो तर मरेतो तुरुंगात ठेवतील. स्वातंत्र्याच्या वाऱ्याचा मी मित्र. चार भिंतींमधले जीवन नको म्हणून तर मी घरदार, मोठा वाडा, सारे सोडले. सृष्टीच्या जवळ मी राहिलो. आता मरणाने शेवटचे अनंत स्वातंत्र्य मला मिळवू दे.'

तो थांबला. सर्वांनी हात जोडले.

'माझा बाळ! त्याची झोपायची वेळ झाली. जो जो, बाबुल्या, जो जो.'

'बळिराम तुझ्या हातातच तो झोपलेला आहे.'

'होय का? थकला, भागला नि निजला. त्याचे अंग अगदी गार आहे आज!'

'होय.'

'बाळाला ऊब हवी. ते तिकडे तळावर वाट पाहात असतील.

इतका वेळ बाहेर राहायचा नाही... तो अजून लहान आहे. केवळ चार वर्षांचा. तो नेहमी लवकर झोपतो. तो झोपला म्हणजे मग माझी रात्र सुरू होते. आता तो झोपला आहे. त्याने माझ्या तोंडाशी अगदी तोंड ठेवले आहे. मीही झोपतो. शेवटी आनंद आहे. बाळ नि मी झोपतो उठवू नका हां कोणी-'

आणि त्याने डोळे मिटले. कायमचे डोळे मिटले.

'प्रभो, त्याला जवळ घे. त्याची चूक झाली असली तर त्याला क्षमा कर. तुझ्या राज्यात त्याला त्याची पत्नी, लहान बाळ दोघे भेटोत. त्यांच्या आत्म्याला शांती दे!' असे ती खानावळीणबाई म्हणाली. गंगू नि तिची बहीण दोघी रडत होत्या. पोलिस पाहातच राहिले. शेतकरी, शेजारीपाजारी स्तब्ध होते. तीन जीव तेथे मरून पडले होते. करुण कठोर दृश्य!

४

आता आनंदरामाला तेथे क्षणभरही थांबवेना. तो हळूच आपले कुत्रे घेऊन, काठी घेऊन, तेथून उठून गेला. तो एकटा रात्रीचा निघाला. त्याचे मन अस्वस्थ झाले होते. पायाला ठेचा लागत होत्या. त्याचे लक्ष नव्हते आणि शेजारचा गाव आला. गावाला उडत बातमी आलीच होती. गस्तवाला गस्त घालीत होता. त्याने आनंदरामाला हटकले.

'कोण आहेस तू? कोठून आलास? त्या पलीकडच्या गावी काय झाले माहीत आहे तुला?'

आनंदरामाने थोडक्यात सारे सांगितले.

'बळिराम एकूण मेला!'

'होय.'

'आणि तू एकटा गुपचूप कोठे जात आहेस?'

'मी जगाचा यात्रेकरू आहे. खानावळीत मला बसवेना. मी निघालो. कशाला म्हाताऱ्याला अडवता, त्रास देता? मी निरुपद्रवी, निरपराधी, निराधार माणूस आहे.'

गस्तवाल्याने त्याला जाऊ दिले. आनंदराम चालला पुढे. गाव संपला. आता रान लागले. दवबिंदू टपटप पडत होते. वरती नक्षत्र

सुंदर दिसत होते. आनंदराम विचारतंद्रीत होता. काय आहे हे जग? त्याला कवीचे चरण आठवले...

'कुत्री उंदीर मांजरे
यांनी जगावे का बरे?
आणि तू असोनी सुन्दर?
झाला तुझा श्वास स्थिर!'

कुत्र्यामांजरांनी जगावे आणि ते लहान बाळ? किती सुन्दर! ते का मरावे? हा मोत्या. हा वाचला आणि तो बळिरामाचा मुलगा? तो चुरडला जावा? या सृष्टीचा हेतू काय? कशासाठी हे जीवन? मी माझ्या आयुष्यात तरी काय मिळवले? मोठ्या आशेने मी जीवनाला आरंभ केला. परंतु आज माझ्याजवळ मोलाचे असे काय आहे? आम्ही स्वतःला स्वतंत्र समजतो. पैसेवाला तो सुखी, तो स्वतंत्र असे मानतात. परंतु या सोनेरी स्वातंत्र्यासाठी आम्ही किती पापे करतो, किती गुन्हे करतो?

आमचे बंगल्यातील स्वातंत्र्य राहावे म्हणून लाखोंना आम्ही राबवीत असतो. त्यांचा आनंद, त्यांचा विकास. यांची आम्हांला कल्पनाही नसते. परंतु हे गरीब लोकच अधिक स्वतंत्र नि स्वाभिमानी आहेत. मी यांना पैसे देऊ लागलो तर ते घेणार नाहीत. हे अर्जविनंत्या करीत नाहीत. हा बळिराम. याने स्वतःच न्याय मिळवला. वृत्तीने, विचाराने, हे स्वतंत्र आहेत लोक. परंतु उच्चतर जीवन म्हणून काही आहे. माणसे त्याच्याकडे जात आहेत. हे सारे विश्व, हे सारे वस्तुजात, उच्चतर स्थितीकडे जात आहे. सृष्टी निरुपयोगी अशी भावना आपणांस कशाला होईल? ज्या अर्थी उदात्त जीवनाची आपणास कल्पना येते, त्या अर्थी ते आहे. सारे काही

आपल्या भवितव्याच्या विकासासाठी आहे. आपणांस काही माणसे अशी दिसतात की, जी केवळ देहपूजा असतात. ज्यांच्याजवळ सुन्दरता, उदारता, उदात्तता नसते. घुबडांना सूर्यप्रकाश आवडत नाही. त्याप्रमाणे काही माणसांना थोर जीवन, उदात्त, नैतिक जीवन नको असते. 'सुखं च मे शयनं च मे' याच्या पलीकडे त्यांची दृष्टी नसते. अशी माणसे म्हणजे केवळ मृतपिंड होत. या जगात मडक्यांची मातीच पुष्कळ आहे. ज्या मातीत सोने आहे अशी माती फार थोडी. पुष्कळसे जीव केवळ मातीत जाणारे. त्यांनी मूल्यवान काहीच मिळवलेले नसते. मी तरी काय मिळवले? मोलाचे काही तरी मिळवायला आज म्हातारपणी मी बाहेर पडलो. माझे सारे जीवन, माझी आई. तिची देवावर किती श्रध्दा! ती दुःखी होती. परंतु देवावर तिचा भरवसा. सकाळ-संध्याकाळ ती पूजा करी. देवांना निरांजन ओवाळी आणि माझी बहीण? ईश्वराच्या चांगुलपणाविषयी तिला कधीही शंका आली नाही. मरताना मला म्हणाली, 'रडू नको, आनंदराम. प्रभू कारुण्यसिंधू आहे, ते दुसरे जग या जगाहून सुंदर असेल. रडायचे कशाला?' ते सुंदर जग खरोखर आहे, की ते केवळ तिच्या कल्पनेतच होते? आजचे विज्ञानवेत्ते तरी म्हणतील, दुसरे जग नाही. या जगात एकच जादू आहे. प्रेम! बळिराम मेला परंतु त्याला प्रेम मिळाले होते.'

ते कुत्रे त्याच्या पायांना चाटू बघत होते. 'मी तुमच्यावर प्रेम करतो.' असे जणू ते सांगत होते, कृतीने दाखवीत होते. त्याने त्या कुत्र्याला उचलून घेतले. ते गारठले होते. त्याला त्याने ऊब दिली. तो मनांत म्हणाला, 'प्रेमाचा शोध लागेपर्यंत ही पृथ्वी माझ्या पायांखालून न जावो. निरपेक्ष प्रेमाची चव मला मिळू दे.

ते अमृत पिऊन मग मला या जगाचा निरोप घेऊ दे. निरपेक्ष प्रेम! जीवनाला अर्थ देणारे, सुंदरता देणारे प्रेम! कोणी तरी माझ्यावर थोर प्रेम करीत आहे, असा अनुभव घेतल्यावर हे डोळे मिटोत. माझे आजपर्यंतचे जीवन मातीमोल ठरले, परंतु शेवट तरी गोड होवो –'

तो थकला. बाहेर थंडीही फार होती. शेतात त्याला एक गवताची गंज दिसली. तो तेथे गेला. दंवाने ओल्या झालेल्या वरच्या पेंढ्या दूर करून आतील ऊबदार गवतावर तो पडला. ते कुत्रेही तेथे पाय पोटात घेऊन झोपले.

० ० ०

त्याला जाग आली. तेव्हा चांगलेच उजाडले होते. मोत्याही जांभया देत उठला. तो जोर काढू लागला नि मग नाचू लागला. त्याला भूक लागली होती? आदल्या रात्री त्या दोघांनी खाल्ले नव्हते. त्याने मोत्याला थोपटून म्हटले,

'मोत्या, चल बेटा. गाव आला म्हणजे दूध घेऊ, बिस्किटे घेऊ चल–'

मोत्या चालू लागला. म्हाताराही निघाला. वाटेत एका निर्मळ ओढ्यावर त्यांनी विसावा घेतला. पुन्हा ते पुढे निघाले आणि एक गाव आला. त्याने दूध घेतले, बिस्किटे घेतली. कुत्र्याचे जेवण झाले. आनंदरामानेही बिस्किटे, दूध यांचा आहार घेतला. थोडा वेळ तो एका झाडाखाली झोपला.

'म्हातारबाबा, तुम्ही थकला आहात, खाटेवर पडा. आमचा गांव गरीब आहे. येथे बंगले नाहीत. परंतु या गरिबांच्या झोपड्या तुम्हांला नाही म्हणणार नाहीत. आत येऊन झोपा, वाटले तर येथे राहा. सकाळी उठून जा – –'

'नाही, मला राहता येणार नाही. एकेक क्षण मोलाचा आहे. मरायच्या आधी माझी वस्तू मला मिळाली पाहिजे. तुम्ही गरीब आहांत; परंतु तुमची मने मोठी आहेत. तुम्ही दोन आण्यांना किती

दूध दिलेत, बिस्किटे किती दिलीत! तुम्ही सारे चांगले आहांत. प्रभू तुम्हांस सुखी ठेवो!'

आनंदराम उठला. मोत्याही तयार झाला. इतक्यात गावची म्हातारी मंडळी म्हणाली, 'तुम्ही जाऊ नका. आज वादळाची चिन्हे आहेत. ते बघा. ढग जमा होत आहेत. या दिवसांत इकडे कधी कधी वादळे होतात. तुम्ही वादळात सापडाल. पुढचा गाव जरा दूर आहे. वाटेत जंगल आहे. चढण आहे. दरी आहे. समुद्राची गर्जना ऐकू येईल. घों घों तुफानी वारे येतील. तुम्ही आधीच गळून गेला आहात. नका जाऊ.'

'माझे सारे जीवन वादळीच आहे. वादळे मला आवडतात. मी निसर्गाचे लेकरू आहे. शांतीच मला भिववते. वादळ मला हसविते. घों घों करणारे वारे जणू गुदगुदल्या करीत आहेत असे मला वाटते. मुसळधार पाऊस म्हणजे प्रभुकृपेची अपरंपार वृष्टी असे मला वाटते. मेघ गडगडतात. वीज लख्ख करते. जणू नाचते. मेघांचा मृदंग वाजतो. वारे साथ करतात, विद्युल्लता नाचते. सृष्टीसुंदरीच्या मंदिरातील तांडव-नृत्य! मला जाऊ दे. तुम्ही या म्हाताऱ्याची चिंता नका करू. आणि जीवन म्हणजे बुडबुडा. बळिरामाची कथा आली ना कानावर? कोठे आहे तो कोट्याधीश कुबेर? कोठे आहे बळिराम? कोठे आहे त्याला लडिवाल बाळ? आपण फार फिकीर करू नये. जीवन, मरण म्हणजे लाटांचा नाच. बसा. रामराम मंडळी...'

आणि तो निघाला. वादळ येणार असे खरेच वाटू लागले. वारे जोराने वाहू लागले, आकाश काळवंडू लागले. आनंदराम दमला होता. परंतु तो झपाझप जात होता. त्याच्या मनात विचारांचा वेग होता. त्यामुळे त्याच्या पायांनाही गती मिळाली होती. बळिरामाचे मरण, त्या कुबेराची तुटलेली मान, ते बाळ... ती तीन मरणे राहून राहून त्याच्या डोळ्यांसमोर येत होती. 'वर्तमानपत्रांतून त्या कुबेरावर अग्रलेख येतील. त्याचे फोटो

येतील, शोकसभा भरतील, 'अघोर कृत्य', 'राक्षसी खून' अशा शब्दांत बळिरामाच्या कृत्याचे वर्णन केले जाईल. शेकडो सभा दुखवटयाचे ठराव करतील. त्या कुबेराच्या घरी सांत्वनपर तारांचे ढीग येऊन पडतील. आणि बळिराम? त्याच्याविषयी, त्याच्या मुलाविषयी या वर्तमानपत्रांतून काही येणार नाही. परंतु त्या लक्षाधीश तरुणाहून बळिरामाची योग्यता शतपटीने अधिक आहे. हा सारा टापू त्याच्यासाठी, त्याच्या मुलासाठी हळहळेल. त्याच्यासाठी घरोघर प्रामाणिक अश्रू ढाळले जातील. कुबेरशेठांविषयी एक दिवस दुःखप्रदर्शक सभा होतील. वर्तमानपत्रांत लेख येतील. परंतु सारे दांभिक नि खोटे. दुसऱ्या दिवशी सारे विसरून जातील. परंतु या पंचक्रोशीतील जनतेचे बळिरामाविषयीचे दुःख सदैव ताजे राहील. त्याची येता जाता त्यांना आठवण येईल. त्याच्यावर खेड्यातील शाहीर पोवाडे लिहितील. खळ्यांतून, मळ्यांतून त्याच्या गोष्टी सांगितल्या जातील. शहरी, नागर जीवन, वर्तमानपत्री जीवन, सभा-परिषदा, शेअरबाजार यांतील जीवन- ते सारे कृत्रिम, नको ते मला. मला खरे जीवन अनुभवू दे. खरे प्रेम मला मिळवू दे. प्रेम! कोठे मिळेल ते? निरपेक्ष प्रेमाने भरलेले एक अंतःकरण मला हवे आहे. ही का मोठी इच्छा आहे? प्रभो...

एक हृदय मज देई
केवळ एक हृदय मज देई
निरपेक्ष असे जेथे प्रेम
स्वर्थादींचा जेथे होम
हृदय असे मज देई ॥केवळ॥

देवा, 'मागणे लई नाही. लई नाही; एक हृदय दे पाही.' मला निःस्वार्थ प्रेम हवे आहे. प्रेमाचे अनेक प्रकार असतात. ते सतरा प्रकार आता मला नकोत. वैषयिक प्रेम हे फार खालच्या दर्जाचे,

... वाचनालय ...
संग्रह ...

ते निकृष्ट प्रकारचे प्रेम. ते आता मला नको. प्रभो, मला उच्चतर, उच्चतम असे प्रेमप्रकार दाखव. चाखव. प्रभो, हे देणे दे नि मग माझे प्राण ने.'

अशा विचारांत तो चालला होता आणि दिवस मावळला. अंधार पडू लागला. मेघांचा अंधार नि सायंकाळचा, रात्रीचा अंधार. पाऊसही टपटप येऊ लागला. केवढाला एकेक थेंब! वारे सुटले. पाऊस जोराने आला. विजांचा चमचमाट, कडकडाट होऊ लागला. त्याने मोत्याला उचलून घेतले. तो थकला. आता येईल गांव, आता येईल एखादे घर. एखादी ऊबदार प्रेमळ झोपडी, अशा आशेने तो थकलेली पावले कष्टाने टाकीत जात होता. परंतु त्याच्या डोळ्यांसमोर अंधेरी येऊ लागली. अगदी गळून गेल्याप्रमाणे त्याला वाटले. तिकडे समुद्र घों घों करीत होता. त्याच्या पर्वताप्रमाणे लाटा खडकांवर रागारागाने आपटत होत्या. सृष्टीचे विराट भीषण जीवन! हे खरे जीवन. आपण क्षणभंगुर बुडबुडे. मी का बरे त्या गावीच थांबलो नाही? का बरे जीव धोक्यात घातला? परंतु जवळच गाव असेल. प्रेमळ घर. त्याने पुन्हा हिमतीने पावले टाकली, आणि पुढे का दरी होती? खळगा होता. त्याच्या हृदयात एकाएकी कळ आली. छे:! पुढे पाऊल टाकणे अशक्य होते. तो तेथे दगडावर बसला. त्याने कुत्रे खाली सोडले. वरती ढग गडगडत होते. विजा कडाडत होत्या. समुद्र घों घों करीत होता. वारे सों सों करीत होते. पाऊस ओतत होता आणि आनंदराम त्या शिला खडकावर बसला होता. त्याने डोळे मिटले. पुन्हा का कळ आली? घेरी का आली? त्याची जीवनयात्रा का संपणार? तो पहा, पडला. आनंदराम खाली पडला! खाली किती खोल खळगा आहे, प्रभूला माहीत!

० ० ०

'डोळे उघडा. आली का शुध्द?' कोणी तरी प्रेमळपणाने विचारले . आनंदरामाने डोळे उघडले. पुन्हा त्याने मिटून घेतले. आता सृष्टी शांत होती. पाऊस थांबला होता. सारे खळमळ धुऊन गेले होते. वारे शांत होते. आकाश निरभ्र होते. निर्मळ ताऱ्यांचा मंद प्रकाश पडला होता. आनंदरामाचे डोके एका मुलीच्या मांडीवर होते. जवळ कंदील होता. मोत्या दीनवाणी मुद्रा करून आपल्या प्राणदात्याकडे बघत होता. तिकडे समुद्र आपले विश्वगीत गांत होता.

'उठवते का तुम्हांला? बरे वाटते का? आली का जाग? डोळे उघडून पहा बरे. हा कुत्रा तुमची वाट पाहत आहे.'

'कोठे आहे मोत्या?'

'हा बघा. त्याने तुमचे प्राण वाचविले. पाऊस थांबला होता. मी झोपडीच्या बाहेर आले तो कुत्र्याचे केविलवाणे ओरडणे कानावर आले. कोणी तरी संकटात आहे असे वाटले. मी दिवा घेऊन त्या ओरडण्याच्या अनुरोधाने आले, तो कुत्रे दिसले. ते पुढे झाले. त्याने मला येथे आणले. तुम्ही वरून खाली पडलात. या वेलीवर पडलात. मी तुमचे डोके मांडीवर घेऊन बसले. या कुत्र्याने तुम्हांला वाचविले.'

'मी मेलो तर आता तुम्ही आहात त्याची काळजी घ्यायला.'

'परंतु तुम्ही मरणार नाही. मरण्यासाठी का वाचलात? तुम्ही बरे व्हाल. फार लागले नाही ना? उठवते का? माझा हात धरून चला. रस्ता अरुंद आहे. माझे घर जवळच आहे. गाव जरा लांब आहे; माझ्या बाबांनी इकडे एकान्तात हे घर बांधले. आजूबाजूला सुंदर सृष्टी आहे आणि त्या पलीकडच्या दरडीवरून समुद्र फार सुंदर दिसतो. सायंकाळची शोभा काही और असते. उठा. तुम्ही बरे झालेत म्हणजे समुद्रशोभा पाहायला येऊ.

तो उठून बसला. तो भिजला होता. परंतु डोळ्यांतून पाणी येऊन तो आणखी भिजत होता.

'तुम्हांला माझा त्रास. मी एक म्हातारा आहे. माझा कोणाला उपयोग नाही. कशाला मला नेता? तुम्हांला ओझे मात्र.'

'असे म्हणू नका. मला आई नाही हो. माझे बाबा नाहीत. ते मला सोडून देवाघरी गेले. मी त्या घरात एकटी असते. जणू देवाने तुमची सोबत पाठविली. पित्याची उणीव तुम्ही भरून काढा. मला मुलगी माना, उठा. येथे फार वेळ बसून उपयोग नाही. तुम्ही भिजला आहात. बाधेल. चला घरी. गरम कपडे देते. माझ्या बाबांचे कपडे स्वच्छ धुऊन घडी करून बांधून ठेवलेले आहेत. तुम्हांला ते बेताचे होतील. चला, कढत कढत दूध देते, लापशी देते.चला.'

'खरेच का मी येऊ? तू मला वडिलांप्रमाणे मानणार? मी अनाथ आहे.'

'मला तुम्ही सनाथ करा. चला. खरे म्हणून काय विचारता? संकटात पडलेल्यांची कोणी थट्टा का करील? ही वेळ थट्टामस्करी करण्याची, फसवण्याची आहे?'

तो उठला. तिने त्याच्या हातात त्याची काठी दिली. एका हातात कंदील घेऊन एका हाताने तिने त्याला धरले. मोत्या आनंदला. तो शेपटीचे फलकारे देत निघाला.

'रस्ता अरुंद आहे. हळूच चला हं -'

'तुम्ही माझा हात सोडा. कंदील दाखवा.'

'मला मुलगी समजा. तू म्हणूनच हाक मारा. चला जपून. मोत्या, हो पुढे.'

जणू ती मोत्याच्या ओळखीची होती. मोत्या निघाला पुढे आणि ते लहानसे सुंदर घर आले. अंगण होते समोर. घराभोवती बाग होती. दारातच गुलाब फुलले होते.

'सुंदर गुलाब. एवढा पाऊस पडला तरी पाकळ्या झडल्या नाहीत.' तो म्हणाला.

'माझ्या बाबांच्या हातचे हे गुलाब, त्यांच्या हातात अमृत होते,

सौंदर्य होते, कला होती. तुम्हांला देऊ का एक फूल तोडून? हे घ्या.'

त्याने ते फूल घेतले, हुंगून हृदयाशी धरले. सारी घरात आली.

'बसा जरा खुर्चीत. मी गरम कपडें आणते हं.' ती आत गेली. तिने वडिलांचे कपडे आणले. एक स्वच्छ धोतर, एक स्वच्छ सदरा. गरम बंडी, डोक्याला बांधायला गरम रुमाल. 'मी चूल पेटविते. तुम्ही हे कपडे घाला हं!' असे म्हणून ती गेली. त्याने वरचा कोट काढला. जाकीट काढले. कमरेचा तो कातड्याचा कसा सोडला. त्यात त्याच्या नोटा होत्या. जाकीटाच्या खिशात दहा रुपयांची ती अमोल पुडी होती. इतर किरकोळ वरखर्चाचे पैसे होते. त्याने ते सारे सामान एकत्र बांधले. त्याने कोरडे कपडे परिधान केले. तो बाहेर आला.

'वा! कपडे तुम्हांला छानच झाले! आणि ही खुर्ची कशी आता भरलेली दिसते. इतके दिवस ती रिकामी होती. मला पदोपदी बाबांची आठवण करून देई ती. आता तुम्ही तिच्यात बसाल!'

'माझे हे सामान कपाटात ठेवा. हे ओले कपडे बाहेर ठेवतो.'

'तुमच्या हातांनीच या फडताळात सारे ठेवा. कुलूप लावा. हे कुलूप लावून किल्ली उशाशी ठेवा. आता गरम दूध घ्या. मग लापशी आणते. मोत्याला दूध-भाकरी देते. तुम्ही भात खाल? का भाकरी करू? भाकरी चालते का?'

'आज रात्री काही नको. मला झोप येत आहे. थोडे दूध नि लापशी पुरे.'

तिने त्याला दूध दिले. लापशी दिली. तेथे खाटेवर त्याच्यासाठी गादी घालण्यात आली. उशीला स्वच्छ अभ्रा होता. त्याच्यावर सुंदर वेलबुट्टी होती. पांघरायला गरम घोंगडी होती. आतून शाल होती.

'पडा या अंथरुणावर. मी जरा पाय चेपते. अंग दुखत

असेल, नाही? मोत्याला मी माडीवर नेते. तो वर झोपेल. तो लगेच माझ्या ओळखीचा झाला.

'मी नाही का झालो?'

'हो, तुम्हीही झालात. शांत झोपा. काही लागले तर मला हाक मारा. माझे नाव काय, सांगा बघू?'

'शांता, होय ना?'

'कोणी सांगितले?'

'त्या अभ्र्याखाली आहे. त्या वेलीखाली सुंदर नाव. शांता, तू दमलीस. तू काही खा नि नीज. मी आता पडतो. तुझे उपकार हो, शांते!'

'उपकार? उपकार म्हणू नका. मला तुमच्याविषयी काय वाटते, कसे सांगू? तुम्ही माझे आहात, वडिलांसारखे. उपकार वगैरे मनांत आणून नका. मला त्रास नाही, बोजा नाही, मला आनंद आहे. तो आनंद शब्दातीत आहे. खरेच.'

❖

६

आनंदराम शांतपणे झोपला. मोत्या माडीवर झोपला. त्याच्या अंगावर पांघरूण होते. शांता रात्री कितीदा तरी खाली येऊन पाहून जाई. परंतु म्हातारा शांतपणे निजला होता.

ती सकाळी लवकर उठली. तिने अंगण झाडले. फुलांचा एक सुंदर गुच्छ करून तिने तेथे फुलदाणीत ठेवून दिला. चूल पेटवून तिने पाणी ठेवून दिले. ती त्याच्या खाटेजवळ उभी होती. त्याने शांतपणे डोळे उघडले.

'झाली का झोप?'

'हो. आता उठून पुढच्या प्रवासाला जाऊ दे -

'कोठला प्रवास?'

'मी यात्रेकरू आहे.'

'यात्रेचे हे शेवटचे स्थळ करा. मी आता तुम्हांला जाऊ देणार नाही. जाण्यासाठी का आलात? अशक्य. हे घर तुमचे समजा.'

'तू एकटी. माझा कशाला तुझ्यावर बोजा? आणि माझी तुला काय माहिती आहे? मी खुनी असेन, लुटारू असेन, डाकू असेन. कशाला मला आश्रय देतेस?

'तुम्ही कोणीही असा. मी विश्वास ठेवून चालते. जे कर्तव्य दिसते ते!'

'तुला काय दिसले?'

'दिसले की, एक वृध्द मनुष्य– माझ्या बाबांपेक्षाही वृध्द असा मनुष्य– असा निराधार पडला आहे. तो आजारी आहे. अशक्त आहे. त्याला विश्रांतीची जरूरी आहे. मी ती विश्रांती त्याला देईन; आणि त्यानेही मी सांगेन ते ऐकले पाहिजे.'

'एका परक्या पांथस्थासाठी तू हे सारे करणार?'

'हो. आता बोलू नका. तुम्हांला थकवा येईल.'

'मी तुझे उपकार परत कसे फेडू? मी काय देणार.'

'मला काही नको. तुम्ही येथे राहा, म्हणजे सारे मिळाले. माझ्या वडिलांची आठवण तुम्ही मला होऊ देणार नाही. त्यांची जागा भरून काढा.'

सारे वातावरण प्रसन्न होते. पाखरे खिडकीत येऊन बसत नि या पाहुण्याकडे बघत. पाहुणा आरामखुर्चीत होता. परंतु दुपारून त्याला ताप आला. शांतेने गांवातून एका वैद्याला बोलावले. त्याने पाहिले. आनंदरामाजवळ त्याने गप्पा मारल्या.

'मी औषध फार देत नसतो. तुम्ही आनंदी राहा; हसा. खेळा. हसणे हेच औषध. शांतेबरोबर खेळ खेळा; मोत्याबरोबर चेंडू खेळा. औषधे कशाला? तुमची मूळची प्रकृती निकोप आहे. तुम्ही चिंता सोडून द्या. ही पहा फुले. काल केवढे वादळ! तरी हसत होती. वादळात नाचत होती, तोंड देत होती. पडून राहा. तुम्हांला विश्रांती हवी आहे.'

काही गोळ्या देऊन वैद्य गेला. आनंदरामाचे असे दिवस जात होते. परंतु लवकरच ताप थांबला. तो आनंदी दिसू लागला. तो हिंडे, फिरे. गावातील कोणी येत, त्यांच्याजवळ तो बोले. चर्चा करी, एके दिवशी गांवातील दोन प्रतिष्ठित माणसे आली होती. त्या खुनाविषयी बोलणे निघाले:

'राक्षसी खून! त्याने गळा कापला.'

'त्याला सातदा फाशी द्यायला हवे होते. परंतु तोही मरून पडला.' आनंदराम बोलत नव्हता.

'तुम्ही म्हणे तो खून पाहिलांत! तो बळिराम राक्षसासारखा दिसे का हो!'

'तुम्ही कशाला चर्चा करता? बळिराम एक हिरा होता. त्याने खून केला. त्याच्या मुलाला त्या नबाबांनी मोटारीखाली मारले आणि म्हणाले," मेले गरिबाचे पोर म्हणून का दुनिया ओस पडली आहे?" बळिराम का हे सहन करील? त्याचा लाडका एकुलता मुलगा. कोर्टात जाता तरी त्याला न्याय मिळता ना! त्याने स्वतः न्याय मिळवून घेतला. तो सर्वांच्या उपयोगी पडे. तो मूळचा श्रीमंत होता. त्याने प्रेमासाठी फकिरी पत्करली. चार भिंतींच्या खोलीत त्याचा आत्मा गुदमरे. तो सृष्टीचा बालक होता. त्याचा मुलगा नक्षत्रासारखा होता. त्या बळिरामाला नावे नका ठेवू. माझ्यादेखत तरी नको.'

'परंतु ईश्वर काय म्हणेल? हे अधार्मिक कृत्य नव्हे का?'

'तुम्ही धर्माच्या गप्पा नका मारू! तुम्ही किती जणांच्या उपयोगी पडता? जगाला न्याय मिळवा, जगात समता यावी म्हणून तुम्ही झगडता का? धर्म म्हणजे का टिळेमाळा? दंभ! धर्म म्हणजे सत्यासाठी, न्यायासाठी लढणे. त्या लक्षाधीशाची तुम्हांला किंमत वाटते. परंतु बळिरामाच्या नखाची सर त्याला नव्हती. बळिरामाजवळ ओबडधोबड का होईना, परंतु उदात्तता होती आणि त्या कोट्याधीश डुकराजवळ, त्या किड्याजवळ काय होते?'

'तो कोट्याधीश डुक्कर?'

'तो किडा?'

'डुक्कर आणि किडा यांनाही किंमत आहे. डुकरे घाण दूर करतात. किड्यांचेही कार्य असेच. परंतु या श्रीमंत किड्यांना खंडीभर कपडे, नटणे, सिगारेटी, मोटारी, नाच-तमाशे, खाणे-

पिणे यापेक्षा काही आहे का जीवन? परंतु तुम्ही या किड्यांसाठी शोकसभा कराल, वर्तमानपत्रांतून अग्रलेख लिहाल. सारा चावटपणा, फालतू पसारा. आता नवीन मूल्ये शिका.'

ते दोघे प्रतिष्ठित गृहस्थ गार होऊन निघून गेले. आनंद-रामाच्या अशा या विचारसरणीमुळे गांवातील बहुजन-समाजाला तो प्रिय झाला. तो सायंकाळी समुद्रावर जाई. तेथे मुलेबाळे असत. तो त्यांच्याबरोबर किल्ले बांधी. त्यांच्याबरोबर लाटांत जाई. त्यांना जवळ घेऊन गोष्टी सांगे. मुलांचा तो आवडता झाला. ती त्याला 'आजोबा' म्हणत.

० ० ०

परंतु एके दिवशी पुन्हा त्याच्या मनांत निघून जायचा विचार आला. तो उदासीन, खिन्न दिसू लागला.

'तुम्ही असे का? का दुःखी?' शांतेने विचारले.

'मला जाऊ दे. तू एकटी काम करतेस. मला मिंधेपणा वाटतो. तू ते बारीक भरतकाम करतेस. तुझे डोळे दुखत असतील.'

'परंतु मजुरी भरपूर मिळते. मोठमोठे संस्थानिकही जुन्या शालजोड्यांचे काठ पुन्हा नीट भरायला माझ्याकडे पाठवतात. मी छान करते हे काम. आपल्याला कमी नाही पडणार. बाबांच्या खूप ओळखी होत्या. ते नामांकित चित्रकार होते. परंतु ते वारले. माझ्याजवळ फक्त ही कला आहे. आईने मला ही दिली. तुम्ही जातो जातो का म्हणता? एका मातृपितृविहीन मुलीच्या जीवनात तुम्ही आनंद ओतता, हे का काम नाही? काम म्हणजे का कुदळफावडे घेऊन खणलेच पाहिजे? आपला उपयोग होत असला म्हणजे झाले. ते फूल तेथे झाडावर आहे. त्याचा काय उपयोग? परंतु त्याचे अस्तित्वच आसपासच्या वातावरणाला प्रसन्न ठेवते. तुम्ही जाऊ नका.'

'मला काही काम दे. काही तरी मला करू दे.'

'तुम्ही बांबूच्या टोपल्या, परड्या कराल? मी बुरुडाला बोलावते, तुम्हांला शिकवील तो.'

'वा! छान! रोज टोपल्या विणल्या तरी चार आणे मिळतील. किती मिळवीन हा प्रश्न नाही. शांते, मनाचे समाधान हो!'

'मी तुमच्या समाधानाच्या आड नाही.'

आणि दुसऱ्याच्या दिवशी बुरूड बांबू घेऊन आला. त्याने बांबूच्या पट्ट्या काढून दिल्या. कसे विणायचे ते त्याने शिकवले. दोन-तीन दिवस तो आला. पुढे आनंदराम तयार झाले. ते रोज सकाळी उठत. बागेला थोडे पाणी घालीत. चहा, दूध घेऊन मग अंगणात टोपल्या करीत बसत. कधी परडी विणीत, कधी सूप; कधी भाजीचे टोपले, कधी मुलीच्या खेळातील कुरकुली, बुरकुली; लहान सुपल्या, लहान दुरड्या, ते नाना प्रकार करीत. त्यांना त्यात आनंद वाटे. एखादी परडी छान झाली तर लहान मुलाप्रमाणे ते नाचू लागत नि शांतेला नेऊन दाखवीत.

'शांते, खरे सांग कशी आहे?'

'इश्श! ही का चांगली आहे?'

'मग ही का वाईट आहे? चुलीत घालू?'

'नको. मी थट्टा केली. थट्टाही आजोबा. तुम्हांला कळत नाही.'

'आणि मीही थट्टा केली. मी का खरेच ती चुलीत घालणार होतो? मी ही परडी शशीला देणार आहे.'

'कोण शशी?'

'ती लहान मुलगी, समुद्रावर येते ती. तिच्याबरोबर शिंपल्या, कवड्या, गाथिल्या गोळा करतो. ती एकदम येते नि माझे डोळे झाकते. तिला देईन ही परडी.'

'परडी छान आहे. तिला आवडेल.'

असे दिवस जात होते. आनंदरामला कृतार्थता वाटत होती. कधी मिळाले नव्हते असे सुख तो अनुभवीत होता.

० ० ०

एके दिवशी सायंकाळी तो समुद्रकिनाऱ्यावर बसला होता. मुलेमुली खेळून घरी गेली. आनंदरामच्या शेजारीच एक नवयुवक बसला होता. तो कोठून आला होता? तो त्या गावचा नव्हता. आता किनाऱ्यावर कोणी नव्हते. सायंकाळ कधीच होऊन गेली होती.

'तुम्ही कुठले? येथे नवीनच आलेले दिसता.'

'हो. दोन दिवस येऊन झाले.'

'या दूरच्या खेड्यात का आलात?'

'मनाला शांती मिळावी म्हणून. मी एक कांदबरी लिहीत आहे. येथे शांतपणे लिहायला सापडेल.'

'कांदबरी लिहायला अनुभव मिळवलात का?'

'भरपूर अनुभव.'

'वय तर तुमचे पंचविशी तिशीचे दिसते.'

'कधी कधी एका दिवसातल्या अनुभवाने मनुष्य वृध्द होतो. केवळ वर्षे म्हणजे अनुभव नाही. मी या गेल्या चार-पाच वर्षांत किती तरी अनुभव घेतले. तेवढ्यातच जगाला विटलो.'

'का बरे?'

'माझे जीवन म्हणजे एक कांदबरी आहे.'

'सांगा. मला ती ऐकू दे.'

'मी कॉलेजात शिकत होतो. माझ्या वर्गातील एका मुलीवर माझे प्रेम होते. तीही माझ्यावर प्रेम करी. मला तिचे शब्द खरे वाटत. परंतु तिने मला फसविले.'

'तिने का दुसऱ्या तरुणाबरोबर लग्न लाविले?'

'ती एका वृध्दाला माळ घालायला तयार झाली! कोणी एक लक्षाधीश की कोट्याधीश तिला स्वतःची जणू मुलगी मानी. तोच तिला शिकायला मदत करी. तो तिच्या आईबापांस मदत देई. परंतु कोट्याधीशाची सारी इस्टेट आपणांस कशी मिळेल याचा ती विचार करू लागली. तिच्या आईबापांनी तिला एक युक्ती सुचविली. तिचा वाढदिवस होता. त्या दिवशी म्हणतात ती त्या कोट्याधीशाला म्हणाली

की, 'मी तुमच्याशी लग्न लावू इच्छिते.' आणि तो तिला मुलीप्रमाणे मानी! तिला असे म्हणायला धीर तरी कसा झाला? मी ऐकून चकितच झालो, अशा मुलीवर प्रेम केले म्हणून मला स्वतःचा राग आला.'

'पुढे काय झाले? त्या म्हाताऱ्याने संमती दिली का?'

'संमती कशी देईल?म्हाताऱ्याने तिचे तोंड पाहायचे नाही असे ठरविले. त्या कोट्याधीशानेही पुढे आत्महत्या केली म्हणतात. त्याचा पत्ता नाही.

'वर्तमानपत्रे काय म्हणतात?'

'म्हणतात की त्याला वेड लागले होते. कोठे तरी गेला नि मेला असावा.'

'तुम्ही पुढे काय केलेत?'

'मी अभ्यासात रमलो. मला वर्तमानपत्र चालविण्याची इच्छा. तो अभ्यासक्रमही मी पुरा केला. पुढे एका दैनिकात काम करीत होतो. परंतु एकदा भांडवलदारवर्गावर मी सपाटून टीका केली. दैनिकाच्या व्यवस्थापक मंडळीने मला काढून टाकले. ही पत्रे चालविणे म्हणजे गुलामगिरी असते. भांडवलदारांची बहुतेक पत्रे. मी विटलो हे सारे पाहून. नोकरीच नको असे मी ठरविले. मी वाचीन, लिहीन. तेवढ्याने मिळेल ते पुरे. एक कांदबरी लिहीत आहे. मिळतील हजारपाचशे रुपये. येथे झोपडीत राहायला पुष्कळ झाले. मला पैशांची जरूर नाही. एकट्याचा जीव. असो. किती वेळ येथे बसणार? उशीर झाला. तुम्ही घरी जाल का? तिकडे उंचावर तुमचे घर आहे. होय ना? मी येऊ पोचवायला? हात धरून नेतो.'

'शांता वाट पाहत असेल. निघून गेले की काय कोठे आजोबा, असे तिच्या मनात येईल. उशीरच झाला. चला माझ्याबरोबर. शांतेची ओळख करून देतो. तीही एकटी आहे. तिचे आईबाप नाहीत. फार प्रेमळ नि सुस्वभावी आहे. शांता जणू देवता आहे. चला, धरा माझा हात-'

त्या तरुणाने आनंदरामचा हात धरला. ते दोघे हळूहळू जात होते

शांता अंगणातच उभी होती. ती वाट पहात होती. इतक्यात तिच्या कानांवर दुरून बोलणे आले. ती आनंदली. तिने टाळ्या वाजविल्या.

'तिच्या टाळ्यांना उत्तर दे. तू टाळ्या वाजव. शीळ घाल.' आनंदराम म्हणाले.

त्या तरुणाने टाळ्या वाजविल्या. त्याने शीळ घातली. शांतेने इकडून टाळ्या वाजविल्या. आजोबांबरोबर कोणी तरी मुले पोचवायला येत असावीत असा तर्क तिने केला. आनंदराम आला. तो तरुण आला.

'अय्या! किती उशीर? आणि हे कोण पाहुणे?'

'त्यांचे मोठे रामायण आहे. ते मला सांगत होते. मी ऐकण्यात रमलो. ते सांगण्यात रमले. उशीर झाला. मी गेलो पळून, असे नाही ना वाटले?'

'माझा तुमच्यावर विश्वास आहे. यांचे रामायण-महाभारत मलाही का नाही ऐकवलेत?'

'ऐकवण्यासाठी तर यांना घेऊन आलो. ते कांदबरी लिहीत आहेत. नुकतेच या गावी राहायला आले.'

'आत चला ना दोघे. बाहेर गारठा आहे.'

खोलीतील खुर्च्यांवर तिघेजणे बसली.

'तुमचे नाव काय हो? इतका वेळ आपण बोलत होतो; परंतु नाव विचारायचे राहिलेच.' आनंदरामांनी विचारले.

'माझे नाव शांताराम.'

'अय्या! माझे नाव शांता!

'आणि माझे नाव आनंदराम.'

'खरेच, तुम्ही आनंदराम आहात. गावातील सारे लोक तुमची स्तुती करतात. मुलांना तर तुमचे वेड.' शांता म्हणाली.

'तू सुध्दा स्तुती करू लागलीस. हे पाहुणे हसतील हो. टीकाकार आहेत. वर्तमानपत्र चालवीत होते. आता कांदबरी लिहीत आहेत, तुझे पात्र घालतील. सांभाळ.'

'मग वाईट काय? तुमचे पात्रही शोभेल. शांताराम, आजोबांचे पात्र रंगवाल का?'

'मी तुमचा दोघांचा सल्ला घेत जाईन. लिहिलेले तुम्हांला वाचून दाखवीत जाईन. तुम्ही मोकळेपणाने गुणदोष-चर्चा करा. तुमच्या अनुभवाचा मला फायदा मिळेल. कराल असे सहकार्य?' शांतारामने विचारले.

'काय ग शांता?'

'हो, करू टीका. रागावणार नाही ना पण?'

'टीका सहृदय नि सहानुभूतीपूर्ण असली म्हणजे कशाला राग येईल? आणि माझे पुस्तक चांगले व्हावे या हेतूनेच तुम्ही टीका कराल. खरे ना आजोबा?'

'छान बोललेत.'

'आता मी जातो. उशीर झाला आहे. तुम्हांला जेवायचे असेल.'

'तुम्ही राहता जेवायला? नाही तरी घरी हातानेच करणार. शांता, पुरेल ना तिघांना?'

'भरीला ब्रेड घेऊ.'

'आजच नको. मी पुन्हा कधी तरी येईन जेवायला. मी आता या गावांत काही दिवस तरी आहेच. बसा. मी येतो.'

शांता त्याला पोचवीत बाहेर आली. तेथील एक गुलाब तिने त्याला दिला.

'किती सुंदर गुलाब!' तो म्हणाला.

'माझ्या वडिलांच्या हातचे.' ती म्हणाली.

तो निघून गेला. ती आत आली. आजोबा खुर्चीत बसले होते. ते थकले होते. डोळे मिटून ते स्वस्थ होते. शांताने स्वयंपाक केलाच होता. दोघांनी जेवण केले. मोत्याचाही फराळ झाला. शांता भरतकाम करीत बसली. आजोबा खाटेवर पडले होते.

'शांते, नीज आता.' ते म्हणाले.

'तुमचे पाय चेपल्याशिवाय कशी निजू? माझ्या बाबांचेही मी

पाय चेपायची. ते म्हणायचे, शांते, किती हळू तू पाय चेपतेस! थोड्या वेळाने येते हं पाय चेपायला.'

'आज नको पाय चेपायला. मला झोप आली आहे.'

'मग आधी पायच चेपते.'

असे म्हणून शांता चेपीत बसली.

'शांते, मी तुला किती दिवस पुरणार? पुन्हा तुला एकटे राहावे लागेल. तुझी काळजी वाटते.'

'काळजी देवाला. तुम्ही पुष्कळ दिवस पुराल. मनात काही आणू नका. येथे आनंदाने राहा. मी आता तुमची मुलगी. खरे ना? मुलीचे सुख ते तुमचे.'

'पुरे आता. जा नीज. तू दमतेस हो, दिवसभर काम करून.'

'कामात मला आनंद वाटतो आणि आजोबा, शशीला ती परडी दिलीत का? तिला आवडली का?'

'हो; आज समुद्रावर परडीत बोरे, चिंचा घालून ती आली होती. मोठी गोड पोर. गोष्ट सांगा, गोष्ट सांगा म्हणते.'

'तुम्ही सांगता का तिला गोष्टी?'

'हो.'

'मला का नाही सांगत गोष्टी?'

'तू का शांते, आता लहान?'

'मी का मोठी आहे, आजोबा?'

आनंदरामांना थकवा वाटत होता. तिने बोलणे बंद केले. त्यांचा डोळा लागला. ती भरतकाम घेऊन माडीवर गेली. तेथे मोत्या होता. परंतु कामात तिचे लक्ष लागेना. तीही अंथरुणावर पडली. आनंदरामांना काही तरी चिंता आहे असे तिला वाटले. तिने प्रार्थना करून म्हटले, 'देवा, आजोबांना सुखी ठेव.'

९

आनंदराम शांतपणे झोपला. मोत्या माडीवर झोपला. त्याच्या अंगावर पांघरूण होते. शांता रात्री कितीदा तरी खाली येऊन पाहून जाई. परंतु म्हातारा शांतपणे निजला होता.

ती सकाळी लवकर उठली. तिने अंगण झाडले. फुलांचा एक सुंदर गुच्छ करून तिने तेथे फुलदाणीत ठेवून दिला. चूल पेटवून तिने पाणी ठेवून दिले. ती त्याच्या खाटेजवळ उभी होती. त्याने शांतपणे डोळे उघडले.

'झाली का झोप?'

'हो. आता उठून पुढच्या प्रवासाला जाऊ दे -

'कोठला प्रवास?'

'मी यात्रेकरू आहे.'

'यात्रेचे हे शेवटचे स्थळ करा. मी आता तुम्हांला जाऊ देणार नाही. जाण्यासाठी का आलात? अशक्य. हे घर तुमचे समजा.'

'तू एकटी. माझा कशाला तुझ्यावर बोजा? आणि माझी तुला काय माहिती आहे? मी खुनी असेन, लुटारू असेन, डाकू असेन. कशाला मला आश्रय देतेस?

'तुम्ही कोणीही असा. मी विश्वास ठेवून चालते. जे कर्तव्य दिसते ते!'

'तुला काय दिसले?'

'दिसले की, एक वृध्द मनुष्य– माझ्या बाबांपेक्षाही वृध्द असा मनुष्य– असा निराधार पडला आहे. तो आजारी आहे. अशक्त आहे. त्याला विश्रांतीची जरूरी आहे. मी ती विश्रांती त्याला देईन; आणि त्यानेही मी सांगेन ते ऐकले पाहिजे.'

'एका परक्या पांथस्थासाठी तू हे सारे करणार?'

'हो. आता बोलू नका. तुम्हांला थकवा येईल.'

'मी तुझे उपकार परत कसे फेडू? मी काय देणार.'

'मला काही नको. तुम्ही येथे राहा, म्हणजे सारे मिळाले. माझ्या वडिलांची आठवण तुम्ही मला होऊ देणार नाही. त्यांची जागा भरून काढा.'

सारे वातावरण प्रसन्न होते. पाखरे खिडकीत येऊन बसत नि या पाहुण्याकडे बघत. पाहुणा आरामखुर्चीत होता. परंतु दुपारून त्याला ताप आला. शांतेने गांवातून एका वैद्याला बोलावले. त्याने पाहिले. आनंदरामाजवळ त्याने गप्पा मारल्या.

'मी औषध फार देत नसतो. तुम्ही आनंदी राहा; हसा. खेळा. हसणे हेच औषध. शांतेबरोबर खेळ खेळा; मोत्याबरोबर चेंडू खेळा. औषधे कशाला? तुमची मूळची प्रकृती निकोप आहे. तुम्ही चिंता सोडून द्या. ही पहा फुले. काल केवढे वादळ! तरी हसत होती. वादळात नाचत होती, तोंड देत होती. पडून राहा. तुम्हांला विश्रांती हवी आहे.'

काही गोळ्या देऊन वैद्य गेला. आनंदरामाचे असे दिवस जात होते. परंतु लवकरच ताप थांबला. तो आनंदी दिसू लागला. तो हिंडे, फिरे. गावातील कोणी येत, त्यांच्याजवळ तो बोले. चर्चा करी, एके दिवशी गांवातील दोन प्रतिष्ठित माणसे आली होती. त्या खुनाविषयी बोलणे निघाले:

'राक्षसी खून! त्याने गळा कापला.'

'त्याला सातदा फाशी द्यायला हवे होते. परंतु तोही मरून पडला.' आनंदराम बोलत नव्हता.

'तुम्ही म्हणे तो खून पाहिलांत! तो बळिराम राक्षसासारखा दिसे का हो!'

'तुम्ही कशाला चर्चा करता? बळिराम एक हिरा होता. त्याने खून केला. त्याच्या मुलाला त्या नबाबांनी मोटारीखाली मारले आणि म्हणाले," मेले गरिबाचे पोर म्हणून का दुनिया ओस पडली आहे?" बळिराम का हे सहन करील? त्याचा लाडका एकुलता मुलगा. कोर्टात जाता तरी त्याला न्याय मिळता ना! त्याने स्वतः न्याय मिळवून घेतला. तो सर्वांच्या उपयोगी पडे. तो मूळचा श्रीमंत होता. त्याने प्रेमासाठी फकिरी पत्करली. चार भिंतींच्या खोलीत त्याचा आत्मा गुदमरे. तो सृष्टीचा बालक होता. त्याचा मुलगा नक्षत्रासारखा होता. त्या बळिरामाला नावे नका ठेवू. माझ्यादेखत तरी नको.'

'परंतु ईश्वर काय म्हणेल? हे अधार्मिक कृत्य नव्हे का?'

'तुम्ही धर्माच्या गप्पा नका मारू! तुम्ही किती जणांच्या उपयोगी पडता? जगाला न्याय मिळवा, जगात समता यावी म्हणून तुम्ही झगडता का? धर्म म्हणजे का टिळेमाळा? दंभ! धर्म म्हणजे सत्यासाठी, न्यायासाठी लढणे. त्या लक्षाधीशाची तुम्हांला किंमत वाटते. परंतु बळिरामाच्या नखाची सर त्याला नव्हती. बळिरामाजवळ ओबडधोबड का होईना, परंतु उदात्तता होती आणि त्या कोट्याधीश डुकराजवळ, त्या किड्याजवळ काय होते?'

'तो कोट्याधीश डुक्कर?'

'तो किडा?'

'डुक्कर आणि किडा यांनाही किंमत आहे. डुकरे घाण दूर करतात. किड्यांचेही कार्य असेच. परंतु या श्रीमंत किड्यांना खंडीभर कपडे, नटणे, सिगारेटी, मोटारी, नाच-तमाशे, खाणे-

त्याने ती आणिली. शांतेने ती सर्वांना दिली.

'माझ्या हातची बिस्किटे.' ती म्हणाली.

'आणि माझ्या हातचा चहा.' तो म्हणाला.

'माझ्या हातचे काहीच नाही!' आनंदराम म्हणाले.

'आजोबा, या चहाला गोडी आहे ती तुमच्यामुळे. तुम्ही येथे आहात म्हणून हा आनंद. म्हणून हे समाधान. म्हणून या शांतारामांची ओळख झाली, तुम्ही आनंद देणारे, सर्वांना जोडणारे. गावांतील किती भांडणे तुम्ही मिटवलीत, तुम्ही अनेकांचे तंटे तोडलेत. सारे तुम्हांला धर्मात्मा म्हणतात. आजोबा तुम्ही या आनंदगावात क्रांती करीत आहात. तुम्हांला तुमची शक्ती माहीत नाही. परंतु येथे बसल्या बसल्या तुम्ही सारा गाव निर्मळ करीत आहांत. तुम्हांला स्तुती आवडत नाही. परंतु ही स्तुती नव्हे. हे यथार्थ वर्णन आहे.'

'शांता, माझ्या शेजारी ती गुणी राहते. तिचा नवरा आळशी. गुणी दिवसभर श्रमते. परंतु तिचा नवरा हल्ली काम करायला लागला आहे. रानात जातो. मोळी आणतो. परवा मी त्याची मोळी विकत घेतली. आणाभर त्याला जास्त दिला. लोक त्याला म्हणायचे, 'शांताकडे ते आजोबा आहेत, ते सुध्दा टोपल्या विणतात. मिंधी भाकर ते खात नाहीत आणि तू नुसता बसतोस. तुला काही कसे वाटत नाही? आपल्या गावांत आळशी, मिजासी कोणी नको.' गुणीच्या नवऱ्याला कर्तव्याची जागृती आली. आनंदराम, तुमचे उदाहरण अनेकांच्या जीवनात क्रांती करीत आहे. तुमचे जीवन मोलाचे आहे. तुम्ही शांताला, या गावाला सोडून जाऊ नका.'

'शांताने विश्रांती घ्यायचे ठरविले तर मी हा गांव सोडून जाणार नाही. तिने म्हाताऱ्याचे थोडे तरी ऐकले पाहिजे. मी ज्या दिवशी घरात आलो त्या दिवशी ती मला म्हणाली, 'तुम्ही माझे ऐकले पाहिजे!' आणि मी ऐकत आलो.'

'आजोबा, किती तुमच्या लक्षात राहते?'

'शांता, ती रात्र, तो दिवस का मी विसरेन? आयुष्यातील क्रांतिकारक घटना, मोलाचे क्षण, दिव्य दर्शने मनुष्य कधी विसरत नसतो. याही गोष्टी तो विसरू लागला तर त्याच्या जीवनात मग उरले तरी काय? हं, मग काय शांता? चार दिवस अगदी पडून राहायचे. फार तर थोडे फिरायला जायचे. कबूल?'

'कबूल. तुमच्यासाठी म्हणून कबूल. तुमच्या प्रेमासाठी मी सारे करीन.'

'परंतु हे आधीच मुकाट्याने ऐकतीस तर?'

'आजोबा, तुमच्याजवळ नाही जरा हट्ट करायचा तर कोठे करायचा? ज्याच्याजवळ मी हट्ट करीन, ज्याच्याजवळ मी रुसेन, रागावेन असे या शांताला दुसरे कोण आहे? तुम्हीच काय ते माझे आहांत. खरे ना? जीवनातील ही एक सात्त्विक गंमत असते. गंमतीचे रागावणे, रुसणे, फुरंगटून बसणे. तो एक सात्त्विक आनंद असतो. माझे बाबा होते तेव्हा मी त्यांच्याजवळ हट्ट धरायची, त्यांना मी म्हणायची, 'चला रात्री फिरायला. चला समुद्रात डुंबायला.' ते गेल्यापासून मी रुसले नाही. तुम्ही आलात आणि आता तुम्ही माझे झाल्यावर तुमच्याजवळ मी हट्ट करू लागले. खरे ना आजोबा?

असे म्हणून शांतीने आनंदरामांच्या त्या वृध्द मांडीवर डोके ठेवले. तिला हुंदका आला. आनंदराम सद्‌गदित झाले. ते तिला थोपटीत होते. तिच्या केसांवरून आपला प्रेम वरदहस्त फिरवीत होते. शांताराम कपबशा घेऊन आत गेला. तो आपल्या भावना दाबीत होता. अश्रू लपवीत होता. आवंढा गिळीत होता.

० ० ०

चार दिवस शांता खरोखरच पडून राहिली. तिला आता बरे वाटत होते. शांतारामाची कादंबरी तिने सारी वाचून काढली. ती अजून पुरी झाली नव्हती. तो ती पुन्हा सारी लिहून काढणार होता.

शांताने मधून मधून टीका लिहिली, फेरफार सुचवून ठेविले.

'चांगले होईल का पुस्तक?' शांतारामाने विचारले.

'चांगले होईल. मला तरी ते आवडले.' ती म्हणाली.

'तुम्ही सुचविल्याप्रमाणे मी फेरफार करीन. शांता, तुला एक प्रश्न विचारू? कोणते प्रेम श्रेष्ठ? हुकमत गाजविणारे की हुकमत गाजवू देणारे? दोन प्रकारचे आढळते. एक प्रेम आक्रमक असते तर दुसरे मिळून जाणारे असते. नदी थोर की समुद्र थोर? नदी स्वतःला समुद्रात मिसळून टाकते. समुद्र तिला पोटात घेतो. स्त्रियांना शरणागती आवडते. पुरुषाचे प्रेम सत्ताधारी असते. स्त्रीला आपण कोणात तरी मिसळून गेलो आहोत असे मानण्यात कृतार्थता वाटते, असे नाही का?'

'मी प्रेमाची एकच कसोटी मानते. तद्रूप होणे. स्वतःला शून्य करणे.'

'मी असे मानीत नाही. प्रत्येकाचे जीवन विशिष्ट गुणधर्मांचे आहे. एकमेकांच्या जीवनाच्या विकासाला सहाय्य करावे. वेलीने वृक्षाला मिठी मारली तर वेलीला झाडाचा मोहोर येणार नाही. वेलीला वेलीचीच फुले येणार आणि त्यातच गोडी आहे. प्रेम एकमेकांच्या विकासाला प्रेरक नि पूरक व्हावे. गुलाब रातराणी होणार नाही. रातराणी गुलाब होणार नाही. दोघांनी जवळ जवळ असावे. एकमेकांचा सुगंध एकमेकांस मिळेल.'

'तुमच्या म्हणण्यातही अर्थ आहे. परंतु शांताराम, हे सारे चौकटीत बसवता येणार नाही. जीवन ठोकळेबाज नाही, गुंतागुंतीचे असते. अनेक सूक्ष्मोपसूक्ष्म भावनांची तेथे गुंफण असते. आक्रमक प्रेम करू पाहणारा पती स्त्रीचा बंदा गुलाम होतो आणि स्वतःला शून्य करू पाहणारी पत्नी, पतीत मिळून जाऊ पाहणारी पत्नी, पतीची स्वामिनी होऊन बसते. शेवटी सारे एकच आहे.'

इतक्यात आनंदराम बाहेरून आले. ते तेथेच उभे राहिले.

नगर वाचनालय सातारा

'या आजोबा-' शांताराम म्हणाला.

'आलेत शशीचा वाढदिवस साजरा करून?' शांतेने विचारले.

'मला दुसऱ्यांचे वाढदिवस साजरे करण्यात आनंद वाटतो. शांता, तुझाही लवकरच येईल. मी आठवण ठेवीनच म्हणा!'

'आजोबा तुमचा कधी?'

'माझा वाढदिवस मी विसरून गेलो. मी जन्मलो तेव्हा अगदी लहान होतो. माझ्या कसा बरे तो लक्षात असेल? आपला वाढदिवस दुसऱ्याच्या लक्षात असावा. स्वतःच्या नसावा.'

'शशीला घेऊन का नाही आलात?'

'ती उद्या येणार आहे. आता तुम्ही दोघे थोडे फिरायला जा. संध्याकाळ होत आली. शांता, फिरून येतेस?'

'तुम्ही पडून रहायला सांगितले ना?'

'अग, पाय मोकळे करून यावे, जरा बरे वाटते. पडून रहायचे म्हणजे काय?'

'म्हणजे हिंडायचे, फिरायचे, गंमत करायची. फक्त घरकाम करायचे नाही. छान आहे व्याख्या पडून राहाण्याची!'

'शांताराम, शांता हल्ली फार बोलकी झाली आहे.'

'उत्साहाला प्रकट व्हायला वेळ लागतो. हल्ली त्या दुसरे काही करत नाहीत; म्हणून बोलतात!'

'मी आलो तेव्हा कसली चर्चा चालली होती?'

'प्रेमाची.'

'मग कोण जिंकले?'

'ती विचारात्मक चर्चा होती.'

इतक्यात मोत्या आला. तो शांताच्या पायांवर तोंड घासू लागला. आनंदराम पाहात होते.

'मोत्या मला विसरलास वाटते? म्हाताऱ्याची कशाला कोण आठवण ठेवील? आठवण ठेवून उपयोग तरी काय? मोत्या,

आता शांता तुझी काळजी घेणारी. खरे ना? मी आज आहे; उद्या नाहे.'

'आजोबा, जगात सर्वांचीच ही दशा आहे. जीवन क्षणभंगुर आहे.'

'मरण अटळ आहे. परंतु वृध्दांना ते येण्यात शोभा आहे. तरुणांना, मुलांना आले तर त्याला आपण अकाली मरण म्हणतो. मी आता मेलो तर ते योग्य ठरेल. माझे दिवस संपल्यासारखेच आहेत.'

'मग जाऊ मी फिरायला?'

'आता उशीर झाला. उद्या जा.'

'मी आता जातो.'

'आव जो–'

शांताराम निघून गेला. शांता अंगणातच फिरत होती. गुलाबांना बघत होती. आज रात्री कोणाला जेवायचे नव्हते.

○ ○ ○

दुसऱ्या दिवशी उजाडताच शशी आपली परडी घेऊन आली. आजोबांना तिने फुलांचा गुच्छ आणला होता.

'आणि शांताताईंना काय आणले आहेस?'

'त्यांना काय आणायचे? त्या का लहान आहेत?'

'आणि मी वाटते लहान?'

'तुम्ही आमच्याबरोबर खेळता. मी तुमचे डोळे झाकते, तुम्ही वाळूत बोगदा करून देता. मी तुमच्या अंगांवर लाटांचे पाणी उडवते. खरे ना? आणि तुम्ही गोष्ट सांगता. या तर एकट्या असतात. त्या का नाही मुलांबरोबर खेळत? त्यांना मुले आवडत नाहीत?'

'आवडतात. तुझ्यासाठी परडी करायला तिनेच सांगितले.'

'खरेच? होय शांताताई?'

'शशी, मी तुला काय देऊ? तुला रिबिना हव्यात?'

'म्हणजे आगवळ ना? माझे बाबा त्याला आगवळ म्हणतात. तुमच्या जवळ छान छान आहेत का?'

'तिरंगी आहेत, फुलाफुलांच्या आहेत. तुला आवडतील त्या. तुझ्या केसात गुलाबाची फुले घालू का?'

'सोनचाफ्याची केसात आहेत ना!'

'आणखी गुलाबाची पण होतील. तुला खाऊ हवा का?'

'खरा खरा का लुटूपुटीचा? आजोबा लुटूपुटीचा खाऊ देतात. कधी कधी खारीकही देतात. नाही तर डोसक्यात टिचकी मारून म्हणतात, 'मिळाली ना खारीक?' तुम्ही काय देणार?'

'तुला आवडेल ते- -'

'तुमच्या घरी कोणाला खाऊ लागतो? लहान कोण आहे? तुम्ही तर सारी मोठी.'

'आजोबा आहेत ना लहान! लहान मुलांत खेळणारे. त्यांना लिमलेटची वडी लागते.'

'अहो, मला तीच आवडते. खट्टीमीठी. आंबटगोड. मला पुडी करून द्याल?'

'कोणाला?'

'माझा धाकटा भाऊ आहे. त्याला देईन.'

'त्याचे नाव काय?'

'नंदा. तो रडत नाही. मी त्याला कडेवर घेते. तो माझे पुस्तक वाचायला मागतो. परंतु वाचत नाही; फाडतो. पाटीवर भराभर लिहितो. माझा भाऊ आहे तो. त्याला पण द्या खाऊ-'

'शशी, असे का मागावे? तुझी आई तुला रागावेल, मारील. म्हणेल, हावरटासारखे का मागावे?'

'तुम्ही वाटते आमचे नाही? तुम्ही का लोक? बाबा म्हणतात, लोकांकडे मागू नये. तुम्ही का लोक? तुम्ही तर मला चांदीची वाटी दिलीत. माझ्याजवळ तुम्ही खेळता. तुम्ही का लोक?'

'मी नाही. परंतु ही शांताताई?'

'ती तुमचीच. तुम्ही एकाच घरात राहता. तुम्ही लोक नाहीत. खरे की नाही शांताबाई?'

'हुशार आहेस तू, शशी.'

'बाई म्हणतातच की, शशी हुशार आहे म्हणून. कोणी बाहेरचे मोठे आमच्या वर्गात आले तर मलाच नाचायला सांगतात.' शांताने शशीला खाऊ दिला. तिने तिला एक पुडीही बांधून दिली. तिने तिच्या केसात फुले घातली. शशी मोत्याशी खेळली. ती चेंडू फेकी. मोत्या घेऊन येई. गंमत.

'आजोबा, आंधळी कोशिंबीर खेळायला येता?'

'मी येतो शशी!' शांताराम एकाएकी येऊन म्हणाले.

'तुम्ही? तुमच्या डोळ्यांना तर चष्मा, चष्मावरून का फडके बांधायचे? का आधी फडका बांधून वर तुम्ही चष्मा लावाल? पण मग तुम्हांला दिसेल. चष्मा काढूनच ठेवाल?'

'शशी, अग, नुसत्या चष्म्याने का दिसते? वेडी रे वेडी.' शशी ओशाळली, लाजली.

'मी जाते घरी. नकोच खेळ.'

'वा! खेळले पाहिजे! पहिली हार माझ्यावर. कोण कोण खेळायला येणार?'

'चला, आजोबा; या शांताबाई - -'

अंगणात खेळ सुरू झाला. आणि शांतारामाने शांताला पकडले.

'मी नाहीच ना सापडले? मी पटपट पळत होते. शांताताई हसल्या म्हणून त्या सापडल्या.'

'हसे तो फसे.' आजोबा म्हणाले.

'आजोबा, तुम्ही मुळी पुढे आलातच नाही.'

'शशी, आता घरी जा. ऊन होईल. आई वाट पाहत असेल.'

'तुमच्याकडे आले म्हणजे आई वाट बघत नाही. म्हणते, असेल आजोबांकडे.'

'शशी, तू नि मी बरोबरच जाऊ. मला जायचेच आहे. शांता, बरे वाटते ना आता?'

'खेळायला आले यावरून समजा काय ते!'

'अच्छा अभी जाता हूँ. ऐसाही खालीपिली आया था.'

'आजोबा, मी जाते-'

'शांताताईनाही सांग.'

'तुम्ही सांगा. मी जाते. लिमलेट खाते. खट्टामिठा, आंबट गोड.'

'किती गोड मुलगी!' शांता म्हणाली.

'तू लहानपणी कशी होतीस?' आजोबांनी विचारले.

'ते माझ्या बाबांना माहीत, आईला माहीत.'

'आई कितव्या वर्षी गेली?'

'तेव्हा मी दहा वर्षांची होते.' असे म्हणून शांता एकदम घरांत गेली. आईची आठवण तिला सहन होत नसे.

० ० ०

असे दिवस जात होते.' एके दिवशी शांता सामान आणायला गावात गेली होती आणि शांताराम इकडे आला होता. आनंदराम आणि तो- दोघे बराच वेळ अनेक विषयांवर बोलत होते आणि बोलता बोलता आनंदरामांनी विचारले.

'शांताराम, तुम्ही का अगदी एकटे आहात?'

'आईबाप लहानपणीच निवर्तले. माझ्या आत्याने मला वाढविले. परंतु पुढे तीही मेली. मी स्वप्रयत्नानेच शिकलो. शिष्यवृत्त्या मिळवल्या. काही कामधामही करीत असे. मला जवळचे असे कोणी नाही. सारे जग माझे नि मी साऱ्या जगाचा.'

'तू का असाच एकाकी राहणार? तू संसारात नाही का पडू इच्छीत? तुझ्या मनांत कधी विचार नाही का येत? संसाराचे नाही का तुला आकर्षण?'

'मी एकदा प्रेमात पडलो नि पस्तावलो. तेव्हापासून मी जपून

राहतो. तेव्हापासून मी दूरच राहिलो आहे. दुधाने तोंड भाजले म्हणजे मनुष्य ताकही फुंकरून पितो. आशेतून निराशा पदरात पडणे फार वाईट. म्हणून प्रेमाची आशा मी सोडून दिली आहे.'

'परंतु चांगली मुलगी मिळाली तर? अनुरूप वधू मिळाली तर?'

'मी हल्ली तसा फारसा विचार करीत नाही. मनात विचार आले तरी मी ते हाकलून देतो. त्या विचारांत मी रमत नाही. मी असामान्य मनुष्य नाही. सामान्य आहे.'

'आणि असामान्य माणसेही संसारीच होती, शांताराम, तुला एक प्रश्न विचारू?'

'एका का? दहा विचारा. तुम्ही माझे हितकर्ते आहांत. वडिलांच्या ठिकाणी आहात.'

'तू शांताशी लग्न करशील?'

'काय विचारता?'

'माझ्या मनातील विचारतो. शांता सुस्वभावी आहे. प्रेमळ आहे. तिने फार वाचले नसले तरी तिने खूप विचार केलेला आहे. तिच्याजवळ पुस्तकी विद्या नाही. परंतु तिच्याजवळ स्वयंभू प्रज्ञा नि प्रतिभा आहे. साधी नि सरळ, प्रेमळ परंतु गंभीर, सेवापरायण आणि निरहंकारी, स्वाभिमानी परंतु विनयशील, खरेच, शांता थोर मुलगी आहे. ती तुला मिळाली तर?'

'आजोबा, मी शांताला देव मानतो. ती अतिमानवी आहे असे मला वाटते. ती मानवी संसारासाठी नाही. तिची शांती, तिचे समाधान अलौकिक आहे. मी तिची आशा-अपेक्षा कशी करू? मी पृथ्वीवरचा जीव. ती स्वर्गीय विभूती आहे. माझ्या मानवी भुका. तिची भूक वरच्या दर्जाची आहे.'

'कशावरून? ती मनाची थोर आहे. निष्पाप आहे, हे खरे; परंतु म्हणून तिला का संसार नको आहे? तिचे आईबाप नाहीत. कोण तिला विचारणार, तिची चिंता करणार? ती पवित्रपणे

राहिली. तपस्विनीप्रमाणे राहिली. गावात तिच्यासंबंधी कोणीही कधी वाईट बोलत नाही. हे सारे खरे. परंतु अनुरुप पती मिळाला तर तिला का नको असेल? मी तिला विचारले नाही. आधी तुम्हांला विचारीन म्हटले. तुम्ही तयार असल्यावर तिच्याशी हळूच प्रश्न काढीन.'

'आजोबा, एखादे वेळेस मला माझ्या मनात शांतेसंबंधी ही भावना येई. परंतु माझी मला लाज वाटे. मला माझा राग येई आणि माझ्या मनाला तिच्याकडे देवता म्हणून पाहायला मी शिकवले. तुमची उत्कट इच्छा असेल तर पहा प्रयत्न करून. मला शांता मिळणे म्हणजे प्रभूची ती थोर कृपा ठरेल. मी तिला पात्र नाही.'

'का नाही पात्र? तुम्ही स्वतःला कमी का लेखता? तुमच्या-जवळही काही मूल्यवान गुण आहेत. तुम्ही गुणवान नसता तर तुम्हांला शांताने वरावे असे मला वाटले असते का? मी आंधळा नाही. मी तुम्हा दोघांचे मूल्यमापन केले आहे. मी तुम्हा दोघांच्या जीवनांत डोकावून पाहिले आहे. शांताराम, मी मोठा असे एखाद्याने मानणे हा जसा अहंकार, त्याप्रमाणेच माझ्याजवळ काही नाही, काही नाही, असे म्हणण्यातही एक प्रकारचा अहंकार असतो. मनुष्याने प्रांजल असावे.'

'शिकवा, बोला. तुम्ही आम्हांला भेटलेले प्रेमळ गुरू आहांत.'

'मी गुरू नाही. तुम्ही शिष्य नाही. मी तुम्हांला जोडू इच्छितो. शांतेला विचारीन -'

'काय विचारणार आहात शांतेला?' दारातून शांतेने विचारले.

'आलीस वाटते?'

'मग का गावातच राहू? शशीच्या आईने बराच वेळ बसविले. तेथे चिवडा खाल्ला. केळी खाल्ली.'

'आम्हांला काय आणले आहेस?'

'ओळखा...'

'चिक्कू.' शांताराम म्हणाला.

'चूक. आजोबा, तुम्ही ओळखा...'

'पेरू.'

'बरोबर! शांताराम, आजोबांना पेरू फार आवडतो. शशीच्या वडिलांनी दिले. बिनबियांचे. म्हणजे चावायला त्रास नाही.'

'माझे दात चांगले आहेत. तुमच्यापेक्षा भराभर मी ऊस खाईन. त्या दिवशी शांतेचा ऊस संपेना. माझा कधीच संपला. आम्हा म्हाताऱ्यांचे दात बळकट असतात. पुन्हा नवीन तरुणांचे दात वाईट. तुम्हांला ते ब्रश हवेत आणि ती मलमे. मग बसता कुंचलीत-'

'आजोबा, तुम्हांला नवीन सारेच का वाईट वाटते?'

'मुळीच नाही. मी नवीनचा भोक्ता आहे. पण कृत्रिमपणा म्हणजे नवीनपणा नव्हे. जीवनात सुंदरता आणणारे नवीन मला हवे आहे.'

शांताने पेरु कापून आणले. सर्वांपुढे तिने ते ठेवले.

'दे ना वाटून.' आजोबा म्हणाले.

'तुम्ही घ्या. उचला.' ती म्हणाली.

'मी भराभर खाईन; यांना उरणार नाही.'

'मी त्यांना निराळा देईन आणखी कापून.'

'अस्से, म्हणजे आणखी आहेत वाटते?'

'उद्या का कोठे जायचे आहे? उद्या होतील. नाही तर पंचामृत करीन पेरूचे. शांताराम, तुम्ही या उद्या जेवायला. भाजी पण कोबीची आणली आहे. कोबीचा भातच करीन नाही तर...'

'जे करशील ते खाऊ.'

'उद्या माझा वाढदिवस आहे.' शांताराम म्हणाला.

'मग गंमतच! तुम्हांला काय आवडते?'

'मला न आवडणारा पदार्थ जगात नाही.'

'असे संन्याशाप्रमाणे बोलू नका-'

'मी संन्याशीच आहे.'

'बोकेसंन्याशी! कादंबरी लिहिणारा काही संन्याशी नसतो.'

'शांता, त्यांना शिव्या काय देतेस?'

'आजोबा, मी का शिवराळ आहे?'

'त्यांना बोकेसंन्याशी म्हटलेस!'

'ती आपली गंमत. शांताराम, क्षमा मागते हं.'

'ही बरी आहे गंमत.' आजोबा म्हणाले.

'शांताराम, काय आवडते ते सांगा ना!'

'मला काय आवडते आजोबा सांगतील-'

'त्यांना काय माहीत?'

'ते मी त्यांना मघा सांगत होतो.'

'आजोबा सांगता?'

'शांतेचे मला सारे आवडते असे ते सांगत होते. तू करशील ते त्यांना आवडेल. सोपे, सुटसुटीत कर. पसारा त्यांना आवडत नाही.'

'मी येईन मदत करायला—'

'आपण श्रीखंड-पुरी करू. मी पुऱ्या तळीन. तुम्ही श्रीखंड करा. कोबीची भाजी. नारळाची चटणी. पेरुचे पंचामृत. छान! आणि आजोबा नंतर शांतारामांना देणार काय? तुम्हीच मोठेपणी काही तरी द्या.'

'देईन. मी विचार करून ठेवीन.'

'आजोबा फिरायला येता? शांता दमून आली आहे. तुम्ही येता?'

'या आजोबा फिरून. मोत्या कोठे गेला आज?'

'तो समुद्राकडे जातो एखादे वेळेस. चला शांताराम.'

ते दोघे फिरायला गेले. शांता घरी होती. तिने अंगण

स्वच्छ झाडले. घरचा केर काढला. आजोबांचे अंथरुण झटकून घातले. त्याच्यावर नवी स्वच्छ चादर तिने घातली. तिने दिवे लावले. चूल पेटवून तिने भाजी-भात ठेवून दिला. तिने देवांना निरांजन ओवाळले आणि ती दिवाणखान्यात गेली. तेथे तिच्या माय-बापांची तसबीर होती. तिने तेथे उदबत्ती लावली. डोळे मिटून त्या तसबिरीसमोर किती तरी वेळ उभी होती. इतक्यात मोत्या आला. तो पायाजवळ कुरबुरू लागला तेव्हा ती भानावर आली.

'आलास? कोठे रे जातोस हल्ली? घाणीत नको हो जाऊ. उद्या तुला साबणाने आंघोळ घालीन हं. बस तेथे.' त्याला सारे समजत होते. मोत्या माणसांहून समजूतदार होता. काही बाबतीत पशुपक्षीही माणसांहून अधिक अंतर्ज्ञानी असावेत असे वाटते.

शांता स्वयंपाक करून अंगणात आली. ती फेऱ्या घालू लागली. मध्येच ती आकाशातील तारे बघे. तिच्या वडिलांना ताऱ्यांचा फार छंद. तारे पाहताच ताराप्रेमी वडील तिला आठवत. इतक्यात त्या परिचित टाळ्या कानावर आल्या. शीळ आली. तिने ही टाळ्या वाजविल्या. शांताराम आजोबांना घेऊन आला.

'जा आता तुम्ही -' आजोबा म्हणाले.

'का त्यांना दवडता?' बसू दे जरा. तुम्हांला आहे का हो ताऱ्यांची माहिती?'

'मी त्यांच्याकडे बघत राहतो. नावे मला माहीत नाहीत.'

'आजोबा, तुम्हांला?'

'मी पृथ्वीवरचे तारे बघतो. दूरचे तारे काय कामाचे?'

'तो इंग्रजीतील वाय अक्षरांसारखा ययाती; आणि इंग्रजी एम् आकाराचे ते नक्षत्र. त्याला आपण शर्मिष्ठा म्हणतो.'

'इंग्रजीत 'आरामखुर्चीतील राणी' असे तिचे नांव आहे.' अजोबा म्हणाले.

'लग्नाच्या वेळेस हीच का नक्षत्रे दाखवतात?'

'नाही काही. वसिष्ठ-अरुंधतींना बघायचे असते. सप्तर्षीत ते आहेत. सप्तर्षी अजून वर आले नाहीत.'

'ययाती नि शर्मिष्ठा यांचे आदर्श प्रेम मानतात. शाकुंतल नाटकात शकुंतला आश्रमातून दुष्यंताकडे जायला निघते, तेव्हा कुलपती कण्व तिला म्हणतातः

'ययातिरिव शर्मिष्ठाभर्तुर्बहुमता भव'

'ययातीची शर्मिष्ठा आवडती, तशी तू पतीची हो.'

'आजोबा, तुम्ही खूप वाचलेले आहे.'

'थोडे थोडे आठवते. शांता, भूक लागली आहे-'

'मी जातो हं.'

'उद्या तुमचा वाढदिवस. उद्या पोटभर जेवायला वाढीन, आता रहा म्हणत नाही. आता जा आपल्या झोपडीत नि करा भात-भाजी.'

'दुपारची भाकरी शिल्लकच आहे. भाजी केली म्हणजे झाले.'

'मग भाजी घेऊनच जा. लहान डब्यात घालून तो रुमालात बांधून देते म्हणजे लाज वाटायला नको.'

तिने त्याला भाजी दिली. चटणीची पुडीही बांधून दिली. शांताराम गेला. आनंदराम नि शांता जेवत होती. तिकडे झोपडीत शांताराम जेवत होता. तो त्या डब्यातील भाजी खात होता. चटणी त्याला फारच आवडली. जेवताना त्याच्या मनांत नाना विचार येत होते. शांता खरेच का माझी होईल? तिच्या मनात माझ्याविषयी कोणत्या भावना आहेत? कोणत्याही असोत. तिच्या हृदयात माझ्याविषयी आस्था आहे खास. तो आनंदाने जेवला. त्याच्या झोपडीच्या भोवती उंच झाडे होती. तेथे बकुलवृक्ष होता. तो फुलत होता. उजाडत फुले वेचायची असे त्याने ठरविले आणि शांताला तो ती देणार होता. त्याला आजपर्यंत धीर झाला नव्हता. तो किती तुरे करी, माळा गुंफी; परंतु त्याच्या घरातच सारे सुकून जाई.

शांताराम शांतेच्या विचारात रमला होता. आणि शांता? जेवण आटोपून, आवराआवर करून बागेत फिरत होती. थोड्या वेळाने घरात येऊन ती आजोबांचे पाय चेपीत बसली. कोणी बोलत नव्हते.

'शांता-' एकाएकी त्यांनी हाक मारली.

'काय?'

'किती तरी दिवस तुला एक विचारीन म्हणून मनांत म्हणत होतो. आता आज विचारतोच-'

'कशाविषयी?'

'तुझ्याविषयी.'

'काय विचारायचे आहे?'

'शांता, तू अशी एकटी किती दिवस राहणार, बाळ? बरा दिसलो तरी थकत चाललो आहे. देवाचे मला लवकर बोलावणे येईल. तू एकटी नको राहू. तू लग्न कर. तुझा पिता असता तर तो सारे करता. तुझ्या मनात कधी नाही का येत? तू का तपस्विनी होणार? मला तसे वाटत नाही. तू प्रेमासाठी भुकेलेली आहेस. परंतु तू संयमी आहेस. आपल्या प्रेमाचा अस्वीकार झाला तर? – अशी तुला शंका येत असावी. म्हणून तू आपले प्रेम हृदयातच ठेवीत आहेस. तरीही ते प्रकट होते. मनुष्य स्वतःला किती लपवणार? शांता, तू शांतारामची होशील? तो चांगला आहे. सुस्वभावी, उमदा गडी आहे.'

'आजोबा, तुमचा आधारच मला अनंत आहे.' ती त्यांच्या पायावर डोके ठेवून म्हणाली.

'वेडी आहेस तू; माझा आधार अनंत नाही. लवकरच माझा अंत होईल. मी तुझ्या मनात राहीन, परंतु प्रत्यक्ष या जगात तुला धीर द्यायला, तुझे दुखलेखुपले पाहायला मी थोडाच असेन? खरे ना बाळ? शांताराम तुलाही आवडतो. तू त्याला त्या दिवशी बोकेसंन्याशी म्हटलेस. तूही जाणतेस की शांतारामाचे तुझ्यावर

प्रेम आहे. त्याच्याविषयी तुला आपलेपणा नसता तर तू असे बोलतीस ना. तो तुला आवडतो. जणू आपला हक्क आहे त्याच्यावर, असे तुला वाटते. तू त्याला मघा भाजी दिलीस. परंतु आजचेच कशाला? मला तो पहिला दिवस आठवतो. ज्या दिवशी प्रथम शांतारामची भेट झाली, तो मला घरी घेऊन आला. आपण घरांत बसलो. 'मलाही तुमचे रामायण-महाभारत सांगा' - तू त्याला म्हणलीस. जाताना त्याला गुलाब दिलास. शांता, प्रेम का प्रथमदर्शनी असते? मला माहीत नाही. परंतु तुमचे दुर्मिळ, निष्पाप, प्रेमळ डोळे त्या दिवशी अनंत बोलले असावेत. तुम्हांलाही ते माहीत नसेल. अज्ञातपणे तुमच्या हृदयांना ते माहीत असेल. त्या दिवशी प्रेम पेरले गेले. खात्रीने त्याचा उभयतांच्या जीवनात विकास झाला आहे. माझ्यापासून तू छपवू नकोस. मी तुमचा हितकर्ता, मंगलकर्ता आहे. तुम्ही दोघे सुखी, कृतार्थ व्हा. माझी दुसरी इच्छा नाही.'

'आजोबा, मी गरीब मुलगी. ही बोटे भरतकाम करून बघा कशी झाली आहेत. माझ्याजवळ विव्दत्ता नाही. लोकांच्या दृष्टीने मी अशिक्षितच. शांताराम विद्वान आहेत. मी कधी कधी त्यांच्या लिहिण्यावर टीका करते. मागून मला हसू येते. वाईट वाटते. ते मला माझे मत विचारतात हा त्यांचा मोठेपणा. ते निगर्वी आहेत. परंतु त्यांची योग्यता मोठी आहे. आज ते पहिल्या प्रतीचे पत्रपंडित झाले असते. परंतु सदसद्विवेकबुध्दी विकायला ते तयार नव्हते. ते आत्म्याचे उपासक आहेत. ना धनाचे, ना मनाचे. मी अशा थोर पुरुषाची कशाला अपेक्षा करू? मनांत विचार आला तरी मी दूर ठेवला पाहिजे. त्यांच्या घरी जावे, त्यांची पुस्तके चाळावी, असे कितीदा माझ्या मनांत येते; परंतु मी कधी गेले नाही. ते नेहमी येतात. त्यांना वाटले असेल, ही कधी येत नाही, ही आभिमानी आहे. परंतु माझे मन मला माहीत, देवाला माहीत.'

'आणि मला माहीत, शांता. शांताराम धनाचा उपासक नाही असे तूच म्हटलेस; तो आत्म्याचा उपासक असेल तर तुझ्या आत्म्याचे सौंदर्य त्याला दिसल्याशिवाय कसे राहील? मी त्याला मोघम विचारून बघू का? सूचक रीतीने त्याचे अंतरंग तपासून घेऊ का? परंतु समज की तो तयार झाला, समज, त्याचे तुझ्यावर प्रेम आहे. तर तू तयार होशील का?'

'मी ते माझे भाग्य समजेन. परंतु मी दुर्दैवी आहे. मी मनाला कधीच सांगितले, अशी वेडी आशा करू नकोस म्हणून.'

'जगात केवळ दुर्दैवी कोणीच नाही, मी दुर्दैवीच होतो. परंतु माझी काळजी घेणारी मला तू भेटलीस. या मोत्याला मी भेटलो. जीवन म्हणजे सुःखदुःखांची, आशानिराशांची खिचडी आहे, आणि खिचडीच पौष्टिक असते. पचायलाही ती फार कठीण नसते. शांतारामला मी विचारीन. तू आता नीज. तुला झोप येत असेल.'

आनंदरामच्या पायांजवळून उठून शांता त्यांच्या उशाशी गेली. ती खाली वाकली. आनंदरामांनी तिच्या डोळ्यांवरून हात फिरविला. तिच्या डोळ्यांतील अश्रू त्यांच्या उशीवर पडले.

'जा बेटा, नीज. सारे गोड होईल. शांता सुखी होईल.

शांता जाऊन अंथरुणावर पडली. तिकडे शांताराम अंथरुणात होता, आनंदराम अंथरुणात होते, परंतु तिघेही भावना-विचारांच्या लाटांवर हेलावत होती. फक्त मोत्या गुरगुटी करून शांतेच्या खाटेजवळ झोपला होता.

० ० ०

आज शांतारामचा वाढदिवस. तो सकाळीच उठला. त्याने प्रार्थना केली. त्याच्या आईबापांचा फोटो नव्हता. त्याने त्यांचे स्मरण केले. त्याने बकुळीची फुले गोळा केली. तिच्या पानांत ओवून त्याने तुरे केले. त्याने माळा गुंफिल्या. आणि इकडे शांताही लवकर उठली होती. तिने सडा घातला. तिने फुले तोडून त्यांच्या

माळा करून दारांवर त्यांची तोरणे लाविली. ती आनंदी होती. आनंदरामही आनंदी होते.

आठ वाजता शांताराम आला.

'ये, शांताराम. तुझ्याबरोबर चहा घेण्यासाठी आम्ही थांबलो आहोत.'

शांताने चहा आणला. केळी आणली. सर्वांनी घेतली. कोणी फार बोलत नव्हते.

'आजोबा, हे घ्या तुरे. शांता, ह्या माळा.' त्याने आजोबांना नमस्कार केला. त्यांनी आशीर्वाद दिला.

'कशी टपोरी आहेत फुले! बकुळीच्या फुलांचा वास गोड असतो. फुलांत किती गंध, किती मध! जाईजुई, मोगरा, परिजातक, बकुल, इवलीशी फुले! परंतु कशी परिमलाने भरलेली असतात! अंगप्रत्यंगात वास असतो. नाही शांताराम?'

'संतांच्या प्रत्येक कृतीतून त्यांच्या श्वासोच्छ्वासातून असेच पावित्र्य नि निर्मळ प्रेम दरवळत असते.'

शांताने ते हार आपल्या अंबाड्याभोवती घातले. तिने छोटे हार, गजऱ्यांप्रमाणे हातांत घातले. जणू फुलांच्या बांगड्या. ती स्वयंपाकाला लागली. शांताराम नि आनंदराम बोलत दोघे बाहेर अंगणात गेले. बागेत एका विशाल आम्रवृक्षाखाली ते बसले.

'तुम्ही श्रीखंड करता ना?' शांतेने बाहेर येऊन मोठ्याने विचारले.

'हो, आलोच.' शांताराम म्हणाला.

दोघे घरात आले.

'मी विसरूनच गेलो. आता करतो श्रीखंड. कोठे आहे? दही विटांवर घालायचे का? का टांगून ठेवले होते? कोठे आहे सारे? साखर कशात आहे? केशर लावायचे ना? ते खलायला हवे. जरा झाकणीत तापवून द्या. म्हणजे पूड करून थोड्या दुधात खलून मग ते लावू. मला छान येते श्रीखंड करायला.'

'तुम्ही बोलतच आहात.'

'सामान द्या, म्हणजे करतो -'

'तुम्ही आता पाने घ्या. तुम्ही मध्ये बसा. एका बाजूला मी, एका बाजूला आजोबा.'

'श्रीखंड झाले वाटते? मी काय करू काम?'

'जेवायचे काम पुरुषांना साधते.'

'शांता, मी किती तरी वर्षे हातांनी करीत आहे.'

'तुम्हांला वाईट वाटले? आज तुमचा वाढदिवस. आज सारे हसून खेळून न्यायचे. मी तुमच्या पानाभोवती रांगोळी घालते हं...'

तिने त्याच्या पानाभोवती सुंदर रांगोळी घातली. आजोबा आले. पाने वाढण्यात आली. तिघे बरोबर बसली. लागेल ते चमचा-पळीने घेत होती.

'शांता, त्या मोत्याला आणखी एक पुरी दे-'

'आणि तुम्हांला?'

'तुमची दोघांची पोटे आधीच भरून आली आहेत.'

'आणि तुमचे?'

'मला खूप भूक लागली आहे. मीच म्हातारा सारखे खात आहे. तुम्ही श्रीखंड-पुरीशी खेळत आहात. खरे ना शांताराम?'

'खरे आहे. मला जेवताना फार खायला आवडत नाही. येता जाता खायला आवडते. एकदम ओ येईतो खाणे बरे का? शांता, आपण मधल्या वेळेला खाऊ!'

'नाही तर श्रीखंड-पुरी बरोबर घेऊन फिरायला जा. वनभोजन करा. शांताचे वडील ज्या शिलाखंडावर बसून समुद्राची गंभीर सुंदरता बघत बसत त्या जागी जा. तेथून सृष्टीचे सौंदर्य बघा. जीवनातील गोडी अनुभवा.'

'सायंकाळचे सायंकाळी. आता कोणाला आणखी हवे आहे का नाही?'

'कोणाला नको.'

'चला तर उठू.'

सारी उठली. शांताराम भोजनानंतरची आवराआवर करू लागला.

'राहू दे, मी करीन सारे. तुमचा वाढदिवस. तुम्ही बसा.'

'शांता, तुझा वाढदिवस कधी?'

'एव्हानापासून कशाला जाहिरात? योग्य वेळी सारे कळेल.'

'हे विडे का आम्हांला?'

'एक आजोबांना द्या. एक तुम्ही घ्या.'

'आणि तिसऱ्या माणसाला?'

'तिसरे माणूस वडील देवाघरी गेल्यापासून खात नाही.'

शांतारामने अधिक विचारले नाही. त्याने आजोबांना विडा नेऊन दिला. शांतेने सारे आवरले. नंतर चटई घालून ती जरा पडली. सकाळपासून काम करून ती दमली होती. थोड्या वेळाने आजोबांचाही डोळा लागला. एकटा शांताराम जागा होता. अंगणात गेला. बागेत हिंडला. तो मोत्याजवळ खेळला. त्याला झोप येत नव्हती. बांबूच्या झिलप्या तेथे होत्या. तो टोपली विणू लागला. त्याला ते जमेना. नंतर तो साधी चटई करू लागला. एकात एक पात्या गुंतवू लागला. तो का आसन तयार करीत होता? तो तोंडाने कविता गुणगुणू लागला–

"तू जीव, तू हृदय, तू मजला विसावा"

इतक्यात समोर त्याला शांता दिसली.

'आम्हांला एक बुरुड पुरे. दोन कशाला?' ती हसत म्हणाली.

'मला काही केल्या जमत नाही.'

'याचा पंखा होईल. आजोबा देतील करून. छानदार विंझणा. तुम्ही का कवी आहात?'

'कशावरून?'

'मघा कविता म्हणत होतात ती का तुमची?'

'उत्तररामचरित नाटक आहे. त्यातील तो चरण आहे. राम सीतेला असे म्हणत असे आणि त्यानेच तिचा त्याग केला. हे नाटक फार सुंदर आहे.'

'तुम्ही माझ्याबरोबर ते वाचाल?'

'मी मागवून घेईन ते पुस्तक. मग आपण वाचू.'

'आज संध्याकाळी फिरायला जायचे आपण?'

'तू येशील? आजोबा येतील?'

'आजोबा दमतील. ती जागाही जायला जरा कठीण आहे. आपणच दोघे जाऊ. फराळाचे नेऊ. बाबा तेथे बसत. खाली खोल समुद्र आहे. तेथून खाली उडी टाकावी असे वाटते. लाटा आसपास आदळत असतात. शेकडो तुषार उडत असतात.'

'आपण जाऊ–'

सायंकाळची वेळ होत आली.

'आजोबा, आम्ही फिरायला जाऊ?'

'जा, पोटभर फिरा, पोटभर बोला.'

'इश्श! बोलायचे काय?'

'ते तुम्हांला माहीत.'

ती दोघे फिरायला गेली. बरोबर मोत्याही निघाला आणि आजोबा एकटेच घरात होते. त्यांनी अंगणातच येरझारा घातल्या. काय चालले होते त्यांच्या मनांत? 'शांता नि शांताराम आज प्रथमच बरोबर फिरायला गेली होती. दोघेच होती. एकमेकांना ती विचारतील का? त्यांना धैर्य होईल का? मुकी जातील नि मुकी येतील. देवा, दोघांची हृदये एकत्र आण; दोघांची जीवने एकत्र आण. एवढीच माझी इच्छा. माझी शक्ती कमी होत आहे. माझे डोळे मिटण्यापूर्वी शांताला आधार मिळो. ती सुखी होवो.' हे विचार त्यांच्या मनात येत होते. त्याला स्वतःचे सारे जीवन आठवले. शांताने त्याला जे समाधान दिले, जे निरपेक्ष प्रेम दिले, तसे त्याला कोणीही दिले

नव्हते. तो उंचबळला होता. गहिवरला होता. थोड्या वेळाने तो उठला. त्याने आज घरात दिवे लावले. दिव्याला नमस्कार करून तो म्हणाला, 'माझ्या शांताच्या जीवनात प्रेमाचा नंदादीप लागो.'

आज बाहेर चांदणे होते. समुद्राला भरती आली होती. लाटांचा आवाज कानांवर येत होता. शांता नि शांताराम यांच्या हृदयसिंधूलाही भरती आली होती का? तेथे पौर्णिमा, प्रेमाची कोजागिरी फुलली होती का? आजोबा आशा करीत होते. अजून ती आली नाहीत. ती बहुधा प्रेमात रंगली. एकमेकांस हृदय देत असतील. इतक्यात त्याला बोलणी ऐकू आली आणि मोत्या बातमी द्यायला धावत पुढे आला.

'मोत्या, आनंदाची, प्रेमाची बातमी आणलीस, होय ना?'

आणि तिकडून त्या टाळ्या आल्या. शीळ आली आणि ही शीळ? तिला नाही जमली. आनंदराम लगबगा उठला. त्याने सुंदर गुलाब तोडले. शांता नि शांताराम आले.

'थांबा, दारातच -' आनंदराम म्हणाला.

त्याने तबक आणले. त्यात निरांजन होते, अक्षता होत्या, पिंजर होती.

'थांबा, तुम्हांला इतका उशीर लागला. मी तेव्हाच जाणले. खरे ना? हसू नका.'

आनंदरामाने त्यांना ओवाळले. त्यांच्या कपाळाला त्याने ओली पिंजर लावली. त्याने दोघांना दोन गुलाब दिले. दोघे आजोबांच्या पाया पडली.

'सुखी व्हा. कृतार्थ व्हा -' आजोबा कंपित आवाजात बोलले.

कोणाला जेवायचे नव्हतेच. सर्वांना एक प्रकारची कोमल कृतार्थता वाटत होती.

'शांता, शांताराम, लौकिक विधीने तुमचा विवाह व्हायचा असेल तेव्हा होईल. मी आज तुमचा विवाह लाविला.

जणू तुमची वरात घरी आली. माझे दिवस फार राहिले नाहीत. विधिपुरस्सर लग्नापर्यंत मी टिकेन की नाही, प्रभूला माहीत. तुम्ही एकमेकांस अंतर देऊ नका. परस्परांस प्रेमाने संभाळा. या जगात निर्मळ, निर्मत्सर, निरपेक्ष प्रेम ही एक सत्यता आहे.'

'आजोबा, मी घरी जातो. शांता, येतो हं -'

'आज अंधार नाही. प्रकाश आहे. परंतु पायाखाली बघून जा जपून जा -' शांता त्याला म्हणाली.

❖

७

'माझी कादंबरी मी पाठविली आहे. प्रकाशकांनी वाचायला मागितली आहे. बघावे त्यांना पसंत पडते का! एक हजार रुपये मिळायला हवेत. म्हणजे आपल्याला पुढे संसार मांडता येईल. खरे ना शांता? माझ्या पहिल्या कादंबरीच्या पैशातून मी तुला पातळे आणीन. तुला सोन्याच्या बांगड्या करीन. किती तरी मनोरथ मनात आहेत. परंतु सारे प्रकाशकांच्या इच्छेवर अवलंबून.'

'शांताराम, माझे हात आहेतच काम करणारे. तू चिंता करू नकोस. तू नवीन लेखक. एकदम पैसे मिळतातच असे नाही. आरंभी फुकट सुध्दा छापायला कोणी तयार नसतात. पैसे मिळोत, न मिळोत; पुस्तक प्रसिध्द तरी होऊ दे. एकदा तुझे नाव सर्वत्र झाले, तुझी कीर्ती वाढली म्हणजे प्रकाशक आपण होऊन तुझ्याकडे येतील.'

'पुस्तकाचे पैसे आल्याशिवाय आपण विवाहबद्ध व्हायचे नाही. माझ्या पैशांनी मी संसार मांडीन. माझ्या पैशांनी तुला नटवीन, सुखवीन.'

'आणि मी मिळवले तर ते तुझे का नाहीत?'

'शांता, मी तुला देण्यात एक प्रकारची कृतार्थता आहे. माझी भावना ओळख. माझी कादंबरी माझ्या आशा पूर्ण करील.'

'अलिकडे आजोबा जरा खिन्न दिसतात, नाही? ते बोलतातही कमी. त्यांच्या मनाला कसली तरी चिंता आहे. काय आहे त्यांचे पूर्वजीवन? मी त्यांना कधीही विचारले नाही. ते आपण होऊन एक दिवस सांगतील, काहीतरी गूढ आहे त्यांच्या जीवनात. थोरांचे जीवन सागरासारखे असते.'

'शांता, प्रत्येक जीवन गूढच आहे. आपले स्वरूप आपल्याला सुध्दा नीट समजत नाही. अनंत सृष्टीतून आपण उत्क्रांत होत आलो. अनेक संस्कार आपल्या जीवनावर आहेत. आपल्या जीवनाला शेकडो कप्पे आहेत. कधी हा उघडतो, कधी तो. मौज आहे.'

'आपण दोघांनी लवकर विवाहबध्द व्हावे असे आजोबांना वाटत आहे. आपला अंत जवळ आला आहे असे त्यांना अलीकडे फार वाटते.

'माझी कादंबरी प्रसिध्द होऊ दे. दोन-चार महिने तर अवकाश.' इतक्यात आजोबा आले. ते नेहमीप्रमाणे आज हासले नाहीत. नि आरामखुर्चीत पडले. त्यांनी क्षणभर दोघांकडे पाहिले नि त्यांनी डोळे मिटून घेतले. त्या दोघांसाठी ते प्रार्थना का करीत होते?

'आजोबा, बरे नाही का वाटत?' जवळ जाऊन शांताने विचारले.

'थकून गेल्यासारखे का वाटते?' शांतारामने विचारले.

'जरा ग्लानी आली आहे. बाकी सर्व ठीक आहे. शांताराम या शांताला आता तू. मी तुमचे लग्न लावलेच आहे. गावातील लोकांना तुमच्या विवाहनिश्चयाची वार्ता समजली आहे. सर्वांनाच फार आनंद झाला आहे. आम्ही सारा गाव मिळून हा लग्नसमारंभ साजरा करू असे लोक म्हणत आहेत. तुम्हा दोघांबद्दल सर्वांना

आदर, सर्वांना प्रेम. असेच जगाला हवेहवेसे व्हा;'

'आजोबा, मी थोडी लापशी करून देऊ?'

'दे. मी काही घेतले म्हणजे तुला बरे वाटेल.'

'आणि ती घेऊन तुम्हांला नाही का बरे वाटणार?'

'लापशी खाऊन बरे वाटण्याचे माझे दिवस गेले. या देहाला आता कितीही चांगल्या रीतीने पोसले तरी तो राहणार का आहे? आतील जीवनझरे सुकत आल्यावर बाहेरचे जलसिंचन कितीसे उपयोगी पडणार?'

'आजोबा, आमचे लग्न लागल्यावर आपण सारी कोठे तरी हवापालट करायला जाऊ -'

'अरे, या आनंदगावाहून सुंदर असा दुसरा गाव कोणता आणायचा? आता मी एकदम हवापालट करीन. या लोकातून परलोकात जाईन.'

शांताने लापशी करून आणिली. आजोबांनी ती घेतली. शांताराम घरी गेला. आता दिवे लागले. आजोबा अंथरुणावर पडले. शांता जवळ होती. तिला काय करावे, काय बोलावे समजेना.

'तू जेव जा. पोटभर जेव. म्हणजे माझेही पोट भरेल. जा. तू भुकेली असशील. मला आता बरे वाटते. काल रात्री झोप नाही आली. आज येईल असे वाटते. जा, जेवून घे.'

शांता उठून गेली. तिने चार घास खाल्ले. मोत्याला तिने भाकर दिली. झाकाझाक करून ती आजोबांजवळ आली, ती त्यांचे पाय चेपीत बसली.

'तुमच्या पायांना तेल चोळू? आग होते का?'

'आता सारे शांत होत आहे. आग नाही, काही नाही. माझ्या जीवनात आनंद आहे. आग होती ती शांत झाली. शल्ये निघाली. व्रण बुजले. साऱ्या जखमा बऱ्या झाल्या. मी सुखी आहे. तू अमृतरसायन दिलेस. शांते, तू झोप. मला काही लागले सवरले

तर मी तुला हाक मारीन. उगीच तीनतीनदा खाली येऊन बघू नको. माझी मग झोप मोडते. तुमच्या या फाजील काळजीमुळे मी आजारी नसलो तरी आजारी होईन. खरे की नाही? जा बेटा; झोप. निश्चिंत अस. देव सारे चांगले करील.'

ती वर गेली. दिवा मालवून ती अंथरुणावर पडली. विचार करीत झोपली. आणि आता रात्रीचे बारा वाजले. आनंदराम उठला. त्याने कपाट उघडले. त्याने आपले सारे जुने कपडे काढले. अंगांवरचे दूर करून ते स्वतःचे कपडे घातले. कमरेला पैशांचा कसा बांधला. फुटकळ पैसे वर होतेच. दहा रुपयांच्या त्या पुडीचे चुंबन घेतले. त्याला बळिराम, श्रीपत, हरी, धनू, तारा नि खानावळीणबाई सर्वांची प्रेमळ स्मृती झाली. परंतु त्याला भावनांत रमायला वेळ नव्हता. त्याला झटपट निघायचे होते. शांताच्या वडिलांचे कपडे त्याने घडी करून तेथे ठेवले. तो टेबलाजवळ गेला. त्याने पुढीलप्रमाणे पत्र लिहून ठेविले;

"चि. प्रिय शांता,

सप्रेम आशीर्वाद.

मी महत्त्वाच्या कामासाठी जात आहे. माझा शोध करू नका. चिंता करू नका. आज गुरुवार; मी रविवारी परत येईन. रविवारी माझी वाट पाहा. रडू नको. मी तुला सोडून जात नाही. माझ्या शब्दांवर विश्वास ठेव. मी तुला का फसवीन? मला जाणे भाग आहे आणि एकट्याने जाणे भाग आहे. म्हणून तुला आधी न सांगता असा गुपचूप निघून जात आहे. रागावू नको. शांत राहा. तुझे नावच शांता आणि तो, त्याचे नाही शांताराम? नावाप्रमाणे वागा.

तुझे

आजोबा"

तो उठला. त्याने ती आपली उंच काठी हातात घेतली. आणि

हलक्या हाताने दार उघडून तो निघून गेला!

शांता आज गाढ झोपली होती. आता पहाट झाली. तिकडे दूर कोंबडा आरवला. मोत्या जागा झाला. रोज तो जागा झाला तरी पुन्हा झोपत असे. परंतु आज एकदम तो खाली गेला. तेथे बिछाना रिकामा होता. त्यावर घडी केलेले ते कपडे होते. कोठे आहेत आनंदराम? कोठे आहे मोत्याचा प्राणदाता? मोत्या बाहेर गेला. त्याने इकडे तिकडे पाहिले. तो माडीवर गेला. तो शांताचे पांघरुण ओढू लागला. तिला जाग आली. 'तुला का मोत्या पांघरूण हवे आहे! फार थंडी लागते? असे काय करतोस? काय हवे तुला?' मोत्या पुन्हा खाली गेला. तो विचित्र आवाज काढू लागला. शांता चमकली. तिच्या मनांत लख्ख प्रकाश पडला. ती लगाबगा खाली आली. आनंदरामांविषयी तिला निराळेच वाटले. परंतु खाली येऊन बघते तो ते अंथरूणातच नाहीत आणि कपडे तेथे ठेवलेले. तिने उघडे कपाट पाहिले. तेथे काही नव्हते. कोपऱ्यात काठी नव्हती. ती शून्य मनाने अंगणात आली. 'आजोबा, आजोबा' तिने हाका मारल्या. ओ कोण देणार? दार तसेच उघडे टाकून ती सर्वत्र शोधू लागली. पहाटेच्या अंधारातून ती त्या शिलाखंडाकडे गेली. आजोबा कदाचित् तेथे जाऊन प्रभातसौंदर्य पाहत असतील असे तिला वाटले. परंतु ती निराश झाली. 'ते दूर गेले. स्वतःचे सारे घेऊन गेले. ते जवळपास नाहीत. कोठे गेले? कोठे त्यांना शोधू तरी? पुन्हा का त्यांनी परिभ्रमण सुरू केले? पायी यात्रा सुरू केली? मला न सांगता शेवटी ते गेले. शांतारामकडे जावे, त्याला उठवावे, शोधार्थ पाठवावे.' असे तिला वाटले. परंतु ती गेली नाही. ती घरी येऊन अंगणात हताश होऊन बसली. मोत्या केविलवाणे भुंकत होता. जणू आनंदरामांना तो हाका मारीत होता.

आता चांगलेच उजाडले, तरी शांता तेथेच जमिनीवर बसून होती. तिला सारे शून्य वाटू लागले. घरात शिरायला तिला धीर होईना. डोळ्यांतून अश्रू येत होते. ती अगतिक दिसत होती. दीन

दिसत होती. तिकडे शांतारामाने स्नान वगैरे केले. आजोबांना बरे नव्हते, म्हणून लवकरच तो शांताकडे यावयास निघाला. जवळ आल्यावर त्याने टाळ्या वाजविल्या, शीळ घातली. परंतु त्याला प्रेमाचे प्रत्युत्तर मिळाले नाही. तो जरा थांबला. शांता सामोरी येईल असे त्याला वाटले. परंतु काही नाही. त्याने पुन्हा टाळ्या वाजविल्या. मोत्या विचित्र भुंकत धावत गेला.

'आज तू एकटाच सामोरा आलास? शांता का अजून झोपली आहे?' असे म्हणत शांताराम आला. त्याला पाहून शांतेला जोराचा हुंदका आला.

'शांता, आजोबा बरे आहेत ना? काय झाले?'

'सर्वनाश झाला -'

'ते का गेले? मी वैद्यांना बोलावू!'

'ते आपल्याला सोडून गेले. कोठे तरी दूर रात्री निघून गेले. मला न सांगता सवरता ते गेले. मी दुर्दैवीच आहे. माझ्याजवळ कोणी टिकणार नाही. शांताराम -'

'त्यांनी काही चिठ्ठी, पत्र लिहून नाही का ठेवले?'

'मी पाहिले नाही.'

'चल, आपण पाहू. काही तरी त्यांनी लिहून ठेवलेच असेल. तसे ते जाणार नाहीत. चल आत -'

'तू जाऊन बघ. माझ्याच्याने येववत नाही.'

शांताराम आत गेला. त्याने अंथरुणावर, अंथरुणाच्या खाली सर्वत्र पाहिले. नंतर तो टेबलाजवळ गेला. तेथे त्याला ते घडी करून ठेवलेले पत्र आढळले. ते घेऊन तो धावतच बाहेर आला.

'शांता-शांता- हे बघ पत्र! वाच काय आहे ते.'

तिने ते पत्र हातात घेतले. उलगडून तिने ते पत्र वाचले. तिने शांतारामाच्या हातात दिले. त्यानेही वाचले.

'रविवारी परत येईन असे म्हणत आहेत. तोवर आपण वाट पाहू.'

'शांताराम, आताच आपण त्यांच्या शोधार्थ जाऊ. ते काही फार लांब नसतील गेले. आपण पळत गेलो तर त्यांना पकडू. त्यांना भराभर चालवते तरी कोठे? रविवारीपर्यंत वाट पाहणे बरे नाही. वाटेत थकून ते कोठे पडले तर? चल, आपण जाऊ, येतोस?'

'मी एकटाच जातो, शोध करून येतो. तू नको येऊस. आता ऊन होईल. तूही आजारी होतीस. मीच पळत जातो. ऊन मला बाधत नाही. पळण्याची मला सवयच आहे...'

'तू एकटा जाणार?'

'भीती कसची?'

'तू आणखी कोठे जाऊ नको म्हणजे झाले. तुम्ही दोघे या गांवात नवखे आलात. माझ्या जीवनाच्या राजधानीचे तुम्ही राजे झालात. आता का ती ओस पाडून जाणार?'

'मी तुला सोडून जाणार नाही. वेडे वेडे मनात आणू नकोस. मी जातो. आजोबांना उचलून आणतो...'

आणि तो निघाला. पळत निघाला. शांता ते पत्र हातात घेऊन बसली. तिने ते पत्र पुन्हा वाचले. ती घरात आली. तिने तोंड धुतले. तिने केस विंचरले. स्नान करून ती शांतपणे खुर्चीत बसली. तिच्या वडिलांचे ते कपडे समोर होते. तिने ते हृदयाशी धरले. ती उठली. आनंदरामांची अर्धवट राहिलेली बांबूची टोपली ती विणीत बसली. मोत्या जवळ बसला होता.

'मोत्या, तू मुका प्राणी, तुला भूक लागली असेल. देते हं तुला बिस्किटं -'

असे म्हणून तिने त्याला बिस्किटे दिली. मोत्या खाईना. तोही दुःखी होता. त्यालाही वातावरणाचा अर्थ समजत होता. शांता चमकली. तिने मोत्याला उचलून जवळ घेतले. तो तिला चिकटला.

'मोत्या, रागावू नको, मी तुला माणसाहून कमी लेखले. तुझा प्राणदाता गेला तरी बिस्किटे हवी असतील असे मी मनात म्हटले.

चुकले हो. आता आजोबा आले म्हणजे पोटभर जेवू हं, बैस.'

ती टोपली विणीत बसली.

'तू जीव - तू हृदय - तू मजला विसावा...'

हे चरण ती गुणगुणत होती. तो चरण ती शांतारामाला उद्देशून म्हणत होती की आनंदरामांना? की तो चरण तिला आवडे म्हणून अहेतुक रीतीने म्हणत होती? प्रभूला माहीत.

तिसरे प्रहरी घामाघूम झालेला शांताराम एकटाच घरी परत आला. तो कोकंबासारखा लाल दिसत होता. धुळीने भरला होता. जाताना पायात घालायचेही तो विसरला होता.

'शांता, आजोबा आगगाडीत बसून दूर कोठे तरी गेले. मी पळत पळत जात होतो. मला एक बैलगाडी भेटली. मी विचारले, 'कोणी म्हातारे मनुष्य भेटले का?' गाडीवान म्हणाला, 'भेटला; हातात काठी होती. उंच होता म्हातारा. जरा वाकलेला. या बाजूने गेला. मी पुढे गेलो. तो एक गाव लागला. तेथील मंडळीस विचारले. ते म्हणाले, 'घोड्याचा टांगा करून एक म्हातारा गेला खरा. त्याला स्टेशन गाठायचे होते. बाराची गाडी पकडायची होती. त्यांना मिळाली असेल. आता कोठे शोधता त्यांना? जा माघारे.' मी शेवटी परत आलो. तू रडू नकोस. आपण त्यांच्यावर विश्वास ठेवू. रविवारी ते येतील. तू नि मी रविवारी सकाळी बाहेर पडू. आपण त्यांना सामोरे जाऊ. ते रस्त्यात भेटतील. त्यांनी पुन्हा लिहिले आहे की, विश्वास ठेवा, मी सोडून जात नाही. आपण का बरे अविश्वास दाखवावा?'

'अविश्वास नाही रे. थकले नि कुठे पडले तर? म्हणून चिंता वाटते.'

'परंतु त्यांनी टांगा केला आहे. आगगाडीने ते जाणार आहेत. ते स्वतःची काळजी घेतच आहेत, तूही स्वतःची काळजी घे. नाही तर ते येतील नि तू आजारी असायचीस. ते मला रागे भरतील. खरे ना? तू काही खाल्लेस का?'

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

'कसे काही खाऊ?'

'कसे खायचे ते चल शिकवतो. आपण जेवू.'

' ते मोत्यासुध्दा बिस्किट खाईना.'

'आपण खाल्ले म्हणजे तो खाईल. सारे ठीक आहे असे त्याला वाटेल. चल. मी करू ना सुरूवात काही खायला?'

शेवटी शांता घरात गेली. चूल पेटवून तिने स्वयंपाक केला. शांताराम तेथेच जेवला. मोत्यानेही भाकरीचा तुकडा खाल्ला.

'शांताराम, तुला पळून खूप ऊन लागले असेल? पायांतही नव्हते.'

'भरभर पळता यावे म्हणून मी पायांत घातले नाही.'

'पाय भाजले असतील. तू थकला आहेस. तू जरा पड. तुझ्या पायांना तेल चोळू?'

'नको. मी आता घरी जातो. आज प्रकाशकांडून पत्र येणार होते. आता मी परत येणार नाही. उद्या सकाळी येईन. रात्री शांतपणे झोप. आजोबा परत येतील. आपले हात एकत्र दिल्याशिवाय ते कसे कोठे जातील?'

'त्यांनी तर त्याच दिवशी तुझ्या हातात माझे हात दिले. ते नेहमी म्हणतात की, 'तुमचे लौकिक लग्न लागायचे असेल तेव्हा लागेल. मी तुमचे लग्न लावून ठेवले आहे.' असो. तू जा. विश्रांती घे. सकाळी ये -'

रात्री शांता किती तरी वेळ जागी होती. कोणी तरी आले असा तिला भास होई. ती दार उघडी. अंगणात येऊन ती उभी राही; 'आजोबा -' म्हणून ती हाक मारी. परंतु कोणी नसे. तिकडे लाटांचे संगीत चालले होते. आकाशात तारे रोजच्याप्रमाणे चमचम करीत होते. फक्त शांता अशान्त होती. परंतु तिलाही शेवटी झोप लागली.

सकाळी शांताराम आला तो दार आपले उघडे! शांता झोपलेली. त्याने चूल पेटवून चहा ठेवला. शांता उठून खाली आली तो चहा तयार.

'दार उघडे होते शांता.'

'आजोबा आले नि त्यांनी हाका मारल्या आणि मला झोप लागलेली असली तर? असे होऊ नये म्हणून दार लावलेच नाही. घरात चोरायला तरी आहे काय? चोर इकडे येत नाहीत कधी.'

'तुला पहाटे पहाटे झोप लागली; खरे ना?'

'म्हणून तर आता उठले. तुझ्या प्रकाशकांचे पत्र आले का?'

'आले. त्यांना कादंबरी फार आवडली आहे. मात्र पैशाविषयी ते मागून कळविणार आहेत.'

'पैशासाठी तू अडून बसू नकोस.'

'पाहू या, त्यांचे काय उत्तर येते ते.'

'तू आता घरी जा. मी शांत आहे.'

आता मी दोन दिवस इकडे येणार नाही. आजोबा होते तो ठीक होते. खरे ना? मी रविवारी उजाडता येईन. आपण दोघे जाऊ. आजोबा वाटेतच भेटतील. जेवत जा. प्रकृतीस जप. आजोबांसाठी आणि –'

'आणि तुझ्यासाठी.'

शांताराम गेला. आजोबा गाव सोडून गेले. ही वार्ता गावभर पसरली. शशी फुलांची परडी घेऊन शांताकडे आली.

'आजोबा कधी येणार?' तिने विचारले.

'रविवारी.'

'म्हणजे परवा, होय ना?' आईने त्यांना बोलावले आहे.' असे सांगून शशी गेली.

आणखी किती तरी लहानमोठी मुले चौकशी करून गेली. मोठी माणसे शांतारामकडे जाऊन विचारीत होती. आजोबा गेले तरी येणार आहेत, यामुळे सर्वांना आनंद झाला. रविवारी साऱ्या गावाने त्यांना सामोरे जायचे ठरविले. सारे लोक रविवारची वाट पाहात होते.

८

आगगाडीतून एका साधारण मोठ्या स्टेशनवर आजोबा उतरले. ते एका बऱ्यापैकी भोजनालयात गेले. त्यांनी तेथे एक स्वतंत्र खोली घेतली. जेवणखाण झाल्यावर ते बराच वेळ काही लिहीत बसले. त्यांनी लिहिलेले सारे पुन्हा काळजीपूर्वक वाचून, नंतर कपडे घालून ते लिहिलेले खिशात घालून बाहेर पडले. ते निरनिराळी घरे पहात चालले. कोणाचे घर त्यांना पाहिजे होते?'

'या गांवात हुशार वकील कोण आहे?'

त्यांनी एकाला विचारले.

'येथले नामांकित वकील म्हणजे दादासाहेब. आज ते घरीच आहेत. तुम्ही कोठले? महत्त्वाचा खटला आहे की काय? पुढे गेल्यावर डाव्या हाताला वळा. मोठी हवेली लागेल. तेच त्यांचे घर. घरावर पाटी आहेच. तुम्हांला वाचता येते ना?'

'येते थोडे थोडे.'

'मोठ्या अक्षरांची पाटी आहे. परंतु त्यांची फी जबर असते. सांभाळा, नाही तर दुसऱ्या वकिलाकडे जा. ते अप्पासाहेब आहेत. त्यांना काम कधी मिळत नाही. तसे आहेत ते हुषार, परंतु नीट बोलणे त्यांना जमत नाही.'

'मला तेच बरे. कोठे आहे त्यांचे घर?'

'असे सरळ जा, मग उजवीकडे वळा. कोणालाही तेथे विचारा. अप्पासाहेबांचे घर कोणीही दाखवील. पोरे त्यांची फार टिंगल करतात. कोणी टवाळ लोक पक्षकारांचे सोंग घेऊन त्यांच्याकडे जातात आणि शेवटी सांगतात की, 'आम्हांला खटला करावयाचा नाही. गंमत म्हणून आलो. जा. ते तुमचे काम करतील...'

आजोबा त्या अप्पासाहेब वकिलांचे घर विचारीत चालले. एकदाचे ते घर सापडले. आनंदराम वकीलसाहेबांच्या बैठकीत जाऊन बसले.

'येतो हां, बसा -' असे सांगून अप्पासाहेब गेले.

आनंदराम तेथे वाट बसले. थोड्या वेळाने विडा चघळत नाक पुशीत अप्पासाहेब आले.

'बोला, काय आहे काम?'

'काम तसे फार नाही. मी एक मृत्युपत्र लिहून आणले आहे. ते नीट लिहिलेले आहे का तेवढे पहा. कायद्याच्या दृष्टीने काही कमीजास्त झाले असेल तर सांगा. काही गाळायला हवे असले तरी सांगा, घालायला हवे असले तरी सांगा, बघा वाचून

'कोणाचे मृत्यूपत्र?'

'माझे स्वतःचे.'

'अस्से!'

वकीलसाहेब डोळ्यांवरची आरशी कपाळावर चढवून डोळे बारीक करून वाचू लागले. त्यांच्या तोंडावर आश्चर्य फुटले. ते आनंदरामाकडे बघत, आणि पुन्हा वाचू लागत.

'हे आनंदराम कोण?'

'अहो मी. माझे हे मृत्यूपत्र.'

'आणि तुमची एवढी इस्टेट? तुम्ही कुठले? ते एक कोट्याधीश आनंदराम ऐकून माहीत आहेत. त्यांना मूलबाळ

नव्हते. ते परागंदा आहेत. कोणी म्हणतात त्यांनी आत्महत्या केली, कोणी म्हणतात की, ते अमेरिकेत आहेत. श्रीमंतांच्या विचित्र लीला आणि तुम्हीही त्याच नावाचे आणि इतकी तुमची इस्टेट! मग पायी का आलात? मोटार नाही का? असे का दरिद्यासारखे? तुम्ही वेडे आहात की काय? अहो, खरेच का तुमची एवढी इस्टेट आहे?'

'तुम्ही फक्त हे मृत्युपत्र बरोबर आहे की नाही तेवढे पाहा. इतर उठाठेवी तुम्हांला कशाला?'

'खरे आहे तुमचे म्हणणे. हे मृत्युपत्र वकिलाच्या बापालासुध्दा येणार नाही अशा कायदेबाजपणाने लिहिलेले आहे. त्यात कानामात्रेचासुध्दा फरक नको आहे. तुम्हीच लिहिलेत वाटते? कायद्याचे ज्ञान चांगलेच दिसते!'

'या मृत्युपत्रावर तुमचीही सही करा. माझ्यादेखत हे मृत्युपत्र केले गेले असे म्हणा.'

'परंतु तुम्ही कोण?'

'मी आनंदराम, हे मृत्युपत्र करणारा.'

'आणि मी सही करू? पन्नास रुपये द्यावे लागतील.'

'मी शंभर आणले आहेत.'

'आहात खरे कोट्याधीश! करू सही?'

'करा. तुम्हांला धोका नाही.'

'तुम्ही वेडे ठरलात मेल्यावर, तर मी जिवंतपणी वेडा ठरवला जाईन.'

'कोण कधी मरणार त्याचा काय नेम? मी आधी मरतो की तुम्ही मरता, कोण सांगणार?'

'अहो, मला कशाला मारता? मृत्युपत्र करून ठेवायला मला अजून इस्टेट मिळवायची आहे. मी एवढा कायदेपंडीत; परंतु माझ्याकडे कोणी काम घेऊन येत नाही. तुम्ही लवकर मेलात नाही तर काम घेऊन येत जा.'

साखळी योजना

आनंदरामाने शंभर रुपये काढून वकिलांच्या समोर ठेवले. वकील प्रसन्न झाले.

'मृत्युपत्र अगदी निर्दोष आहे. ब्रह्मदेवासही त्यात चूक काढता येणार नाही. मी तपासून सही केली आहे. निर्धास्त असा.'

'येतो नमस्कार.'

'येत जा. कोट्याधीश असूनही तुम्ही किती साधे!'

आनंदराम निघून गेला. वकीलसाहेब त्याच्याकडे पाहातच राहिले.

'हा खरोखरच कुबेर आहे की कोणी वेडपट आहे? मृत्युपत्र कसे छान लिहून होते! मलाही असे साधले नसते. कोणी असो; शंभर रुपये तर मिळाले. आता महिनाभर काम नाही मिळाले तरी गाडी चालेल. आज कोणाचे तोंड सकाळीच पाहिले होते, आठवत नाही; परंतु शुभशकुन आहे खरा.'

वकीलसाहेब खुशीत होते. तिकडे आनंदराम आपल्या बिऱ्हाडी गेले. त्यांनी पुष्कळ पत्रे लिहिली. एक पत्र तर फारच मोठे त्यांनी लिहिले. शेवटी ते थकले. रात्री लवकरच ते अंथरुणावर पडले. त्यांना शांत झोप लागली.

आज शनिवार होता. आगगाडीत ते बसले आणि त्याच स्टेशनवर उतरले, जेथे चढले होते. रात्रीची वेळ होती. त्या स्टेशनात एकच टांगा होता. तो त्यांनी केला. टांगा निघाला. आनंदगांव आता जवळ होता. ते त्या टांग्यातून उतरले. टांगेवाल्यास त्यांनी पैसे दिले. तो निघून गेला. आनंदराम एकटेच चालू लागले. झुंजूमुंजू झाले होते. दिशा आता फाकल्या. पाखरांची किलबिल सुरू झाली. सृष्टीत चैतन्य संचरत होते. आनंदराम 'जागिये रघुनाथ कुंवर' ही तुलसीदासांची भूपाळी म्हणत शांतपणे जात होते.

आज रविवार. शांताराम लवकर उठून शांताकडे आला. ती उठलेलीच होती. दोघे निघाली. आशेने जात होती.

'भेटतील का ते?' - तिने विचारले.

'ते फसवणार नाहीत.' तो म्हणाला.

'नाही नाही ते मनात येते.'

'वैरी न चिंती ते मन चिंती -'

आणि तिकडून आवाज येऊ लागले. लेजीमचा आवाज, इतर वाद्यांचे आवाज. सारे गांवकरी सामोरे येत होते. मुलाच्या रांगा होत्या. हातात फुलांचे हार होते, गुच्छ होते. एक सजवलेला रथ होता.

'शांता, सारा गाव येत आहे-'

'आपण भराभर जाऊ चल; पळत जाऊ; सारा गाव आला म्हणजे आजोबांना भेटता येणार नाही. चल भरभर. मी पळते...'

शांता पळू लागली. शांतारामनेही दौड सुरू केली. आणि तिकडून 'जागिये रघुनाथ कुंवर' म्हणत आनंदराम येत होते. ते तन्मय झाले होते. त्यांचे डोळे मिटलेले होते. पाय चालत होते.

'आजोबा, माझे आजोबा -' शांतेने मिठी मारून म्हटले. आनंदरामांनी नयनकमले उघडली. किती प्रेम त्या डोळ्यांत होते!

'कशाला आलात?' - त्यांनी विचारले.

'तुम्हाला घ्यायला. चला -'

'मी लिहून ठेवले होते की रविवारी येईन. आज रविवार. शब्दांप्रमाणे आलो. तुम्हांला का विश्वास नव्हता?'

'विश्वास होता म्हणून तर आलो' - शांता म्हणाली.

'तुम्ही वाटेत भेटाल ही खात्री होती.' शांताराम म्हणाला.

'आणि हे आवाज कसले? तुमचे लग्न लागले की काय?'

'तुम्ही नसताना कसे लावू?'

'मी तर कधीच लावून टाकले आहे. कसले आवाज? काय आहे प्रकार?'

'सारा गाव तुम्हांला सामोरा येत आहे. तुम्ही गेलात असे कळल्यापासून सारे दुःखी होते. परंतु येणार कळल्यामुळे सारे सुखावले. लेजिम, ढोल, सनई, सारी वाद्ये आहेत आणि फुलांनी

सजवलेला सुंदर रथ आहे. रथात शशिकला आहे. ती तुम्हाला रथात बसवील. तिच्या वडिलांनीच रथ सजविला आहे. आजोबा, नाही म्हणू नका. आजचा दिवस साऱ्यांचं ऐका...'

आणि गावकरी आले. मुले आली. 'आजोबा आले -' एकच जयघोष झाला, मुले धावली नि आजोबांना झळंबली. ती छोटी शशी. आज ती सजून आली होती.

'आजोबा, रथात बसा. तुमच्याजवळ मी बसेन -' ती प्रेमाने म्हणाली.

आजोबा रथात बसले. जवळ फुलमाळीण शशी बसली. रथामागून शांता, शांताराम चालत होती. सारा गाव जात होता. अशी मिरवणूक चालली. आता गाव आला. आजोबा उतरले. शशी उतरली. तिच्या घरात थोडा वेळ आनंदराम गेले. तिच्या आईने दूध नि केळी दिली. लोक घरोघर गेले. आजोबा, शांता, शांताराम टेकडीवरच्या घरी आली. आनंदराम आरामखुर्चीत पडून राहिले. ते काही बोलले नाहीत.

दुपारची जेवणे झाली. आजोबांनी चार घास खाल्ले आणि ते पडून राहिले. शांताराम घरी गेला. शांता भरतकाम करीत होती. तिसरे प्रहरी तिने त्यांना चहा दिला.

'शांता, रागावलीस नाही ना?'

'मला न सांगता का गेलात?'

'तू जाऊ देतीस ना. जाणे तर प्राप्त होते. परंतु आलो ना? रागावू नकोस. आता कधी कोठे जाणार नाही. देवाचे बोलावणे येईपर्यंत आता येथे राहीन. तुझ्याजवळ, तुझ्या घरी. हो. तू घेतलास का चहा? मोत्या कुठे आहे? -'

'त्यानेसुध्दा त्या दिवशी अन्न घेतले नाही. आम्ही जेवू खाऊ लागल्यावर तो खाऊ लागला. त्यालाही वाईट वाटले. तो चार दिवस घरात पडून होता. आज तुम्ही आलात. तो आनंदला. आज तो बाहेर पडला आहे. असेल तिकडे बागेत हिंडत फिरत. तुम्हांला

फार थकवा नाही ना वाटत? जाताना टांगा केलात; येताना का नाही केलात?'

'जाताना केला असे तुम्हांला कोणी सांगितले?'

'सकाळी शांताराम पळत पळत शोधार्थ गेला. वाटेत बातमी कळली की तुम्ही टांग्यातून कोणत्या तरी स्टेशनवर गेलात. म्हणून शांताराम परत आला.'

'मी आजही टांगा केला होता. गाव जवळ आला म्हणून मी उतरलो. त्याला जा म्हटले. मला तसा थकवा वाटत नाही. मात्र पडून राहावेसे वाटते. तू जा फिरायला शांतारामकडे. त्याच्या कादंबरीचे काय?'

'प्रकाशकांना ती आवडली आहे. पैसे किती देणार ते मागाहून कळविणार आहेत.'

थोड्या वेळाने शांता बाहेर पडली. ती गावात गेली. ती शांतारामच्या घरी गेली.

'ये, शांता, ये.'

'आज तुझ्या घरी आले.'

'माझे घर तुझेच. आजोबा बरे आहेत?'

'हो. परंतु आपण वैद्याला घेऊन जाऊ. एकदा त्यांची प्रकृती तपासून घेऊ. तू येशील वैद्याला घेऊन? मी पुढे जाते.'

'थोडा वेळ बैस. चहा करू?'

'मी घेऊन आले.'

'सरबत करू?'

'नको हो काही. घ्यायलाच का हवे?'

'हो. थोडे सरबत तरी घेऊन जा -'

त्याने सरबत केले. ते घेऊन ती गेली. थोड्या वेळाने शांतारामही दार लावून बाहेर पडला.

'परतशी आलीस? फिरायला नाही का गेलीस? शांताराम भेटला नाही वाटते?'

'आजोबा, तुमचा हात जरा कढत लागत आहे. ताप का आला आहे?'

'जरा आला असेल -'

'पांघरूण घालू का? घाम येईल.'

'नको पांघरूण. त्याने जीव घाबरतो. असे मोकळेच बरे. वारा नाही लागला म्हणजे झाले. अंगावर ही शाल आहेच. तुझ्या वडिलांची प्रेमळ शाल -'

'तुम्ही जाताना स्वतःचे कपडे घातले?'

'जाताना ज्याला त्याला स्वतःचेच बरोबर नेता येते. स्वतःचे पापपुण्य, स्वतःची पुंजी. दुसऱ्याचे नेता येत नाही, बाळ.'

शांता शांत राहिली. आजोबांना बोलायला लावू नये असे तिला वाटले. इतक्यात शांताराम वैद्याला घेऊन आला.

'या वैद्यराज, तुम्ही कुठे?-'

'मिरवणुकीच्या गर्दीत मी आलो नाही. म्हटले सायंकाळी जाऊन भेटेन. बरे आहे ना? बघू हात -'

वैद्य नाडी बघत होते. त्यांची मुद्रा चिंतातूर दिसली.

'तुम्हांला खूप थकवा आला आहे. बरेच श्रम केलेत बहुधा. आता अगदी पडून राहायचे, समजले ना?'

'आता मला कोठेही जायचे नाही. मी पडूनच राहीन -'

शांता आणि शांतारामजवळ बाहेर काही बोलून ते वैद्यराज निघून गेले.

'जा तुम्ही फिरायला.' आजोबा म्हणाले.

'आता उशीर झाला. उद्या फिरायला जाऊ.' शांता म्हणाली. घरात निःस्तब्ध शांतता होती.

'मी राहू का सोबत?'

'नको. तसे वाटले तर येईन -'

'यांना एकटे सोडून?'

'परंतु मला भीती नाही वाटत. देव दयाळू आहे.'

शांताराम गेला. रात्र नीट पार पडली. शांता दोन-तीनदा येऊन पाहात होती. पाय का गार होते? तिने त्या पायांत मोजे घातले.

'शांता, तू घाबरू नकोस. मला आता बरे वाटते. दोन दिवसांनी मी पुन्हा हिंडू फिरू लागेन. माझी टोपली अर्धवट राहिली आहे -'

'मी ती पुरी केली.'

'शाब्बास! तुला सारे येते.'

दोन-तीन दिवस असे गेले. बुधवारी आनंदराम जरा घाबरले. शांताने मात्रा उगाळून दिली. पुन्हा ते सावध झाले. नीट बोलू लागले.

'शांताराम, जा घरी. मी बरा आहे. आता सकाळी ये. येताना शशीला घेऊन ये. बकुळीची फुलेही आण.'

'बकुळीची फुले आता नाहीत. संपली.'

'बरे, जी असतील ती आण. जा आता...'

शांताराम नि शांता अंगणात उभी होती.

'मी जाऊ?'

'जा. देव दयाळू आहे. सकाळी लवकर ये...'

तो जड पावलांनी गेला. रात्री शांता पाय चेपीत बसली होती. थोड्या वेळाने आजोबा म्हणाले,

'शांता, तू जाऊन झोप. मला काही लागले तर मी ही घंटा वाजवीन. तीनदा उठू नकोस. तुला काय आजारी पडायचे आहे? नीज बेटा. तुला जागरण होते. दोन दिवसांत तू वाळलीस. स्वतःची काळजी घे...'

शांताने हट्ट धरला नाही. ती वरती जाऊन पडली. तिला मधून मधून झोप लागत होती.

o o o

कोंबडा आरवला. पहाट झाली. आनंदरामांनी घंटा वाजविली. शांता धावतच खाली आली.

'काय हवे? बरे वाटते ना?'

'शांता, मला बरे नाही वाटत. माझा जीव थकत चालला आहे. लवकरच खेळ खलास होईल. मी आनंदाने देवाकडे जाईन. तुला एक सांगायचे आहे. मी सांगेन त्याप्रमाणे सारे करशील? कबूल कर -'

'करीन, सांगाल तसे करीन.'

'ते कपाट उघड. कागदपत्र घेऊन ये.'

कपाट उघडून तिने आणले. त्याने ते नीट पाहिले.

'मी मेल्यावर तू मुंबईस जा. हे नळकांडे आणि हे पत्र - या पत्रावर लिहिलेल्या पत्त्यावर नेऊन दे. तेथे तुला पुढचे सारे कळेल. पत्र लिहून ते टाकतील. तू एकटीच जा. शांतारामही बरोबर नको. तू कबूल केले आहेस. माझ्या इच्छेप्रमाणे ही कामगिरी कर. मग तू परत ये. शांताराम नि तू लवकरच विधीपूर्वक विवाह करा. सुखी व्हा. सत्याने वागा. केवळ धनाच्या मागे लागू नका. प्रेम, सहानुभूती यांनाच सत्यता आहे. जीवनात प्रेमाने आनंद येतो, समाधान येते. तुम्ही एकमेकांस अंतर देऊ नका. एकमेकांस सांभाळा. कृतार्थ व्हा. शेजारीपाजारी सुखी करा. शांता, रडू नको. मी कुठला कोण? अनाथाप्रमाणे दरीत पडलो होतो. तू माझे डोके मांडीवर घेतलेस. कोण पापी, चांडाळ असे म्हटले नाहीस. तुला माझ्यापासून कशाची अपेक्षा नव्हती. तू निरपेक्ष प्रेम केलेस. शांता, सर्व जीवनात जे मी शोधत होतो ते तू दिलेस. धन्य तू, धन्य तुझी ही झोपडी. बैस, माझ्याजवळ बैस. आधी ते कागदपत्र ठेवून दे.'

तिने ते ठेवून दिले. ती त्यांच्याजवळ बसली. तिचे डोळे गळत होते.

'थोडे दूध देऊ?'

'शांता, आता पृथ्वीवरचे काही नको. गोड रामनाम म्हण. एखादा अभंग म्हण. तो ऐकत मी डोळे मिटीन.'

त्यांचा हात तिच्या हातात होता. ती अभंग म्हणत होती....

"जन्ममरणाची पाऊले टाकीत
येतो मी धावत भेटावया
पापांचे पर्वत सोडूनीया दूर
येतो तुझे दार गाठावया
दिवसेंदिवस होऊन निर्मळ
चरणकमल पाहीन तुझे
कधी तो सोन्याचा येईल दिवस
पुरेल ही आस अंतरीची ॥जन्म॥"

'तो सोन्याचा दिवस आज उजाडला आहे. तो बघ सूर्य उगवला. किती सुंदर! किती सुंदर प्रभात, किती सुंदर! धन्य -' आनंदरामांना आणखी बोलवले नाही. शांता त्याच्याकडे पाहात होती. त्यांचा हात तिच्या हातात होता आणि 'राम' शब्द ऐकू आला. आनंदराम गेले.

मुकी शांता तेथे अश्रुसिंचन करीत बसली होती. मुका कुत्रा तेथे होता आणि थोड्या वेळाने शांताराम आला. तो सारे समजला. त्याने डोळे मिटून जणू प्रार्थना केली.

'शांता, रडू नको, मी तुला आहे. तुझी माझी भेट घालून देण्यापुरता हा देवाचा थोर दूत आला होता. कसे शांत मरण! उगी...'

शांताराम गावात गेला. वाऱ्याप्रमाणे सर्वत्र वार्ता पसरली. सारा गाव तेथे लोटला. त्या गावात कधी निघाली नव्हती अशी प्रचंड प्रेतयात्रा निघाली. सागराच्या तीरावर देहाला अग्नी देण्यात आला. सारे परतले. गावात घरोघर आनंदरामाचे गुणगान चालले होते. आता मुलांना कोण गोष्ट सांगेल, मोठ्यांना सल्ला कोण देईल,

भांडणे कोण मिटवील, गांवच्या भरभराटीच्या योजना कोण सांगेल? सर्वांनाच जवळचे कोणी तरी गेले असे वाटले.

शांता नि शांताराम अंगणात बसली होती.

'शांताराम, उद्याच मी येथून जाते. मृताची इच्छा पवित्र असते. मी लगेच परत येईन.'

'तू मुंबईला कधी गेली आहेस का? मी येतो बरोबर.'

'त्यांनी मला निक्षून एकटीच जा असे सांगितले आहे. तोंड आहे. मी पत्ता काढीन. तू काळजी करू नकोस.'

'मी काय बोलू?'

'माझे ऐक.'

आणि दुसऱ्या दिवशी ते कागदपत्र घेऊन शांता निघाली. ती बोरीबंदरवर उतरली. क्षणभर ती चमकली, दिपली. परंतु तिने हिंमत धरली. तेथे मोटारी उभ्या होत्या.

'या पत्त्यावर मला घेऊन चला.' ती एकाला म्हणाली.

'हे तर बडे बॅरिस्टर आहेत. कंबाला हिलवर बंगला आहे. अच्छा बैठिये.'

मोटार निघाली आणि भव्य दरवाजासमोर ती उभी राहिली. शांता उतरली. पैसे चुकते करून ती आत गेली. पाट्या वाचत ती आत चालली. पायऱ्या चढून वर गेली. तो तो पत्ता तेथे होता. ती कचेरी होती. तेथे ये-जा सुरू होती, ती आत गेली. एका चपळ कारकुनाने विचारले, 'काय आहे काम?'

'ही पत्रे, हे कागद द्यायचे आहेत.'

त्या कारकुनाने सारे हातात घेतले. त्याच्या तोंडावर विस्मय फुलला. 'येथे बसा. मी आत जाऊन येतो.' असे म्हणून तो कारकून आत गेला. तेथे बॅरिस्टर जगजीवन बसलेले होते.

'ही पत्रे, हे कागदाचे नळकांडे घेऊन एक तरुण मुलगी आली आहे. हे अक्षर तर आनंदरामांचे दिसते.'

'आनंदरामांचे हस्ताक्षर? द्या आधी इकडे.' जगजीवनांनी ते

कागदपत्र घेतले. त्यांनी पत्र वाचले. त्या नळकांड्यातून त्यांनी कागद बाहेर काढले. ते मृत्युपत्र होते.

'त्या मुलीला आधी आत बोलवा.'

कारकुनाने शांताला आत नेले.

'बसा त्या खुर्चीवर. तुम्ही जा.' बॅरिस्टर कारकुनास म्हणाले. तेथे आता कोणी नव्हते. जगजीवन शांताकडे बघत होते. कोणी बोलेना. शांता गोंधळली. काय प्रकार आहे हे तिला कळेना.

'तुमचे नाव शांता. तुमच्याकडे आनंदराम राहात होते. ते मरण पावले. हे पाहा, हे त्यांचे मृत्युपत्र आहे. त्यांनी सर्व इस्टेट तुम्हांला दिली आहे. तुम्ही दैववान. तुम्ही आजपासून कोट्याधीश झालात.'

'काय म्हणता तुम्ही?'

'आनंदराम हे मोठे कोट्याधीश होते. ते माझे मित्र. त्यांनी सारे तुम्हांला दिले आहे. तुम्ही त्यांना निरपेक्ष प्रेम दिलेत. त्यांची प्रेमळ सेवा केलीत. अशा घाबरू नका, गोंधळू नका.'

'परंतु मला काही नको. मला कशाची अपेक्षा नव्हती. मला काही मिळावे म्हणून मी सेवा केली नाही!'

'म्हणूनच तुम्हांला सारे मिळाले. नको असे म्हणू नका. सत्कारणी लावा. तुम्हाला अपार सेवा करता येईल. सार्वजनिक सेवेच्या अनेक गोष्टी करता येतील. यात आणखी पुढील गोष्टी आहेतः

धनु वैद्याला पाचशे रुपये
श्रीपतीला पाचशे रुपये
हरीला पाचशे रुपये
ताराला पाचशे रुपये
खानावळीणबाईला पाचशे रुपये
जगजीवनराम माझा मित्र दहा– हजार रुपये
आनंदगांवच्या सर्वांगीण विकासासाठी एक लाख रुपये
शशीला दहा हजार रुपये
आनंदगांवचा माझा बुरुड शिक्षक– एक हजार रुपये

आणखी काही किरकोळ गोष्टी आहेत. त्या त्या माणसांचे पत्ते आहेत. मी त्याप्रमाणे सारी व्यवस्था करतो. मला दहा हजार रुपये त्याने दिलेत. ते मला नकोत.'

'तुम्ही नको म्हणता? तुम्हीही ते घेऊन कशाला द्या! मृताची इच्छा. मित्राची इच्छा सन्माना.'

'ठीक. मी या मृत्युपत्राप्रमाणे सारी व्यवस्था करतो. आता तुम्ही मालक.'

शांता क्षणभर स्तब्ध होती. थोड्या वेळाने ती म्हणाली.

'ही सारी मिळकत मला दुसऱ्याच्या नावे नाही करता येणार? समजा, मला माझे मृत्युपत्र करून ठेवायचे असेल तर?'

'ही संपत्ती मिळाली नाही तो मरण का इच्छिता?'

'बॅरिस्टरसाहेब, जीवनात कशाचा भरवंसा नाही. जाता जाता वाटेत मेले तर? अपघातच झाला तर? माझेही मृत्युपत्र करा. मी ही सारी मला मिळालेली मिळकत शांतारामांच्या नावे करते. मी ही त्यांना देते, मृत्यूपत्र म्हणा वा बक्षीसपत्र म्हणा. योग्य ते करा. त्याच्यावर तुमची माझी सही होऊ दे. मी गंभीरपणे सांगत आहे. करा.'

जगजीवनांनी त्याप्रमाणे लिहिले. त्यावर सह्या झाल्या, तो कागद घेऊन शांता निघाली.

'नमस्कार, मी येते.'

'नमस्कार, सुखी व्हा.'

शांता तडक बोरीबंदरवर आली. बॅरिस्टरांची मोटार तिला पोचवायला आली होती. ती गोंधळून गेली होती. परंतु तिला एक परम समाधान वाटत होते. एका क्षणात मिळालेले सारे तिने शांतारामाला अर्पण केले. ज्याला जीवन समर्पिले त्याला संपत्ती समर्पिणे तिला कठीण गेले नाही. परंतु ती कसोटी होती. स्वार्थ, मोह, लोभ यांपासून आपण दूर राहू शकलो, याचा तिला आनंद वाटत होता. स्वतःच्या प्रेमाची तिला कृतार्थता वाटत होती.

शांता सायंकाळी घरी आली. शांताराम घरात होता. तिने त्याला स्वतःच्या त्या नवीन मृत्युपत्राशिवाय बाकी सारी हकिकत सांगितली. दोघे गंभीर होती.

'शांताराम, तू बोलत का नाहीस? देवाने दिले ते आपण सार्थकी लावू. आपणांस पैशाची इच्छा नाही. हे आनंदराम म्हणजे काही तरी गूढ आहे, असे मला वाटतच होते. एवढे कोट्याधीश नि मी त्यांना बांबूच्या टोपल्या करायला लावल्या. परंतु त्यांचा हट्ट, मी तरी काय करू? कोट्याधीश नि किती साधा? शांताराम, तू का नाही काही बोलत? आता तुझी कादंबरी जरा उशिरा प्रसिध्द झाली तरी चालेल. तिचे पैसे नाही मिळाले तरी चालेल. देवाने भरपूर दिले आहे. सुखाचा संसार करून जगाची सेवा करू. आनंदरामांना, आजोबांना स्मरू. खरेच, ती त्यांच्याजवळ पुडी होती दहा रुपयांची. त्यांना धनू, बळिराम वगैरेंनी करून दिलेली. 'ती नाणी सोन्याच्या करंडकात ठेवा', असे होते त्या मृत्युपत्रात. केवढे थोर मन! शांताराम, तुझी मुद्रा अशी का?'

'शांता, तुझा माझा विवाह आता अशक्य आहे.'

'काय म्हणतोस तू?'

'गरीब शांता मला हवी होती. कोट्याधीश शांता मला नको. माझ्या पैशाने जिला मी सजवले असते, अशी शांता मला हवी होती. आता तुला माझ्या कादंबरीच्या पैशाचे थोडेच महत्त्व वाटेल? आता तू कुबेर बनलीस. उद्या माझा अपमानही करशील, बायकोच्या जिवावर तर चैन चालली आहे, असे म्हणशील. संपत्ती चमत्कार करते; ती माणसाचे स्वभाव बदलते. मी विषाची परीक्षा कशाला बघू? येथे येईपर्यंत तू माझी होतीस. परंतु आता नाहीस. मी जातो.'

'शांताराम, हीच का माझी किंमत केलीस? मी का पैशाने उतेन, मातेन! मी का इतकी क्षुद्र आहे? मी का तुझा अपमान

... वाचनालय सातारा
मासिक योजना

करीन? अरे, या पैशाची नाही रे गोडी! तुझ्या कादंबरीचे प्रेमळ पैसे तेच मला प्रिय आहेत. आनंदरामांची संपत्ती आपण कृष्णार्पण समजू. ती देशाला देऊ. आपण श्रमाने जगू. तू लिही, मी भरतकाम करीन. मी पैशाची पुजारीण नाही.'

'आज नाहीस, उद्या होशील. लोक तुला पढवतील, शिकवतील, पैसा हे विष आहे. नको. शांता, तू सुखी राहा. मी जातो. मला गरीबच राहू दे.'

असे म्हणून तो खरेच निघून गेला. शांताला आकाश कोसळल्याप्रमाणे वाटले. 'आजोबा गेले आणि शांताराम, माझ्या हृदयावर प्रखर प्रहार करून तोही गेला. शांताराम, तुझ्या कादंबरीच्या पैशातून मला कशाला हवीत पातळे असे मी नाही हो कधी म्हटले. आम्हांला स्वाभिमान नाही. तुम्हांला तेवढा स्वाभिमान? मी माझ्या बायकोला पोसतो असे म्हणण्यातच का तुमचा पुरुषार्थ, यातच का तुमचे प्रेम? अरे, तू मी का निराळी? मी स्वतःला तुझ्यात मिसळून देते, तुला नाही का माझ्यात एकरूप होता येत? आणि ही संपत्ती तेव्हाच रे मी तुला देऊन टाकली आहे. क्षणभरही तिचा मोह मी धरला नाही. मला तुझे प्रेम हवे, हृदय हवे. मला तू हवा आहेस, तुम्ही पुरुष शेवटी असेच. स्त्रियांच्या हृदयाची तुम्हांला पर्वा नाही. क्षणात कुस्कराल. मीच दुर्दैवी आहे. कोणी राहणार नाही. मी कशाला जगात राहू? आई, बाबा, आजोबा, मला तुमच्याकडे येऊ दे. कशाला दीनवाणी, मी इथे राहू?' ती रडत होती.

पहाट झाली. शांतारामच्या नावे केलेला तो कागद तिने तेथे ठेवला. घरातील देवांना, मायबापांच्या तसबिरीला तिने प्रणाम केला. ती घरातून एकटी कोठे तरी निघून गेली.

रात्री शांताराम घरी गेला. तो तळमळत होता. आपले काही तरी चुकले असे त्याला वाटले. एकदम घाव घाल, कर तुकडे, असे नको होते करायला असे त्याला वाटले. आपली घाई

झाली. दोन दिवस थांबून ही गोष्ट काढायला हवी होती. परंतु आता पस्तावून काय उपयोग? शांताकडे लगेच जावे असे त्याला वाटले. परंतु त्याला धीर झाला नाही. त्याला झोप आली नाही, आपण फार मोठा गुन्हा केला असे आता त्याला स्वच्छ दिसू लागले. पहाट झाली. तो उठला. तो तडक शांताकडे आला. दारे उघडी होती. तेथे दिवा होता. त्याने मोत्याला सोडले. मोत्या हरवलेले शोधू लागला. कोठे आहे शांता? तिने काही लिहून ठेवले आहे का? तो त्या टेबलाजवळ गेला. तेथे त्याच्या नावाने सारी मिळकत करून दिल्याचा तो कागद होता. तो थक्क झाला. 'मिळताक्षणीच शांतेने सारे या शांतारामला दिले आणि मी तिला हिणविले, तू कोट्याधीश झालीस, माझा अपमान करशील, असे मी तिला म्हटले. अरेरे! कोठे आहेस शांते? शांता, तू देवता आहेस, परंतु असे कसे मी वर्तन केले? जिला मी देवता मानी, तिला क्षणात मी इतकी हीन कशी समजलो? मी नराधम आहे, क्षुद्र आहे, अहंकारी आहे. शांता कोठे आहे? माझी शांता? तिने का जीव दिला? त्या दरडीवरून का समुद्रात तिने उडी घेतली? मला धावत जाऊ दे. तिच्या वडिलांची ती बसायची जागा.' तो धावत निघाला, त्या जागेजवळ आला आणि तेथे शांता होती; मागे-पुढे करीत होती, परंतु उडी टाकण्याचे धैर्य तिला होत नव्हते. पुन्हा एकदा हिय्या करुन ती पुढे झेपवणार तोच तिला पाठीमागून शांतारामने धरले.

'शांता, क्षमा कर. शांता, तुझे प्रेम माझे अपराध पोटात घालो. मला भिक्षा घाल. मला सोडून जाऊ नकोस.'

'कशाला मी राहू? पैशाची पुजारीण जगात जगून काय फायदा?'

'शांता, तू निरपेक्ष प्रेमदेवता आहेस. तुला अपार संपत्ती मिळाली. तू ती क्षणात मला समर्पिलीस, केवढा तुझा त्याग!'

'त्यात त्याग कसचा? पैशाला माझ्या जीवनात मी कधी

किंमत दिली नाही; म्हणून त्याचा त्याग करणे मला जड नव्हते. प्रेम हीच एक स्वर्गीय ठेव मी जतन करीत आले आणि आनंदराम, ते आजोबा, एवढे कोट्याधीश असूनही अशा प्रेमाचा कण मिळावा म्हणून म्हातारपणी जगाचे यात्रेकरू झाले. शांताराम, आजोबांचे महान जीवन आपणास सांगत आहे की निरपेक्ष, निर्मळ, निरहंकारी प्रेम म्हणजेच खरा स्वर्गीय सुखाचा ठेवा. खरे ना?'

'होय, शांता. आनंदरामांनी हे आपणांस शिकविले. तू ते शिकलीस. आता मला शिकव. चल.'

दोघे भरलेल्या अंतःकरणाने परतली. समुद्र उचंबळत होता. सूर्य उगवत होता. सारे सोन्यासारखे दिसत होते.

❖ ❖ ❖

आमची प्रकाशने

नरहर कुरुंदकर
धार आणि काठ
जागर
आकलन

ना. सि. फडके
प्रतिभा-साधन

विश्राम बेडेकर
रणांगण

देशमुख आणि कंपनी